किंमत १ रुपया
( वा. वर्गणी ६ रु. )

Reg. No. B. 3434 Licence No. 53.
Licenced to post without prepayment

# अर्थ

## दिवाळी अंक

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १६ नोव्हेंबर, १९५५ | अंक ४४

हीं दीपावलि आमचे भागीदारांना व खातेदारांना सुखसमृद्धीची जावो !

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**




— संचालक मंडळ —

★ श्री. वा. पुं. वर्दे ( अध्यक्ष )
★ श्री. धों. कृ. साठे
★ श्री. मा. रा. जोशी
★ श्री. मा. वि. शहा
★ श्री. न. ग. पवार ( उपाध्यक्ष )
★ श्री. श्री. गो. मराठे
★ श्री. फ. दो. पदमजी
★ श्री. भा. म. गुप्ते
★ श्री. मो. वा. जांभेकर

— शाखा —

अहमदनगर, अमरावती, मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार ), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर ( म्हैसूर सं. ), हुबळी, द. हैदराबाद, जळगांव, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, पनवेल, पुणें ( भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी ), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर व ठाणें.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर

# बँक ऑफ पूना लि.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | पन्नास लक्ष रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | पंचवीस लक्ष रु. |
| वसूल भांडवल | साडेबारा लक्ष रु. |

संचालक मंडळ :

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., अध्यक्ष
२. डॉ. ना. भि. परुळेकर, एम्. ए., पीएच्. डी.
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम ऊर्फ बाळासाहेब नाईक

मुख्य ऑफिस :—४५५ रविवार पेठ, पुणें २

शाखा:—(१) सदाशिव पेठ, पुणें १. (२) डेक्कन जिमखाना चौक, पुणें ४. (३) सोलापूर (४) सांगली.

★

मुख्य ऑफिस व सांगली येथें माफक भाड्यात सेफ-डिपॉझिट लॉकरची सोय. खातेदारांना भाड्यात सवलत.

सदाशिव पेठ व डेक्कन जिमखाना शाखांच्या कामाच्या वेळा सकाळ-सायंकाळ आहेत.

व्याज—चालू ठेव अर्धा टक्का. ★ सेव्हिंग्ज—दीड टक्का

तीन महिन्यांपासूनच्या मुदतठेवीवर ३ टक्के व्याज.

गो. गं. साठे, मॅनेजर

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

स्थापना १९३८

(कोल्हापूर जिल्ह्याची सेंट्रल फायनान्सिंग एजन्सी)

मुख्य कचेरी :—लक्ष्मीपुरी, कोल्हापूर नं. १

शाखा :—१ हातकणंगलें २ जयसिंगपूर ३ मलकापूर ४ इचलकरंजी

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. ७,००,००० |
| वसूल शेअर भांडवल | रु. ३,३१,३९० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ७६,५०० |
| ठेवी | रु. २७,६०,००० |
| खेळतें भांडवल | रु. ३८,१०,००० |

हुंड्या, चेकस्, वगैरे बिलें वसुलीचे व बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

तसेंच, मुंबई राज्यांतील कोणत्याहि शहरावर ड्राफ्ट देण्याची व्यवस्था केलेली आहे.

गो. म. घारगे, मॅनेजर — व. गो. सरनाईक, M. A., LL. B., प्रेसिडेंट

# धी बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १

चेअरमन — श्री. रमणलाल जी. सरैया, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरी वर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | | |
|---|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल—भागीदारांतर्फे | रु. ३५,१३,७०० | | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | रु. | ६१,१३,७०० |
| गंगाजळी व फंड | .... | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | .... | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | .... | रु. | १३,३५,२४,००० |

—— १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा ——

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे,
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय ... ... ... ... | ३५१ |
| २. | दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा पाया ... ... ... | ३५३ |
| ३. | मोठे उद्योगधंदे व छोटे उद्योगधंदे यांचें स्थान ... ... ... | ३५७ |
| ४. | भारतामधील लिमिटेड कंपन्या ... ... ... | ३६१ |
| ५. | नवीन कंपनी कायदा ... ... ... ... | ३६५ |
| ६. | हिंदी बँका आणि उद्योगधंदे ... ... ... | ३७१ |
| ७. | भारतांतील कापडाच्या गिरण्या ... ... ... | ३७३ |
| ८. | नव्या सहकारी कायद्याची मागणी ... ... ... | ३७७ |
| ९. | एस्टेट ड्यूटी आणि आयुर्विमा ... ... ... | ३७९ |
| १०. | कूळकायदा दुरुस्त्यांचें समालोचन ... ... ... | ३८१ |
| ११. | स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नव्या शाखा ... ... ... | ३८५ |
| १२. | ग्रामीण व लहान उद्योगधंद्यांचा विकास ... ... ... | ३८९ |


## "अर्था"चा पुढील अंक

"अर्था"चे दिवाळीनंतरचे दोन अंक नेहेमीप्रमाणें बंद राहतील. म्हणजे, दि. १३ व दि. २० नोव्हेंबरचे अंक निघणार नाहींत.




# दि मिरज स्टेट बँक, लिमिटेड, मिरज

( स्थापना १९२९ )

शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | २५ लाख रुपये |
| विक्रीस काढलेलें व | |
| खपलेलें भांडवल | १२ लाख रुपये |
| वसूल भांडवल | ६ लाख रुपये |
| रिझर्व्ह फंड | ६ लाख रुपये |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

शाखा : पंढरपूर, कुर्डूवाडी, बार्शी, करमाळा, लक्ष्मेश्वर व सांगली.

ही दिवाळी व नवें वर्ष आमचे खातेदार, भागीदार व हितचिंतक ह्यांना उत्कर्षाचें जावो.

श्री. एन. पी. कानिटकर, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.



# देना बँक

देवकरण नानजी बँकींग कं. लिमिटेड.
स्थापना १९३८

## ६२ शाखा आणि १४ सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १ कोटि रु. |
| खपलेलें व वसूल | ५० लक्ष रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | २८ लक्ष रु. पेक्षां जास्त |
| ठेवी (३०-६-५५) | १४ कोटी रु. पेक्षां जास्त |
| खेळतें भांडवल (३०-६-५५) | १९ कोटी रु. पेक्षां जास्त |
| खात्यांची संख्या | १ लाखापेक्षां जास्त |

मुंबईत १९, गुजरातमध्यें १७, सौराष्ट्रांत १२, महाराष्ट्रांत ११ आणि मध्यप्रदेश, कलकत्ता व दिल्ली येथें प्रत्येकी १ ह्याप्रमाणें कचेऱ्या.

सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.

यंदाची दीपावलि व नूतन वर्ष आमच्या ठेवीदारांना आनंदाचें व सुखाचें जावो.

प्रवीणचंद्र व्ही. गांधी
मॅ. डायरेक्टर.



मुंबई राज्यांतील एक आदर्श अर्बन सहकारी बँक

# दि भुसावळ पीपल्स को. बँक लि.

स्टेशन रोड, भुसावळ. ( पू. खा. )

फो. नं. ३६ ] स्थापना १९१५ [ पोस्ट बॉक्स नं. ३

३०-९-१९५५ चे आकडे

| | |
|---|---|
| भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें | रु. १,६८,९५० |
| रिझर्व्ह फंड | रु. १,११,५३८ |
| इतर रिझर्व्हज् | रु. १,६०,४७६ |
| ठेवी ( सर्व प्रकारच्या ) | रु. २१,२१,४२६ |
| खेळतें भांडवल | रु. २७,९५,१०८ |

*—डायरेक्टर मंडळ व अधिकारी—*

श्री. रामकृष्ण सोनजी पाटील, चेअरमन.
श्री. भीमभाई वसनजी नायक, व्हाइस चेअरमन.
श्री. हरि सदाशिव खरे
श्री. निवृत्ति रामचंद्र फालक
श्री. सदाशिव विठ्ठल वाढ
श्री. सदाशिव दामोदर नाईक
श्री. देवराव वेताराम चौधरी
श्री. जिनाभाई जी. देसाई, मॅनेजर
श्री. रतनजी एन. देसाई, असि. मॅनेजर

★ सभासद व बिगर-सभासद ह्यांचेकडून बँक करंट, सेव्हिंग्ज आणि मुदती ठेवी सोइस्कर व्याजाच्या दरानें स्वीकारते. कर्जदारांना रिबेट, हें बँकेचें खास वैशिष्ट्य आहे. मेंबर्स प्रॉव्हिडंट फंड ह्या नांवाची बचत योजना अंमलांत आहे. बँक सभासदांना वैद्यकीय मदतीची व्यवस्था करते. शेअर्स, रोखे, विमा पॉलिसी, शेतीचा व औद्योगिक माल, सोन्या-चांदीचे दागिने, ह्यांचे तारणावर बँक सभासदांना कर्ज देते.

सर्व तऱ्हेचा बँकिंगचा व्यवहार केला जातो.



# श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण

फलटण, जि. उत्तर सातारा (मुंबई राज्य)

( स्थापना १-२-१९२६ )

| | | |
|---|---|---|
| भांडवल : | अधिकृत | ... रु. २,००,००० |
| | खपलेलं | ... रु. १,२५,००० |
| | वसूल | ... रु. १,१९,००० |
| फंड : | रिझर्व्ह फंड | ... रु. १,०८,००० |
| | इमारत फंड | ... रु. ५९,००० |
| | इतर फंड | ... रु. १,३२,००० |
| ठेवी : | ... ... ... | ... रु. १७,४३,००० |

चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सध्याचे ठेवीचे दर

चालू ठेवींवर ½% सेव्हिंग्ज ठेवींवर १½%

मुदत ठेवींवर १ ते ५ वर्षांस २½ ते ४%

**व्यवहार** : मुख्यतः सहकारी पेढ्यांना कर्जाऊ रकमा पुरविल्या जातात. बँकांचे इतरही सर्व प्रकारचे व्यवहार होतात.

सर्व माहिती समक्ष अगर पत्रद्वारें.

श्री. ह. तळवलकर, A. C. R. A., व्यवस्थापक | वि. शं. झिरपे, B. A., LL. B., चेअरमन.

# अर्थ

## दिवाळी अंक

बुधवार, ता. १६ नोव्हेंबर, १९५५





स्थापना : १९३५

संस्थापक :

प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौधर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

"अर्था"च्या वाचकांस व हितचिंतकांस नवें वर्ष आनंदाचें व समृद्धीचें जावो.

## संपादकीय

"अर्था"च्या २१ व्या वर्षाचा हा दिवाळी अंक वाचकांस सादर करतांना आम्हांस आनंद होत आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक अभ्युदयाचा पाया मजबूत करण्यासाठी हें साप्ताहिक १९३५ सालीं सुरू करण्यांत आलें. सर्व प्रगतीचा पाया अर्थमूल आहे, हें जाणून महाराष्ट्रीय जनतेला त्याचें महत्त्व पटवून देऊन आर्थिक उपक्रमांची गोडी लावणें व त्यासाठी आवश्यक तें वाङ्मय पुरविणें, हा "अर्था"च्या स्थापनेचा हेतु दूरदृष्टीचा ठरला आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नानें, आर्थिक हितसंबंधांस कसें प्राधान्य मिळतें, हें स्पष्टपणें दाखविलें आहे; आर्थिक व तज्जन्य राजकीय सामर्थ्यापुढें नीतीचा आणि तर्कशुद्ध मागणीचा प्रभाव पडणें कठीण जात आहे. हा कमकुवतपणा नष्ट करणें, हेंच आपलें ध्येय ठेवून आपण आपले आर्थिक व्यवहार सुधारले पाहिजेत व त्यासाठीं सहकार्यानें व नेटानें प्रयत्न केले पाहिजेत. भारतांतील इतर सर्व प्रदेशांची प्रगति होणें आवश्यक असलें, तरी त्या प्रगतीच्या आंकड्यांनीं केवळ आपलें समाधान होणार नाहीं; त्या प्रगतींत आपला हिस्सा वाढत गेला पाहिजे.

ह्या अंकांतील विषयांकडे लक्ष दिलें असतां असें दिसून येईल, कीं देशांतील सध्यांच्या आर्थिक घडामोडींची गुंतागुंत वाचकांना समजून घेता येण्यास साहाय्य करण्याचा त्यांत विशेष प्रयत्न करण्यांत आला आहे. उदाहरणार्थ, औद्योगिक क्षेत्रांत मोठे व लहान उद्योगधंदे ह्यांचें स्थान कोणतें असावें व त्याबाबत योजनाकारांचा दृष्टिकोन काय आहे, हें तपशीलवार सांगण्यांत आलेलें आहे. बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या उपाययोजनेचें स्वरूप त्यामुळें स्पष्ट होईल. राहाणीच्या पातळीचा दर्जा उंचावण्यास त्यामुळें अडचणी येण्याचा संभव आहे; श्रीमंतांना गरीब करणें सोपें आहे पण तेवढ्यानें केवळ गरिबांची स्थिति सुधारणार नाहीं; तेव्हां सरकारचें धोरण अधिक उपकारक असावयास हवें; आणि त्याहिपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे होणारा खर्च कारणीं लागला पाहिजे; कार्यक्षमता आणि ध्येयनिष्ठा ह्यांचा प्रश्न येथें उद्भवतो. कडक अंमलबजावणी व त्यासाठी न्यायनिष्ठुरता हीं अत्यावश्यक ठरतात. ह्या बाबतींत बऱ्याच सुधारणेस वाव आहे.

आर्थिक व औद्योगिक संघटना लिमिटेड कंपन्यांचें स्वरूप धारण करतात. त्यामागें भांडवल, नेतृत्व व कार्यकर्ते एकत्रित येत असतात. भारतांतील लिमिटेड कंपन्यांचा आजवरचा इतिहास आम्हीं दिला आहे व नव्या कंपनी-कायद्यांतील तरतुदी तपशीलवार सांगितल्या आहेत. सहकारी क्षेत्राची इकडे वाढ होत असतांना, त्यासंबंधांतील कायदा मात्र जुनापुराणा राहिला आहे; त्याच्या आमूलाग्र सुधारणेची मागणी एका लेखांत अवरजून केलेली आहे. हिंदी बँकांची उद्योगधंद्यांबाबत भूमिका आणि स्टेट बँकेच्या शाखाविस्ताराचें धोरण, ह्याविषयीं करण्यांत आलेलें विवेचन अद्यावत् असेंच आहे. कापडाच्या गिरण्यांच्या प्रगतीचें आशादायक चित्र आणि ग्रामोद्योग टिकविण्यासाठी सुचविलेले मार्ग ह्या दोन्हींची सांगड कशी घालावयाची, व त्यासाठी सामान्य गिऱ्हाइकाची म्हणजे नागरिकाची सोय कुणीं पहावयाची, हा एक मोठ्या विचाराचा प्रश्न आहे. कूळकायद्यानें निर्माण केलेल्या परिस्थितीवर एका लेखानें प्रकाश टाकला आहे, तर दुसऱ्या एका लेखांत एस्टेट ड्यूटीमुळें विमा व्यवसायास मिळालेल्या संधींची माहिती देण्यांत आलेली आहे. अशा रीतीनें, देशापुढील आर्थिक प्रश्नांचा उलगडा होण्यास, म्हणजेच त्यांचा विकटपणा समजून येण्यास, प्रस्तुत दिवाळी अंक उपयुक्त ठरेल, अशी आम्हांस खात्री आहे.

देशापुढील आर्थिक समस्यांवर विजय मिळविण्यासाठी तज्ज्ञांच्या सुसंगत मार्गदर्शनाची व कार्यक्षम अंमलबजावणीची जशी आवश्यकता आहे, तशीच जनतेच्या समंजसपणाची, उत्साहाची व निष्ठेची पण आहे. सर्वच गोष्टी एकमेकांवर अवलंबून असल्यानें, योग्य वातावरण निर्माण होण्याची जरूरी अत्यंत तातडीची आहे. त्यादृष्टीनें प्रयत्न व्हावेत व त्यांत निसर्गाचा कोप किंवा मानवी अप्रबुद्ध अडथळे येऊं नयेत, अशी प्रार्थना आहे.

आमचे सर्व इष्ट-मित्रांस, ग्राहकांस व हितचिंतकांस
ही दिवाळी आनंदाची व नवीन वर्ष उत्कर्षाचें व सुखाचें जावो!

भांडवलानें किमया केल्यास आश्चर्य नाहीं, पण केवळ—
कष्ट, सचोटी व चिकाटी यांचें द्योतक म्हणजेच

**दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लिमिटेड**

तारेचा पत्ताः 'माळीशुगर'
मुंबई ★ माळीनगर

माळीनगर ( जि. सोलापूर )

मुंबई ऑफिस: फोन नं. २०१३४
सर विठ्ठलदास चेंबर्स
१६, अपोलो स्ट्रीट, फोर्ट.

: प्रथम : ← प्रगतीचीं ठळक चिन्हें → : आज :

ट्रेड मार्क

| : प्रथम : | : आज : |
|---|---|
| १. अधिकृत भांडवल: रु. ८,००,००० | रु. ५१,००,००० अधिकृत भांडवल: |
| | रु. ४८,८०,८०० वसूल झालेलें |
| २. यंत्र-साधनेची शक्ति: दररोज: २५० टन ऊंस गळीत | विद्युत-शक्तीवरील अद्यावत् यंत्रसामुग्री दररोज: १००० टन ऊंस गळीत |
| ३. पांच वर्षांपूर्वी ऊंस उत्पादन: एकरीं ५० टन | आज ऊंस उत्पादन: दर एकरीं ७५ टन |

पंढरपुरी पवित्र साखरेचे निर्माते


अशा तऱ्हेनें प्रतिवर्षी १४५० एकरांत दर एकरीं ७५ टनाप्रमाणें ऊंस काढून या संस्थेनें जो उच्चांक गांठला आहे व जें यश कमविलें आहे त्यानें भारतांतील साखर कारखान्यास विस्मयाचा धक्का दिला आहे.

★ संचालक मंडळ ★

१ श्री. रा. हरिभाऊ बळवंतराव गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर
२ ,, मारुतीराव खंडूजी पांढरे, चेअरमन
३ रावबहादुर नारायणराव सोपानराव बोरावके
४ श्री. रा. भगवंतराव गेनूजी गिरमे
५ श्री. रा. रघुनाथराव सोपानराव इनामके
६ ,, शंकरराव बाळकुजी इनामके
७ ,, सोपानराव बापुराव गिरमे
८ ,, शंकरराव भाऊराव राऊत
९ ,, शंकरराव शिवरामजी कुदळे

मॅनेजरः—श्री. जी. एस्. कारभारी, एम्. ए., एल्एल्. बी.





[ स्थापना १९२१ ]

**गरगट्टी अँड सन्स**

शहापूर—बेळगांव

धोबी, फॅमिली व शिंपी

पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे ग्राहकांस हें वर्ष सुखाचें जावो

# दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा पाया

## छोटे ग्राहकोपयोगी आणि मूलभूत उद्योगधंदे ह्यांचा समन्वय

### बेकारीच्या संकटावर उपाय

आपणांस आज अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन प्रश्नांस तोंड द्यावयाचें आहे. एक म्हणजे सध्यांची बेकारी नाहींशी करून भविष्यकाळांत बेकारीचा धोका टाळणें, आणि दुसरी म्हणजे सर्व थरांतील जनतेच्या, विशेषतः गरीब जनतेच्या राहणीमानाच्या दर्जांत सतत सुधारणा घडवून आणणें. या दोन प्रश्नांचा अर्थातच परस्परांशीं निकटचा संबंध आहे.

राहणीमानाच्या दर्जांत सुधारणा करणें, म्हणजे अधिक प्रमाणांत अधिक चांगल्या अन्नवस्त्रांचा व घरांचा पुरवठा करणें, अधिक चांगली वैद्यकीय मदत, शिक्षणसोयी व जीवनांतील इतर सुखसोई यांची तरतूद करण होय. अन्न, कापड व इतर माल यांच्या उत्पादनांत वाढ करून तसेंच शिक्षक, डॉक्टर व समाज-सेवक यांस अधिक संख्येंत शिक्षण देऊन ही गोष्ट साध्य करतां येईल.

उत्पादनासाठीं यंत्रें, अवजारें, इत्यादींचा वापर करावा लागतो. अधिक कष्ट करून आणि सध्यांच्या यंत्रसामुग्रीचा अधिक चांगल्या प्रकारें वापर करून आपणांस कांहीं प्रमाणांत उत्पादनांत वाढ करतां येईल हें खरें, परंतु यासहि मर्यादा आहेच.

उत्पादनांत सतत वाढत्या प्रमाणावर कायमची वाढ करीत राहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आपल्या यंत्रसामुग्रींत, अवजारांत, थोडक्यांत म्हणजे भांडवल-गुंतवणुकींत वाढ करणें हा होय. भांडवल-गुंतवणुकीचे दोन प्रकार असून त्यांतहि महत्त्वाचा फरक आहे.

कापड-गिरण्या अगर साखर-कारखाने यांसारख्या प्रत्यक्ष वापराच्या मालासाठीं भांडवल गुंतविण्याचा एक प्रकार व पोलाद, सिमेंट, रसायनें, अवजड यंत्रसामुग्री, कोळसा, विद्युत्, रेल्वे व इतर गोष्टी यांसारख्या प्रत्यक्ष वापराच्या नव्हे तर 'उत्पादक माल' म्हणून गणल्या जाणाऱ्या मालासाठीं भांडवल गुंतविण्याचा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारास आपण "ग्राहकोपयोगी उद्योगधंदे" व दुसऱ्यास "मूलभूत उद्योगधंदे" असें म्हणूं.

### पोलादाचें महत्त्व

पोलाद ही अत्यंत महत्त्वाची वस्तु आहे. जितक्या प्रमाणांत पोलादाचें उत्पादन वाढेल तितक्या प्रमाणांत यंत्रसामुग्री व अवजारें यांचेंहि उत्पादन वाढून उत्पादक व ग्राहक मालाच्या पुरवठ्यांतहि वाढ होईल.

अमेरिकेंतील बरड लोखंडाच्या तोडींचा अगर त्यापेक्षाहि चांगल्या दर्जाच्या बरड लोखंडाचा भारतांतील सांठा अमेरिकेच्या तिप्पट आहे. तरीहि त्या देशांतील दर माणशीं पोलादाचें प्रमाण भारतापेक्षा २०० पटींनीं जास्त आहे. त्यामुळें यंत्रें, अवजारें व यंत्रसामुग्री यांचें तेथील उत्पादनाहि जास्त आहे. परिणामीं त्या देशाचा ग्राहक मालाचा पुरवठा जास्त असून राहणीमानाचा दर्जाहि कितीतरी जास्त आहे.

सध्यां आपण दहा लाख टनांहून थोडेसें जास्त पोलाद तयार करीत आहोंत. जर्मनी, रशिआ व ब्रिटन या देशांच्या मदतीनें प्रत्येकीं १० लाख टन उत्पादनशक्तीचे तीन कारखाने सुरू करण्याचा आपला विचार आहे. अशा तऱ्हेच्या एका कारखान्यासाठीं अंदाजें १०० कोटी रु. लागतील. यांपैकीं ४५ कोटी रु., म्हणजे जवळजवळ निम्मा खर्च परदेशांतून आयात कराव्या लागणाऱ्या पोलादी यंत्रसामुग्रीवरच होईल. ही यंत्रसामुग्री आपण देशांत तयार करूं शकल्यास हा पैसा आपल्या देशांतच राहील.

### यंत्र-निर्मितीचा कारखाना

मग, आपण या यंत्रसामुग्रीची आयात कां करतों? त्याचें कारण असें कीं पोलाद, सिमेंट, इत्यादींसाठीं आवश्यक अशी अवजड यंत्रसामुग्री तयार करण्याचे कारखाने आपण सुरू केलेले नाहींत. अशा यंत्रसामुग्रीच्या कारखान्यासाठीं जवळजवळ २०० कोटी रु.लागतील; त्यांतील सुमारें १०० ते १५० कोटी रु. ची यंत्रसामुग्री परदेशांतून आणावी लागेल. परंतु असा कारखाना सुरू केला तर आपणांस या देशांतील बरड लोखंडाचा उपयोग करतां येऊन त्यापासून पोलाद तयार करतां येईल. नंतर या पोलादाचा अधिक यंत्रसामुग्री निर्माण करण्यासाठीं वापर करतां येऊन अधिक ग्राहकोपयोगी माल तयार होईल.

तद्नंतर आपणांस, आतांप्रमाणें, एखादा नवा कारखाना सुरू करणें झाल्यास प्रत्येक वेळीं परकीय हुंडणावळीचा विचार करावा लागणार नाहीं. परकीय मालाच्या पुरवठ्यावरील आपलें अवलंबित्व बऱ्याच अंशीं कमी होईल. अशा रीतीनें देशाच्या औद्योगीकरणांतील सर्वांत मोठी अडचण दूर झाल्यावर आपणांस उत्पादनांत झपाट्यानें वाढ करतां येईल आणि त्याबरोबरच नोकरीविषयक परिस्थिति सुधारून राहणीमानाचा दर्जाहि वाढेल.

### मूलभूत अवजड उद्योगधंदे

यासाठीं आपण मूलभूत अवजड उद्योगधंद्यांची शक्य तितक्या लवकर स्थापना व विकास करून सिमेंट, पोलाद, रसायनें, कोळसा, विद्युत् यांच्या उत्पादनांत वाढ करण्याचे तसेंच, रेल्वे व वहातुकीच्या विकासाचे आणि त्यापेक्षाहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे यंत्रसामुग्री निर्मितीच्या धंद्याची उभारणी करण्याचे जास्तींत जास्त प्रयत्न केले पाहिजेत; कारण याशिवाय झपाट्यानें औद्योगीकरण होणार नाहीं.

या गोष्टींबरोबरच आपण शक्य तितक्या झपाट्यानें आरोग्य व वैद्यकीय सोयी, शिक्षण व औद्योगिक संशोधन, इत्यादींचाहि विकास घडवून आणला पाहिजे.

अवजड उद्योगधंद्यांतील मूलभूत विभाग तसेंच, विद्युत् व वहातूक यांत मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविल्यानें तसेंच, समाजकल्याण कार्यावर अधिक पैसा खर्च केल्यानें क्रयशक्तींत वाढ होऊन ग्राहकोपयोगी मालासाठीं असलेली मागणीहि वाढेल.

हें करतांना आपल्या उत्पन्नाच्या साधनांची अशा रीतीनें वांटणी केली पाहिजे कीं, अन्नाचा व ग्राहकोपयोगी मालाचा जादा पुरवठा जादा मागणी इतकाच राहील. ही गोष्ट महत्त्वाची आहे. आपण चलनवाढ टाळलीच पाहिजे.

आतां आपण ग्राहकोपयोगी मालाच्या पुरवठ्यांत वाढ करण्याच्या प्रश्नाचा विचार करूं.

औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या राष्ट्रांत शेतींत यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणावर आहे. भारतांत तो अजूनहि घरगुती पद्धतीचा छोटा उद्योग आहे. प्रगत राष्ट्रांत ग्राहकोपयोगी बहुतेक वस्तू कारखान्यांत तयार होतात. परंतु भारतांत अशा वस्तू कारखाने, छोटे उद्योगधंदे आणि घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे यांत तयार होतात.

खरें म्हणजे आपण अन्नधान्य उत्पादन (तोहि बऱ्याच प्रमाणांत घरगुती व छोट्या स्वरूपाचा उद्योगधंदा आहे) वगळलें तरीहि, भारतांत संघटित कारखान्यांपेक्षा घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे यांकडूनच ग्राहकोपयोगी वस्तू अधिक प्रमाणांत पुरविल्या जातात.

त्यामुळें ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी आपल्याला एक तर घरगुती स्वरूपाचे आणि छोटे उद्योगधंदे अगर संघटित कारखाने यांतील एकाची, उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें निवड करावयास हवी.

ग्राहकोपयोगी मालाचा शक्य तितका अधिक पुरवठा केला जावा म्हणून पुढील कांहीं काळांत घरगुती स्वरूपाच्या व छोट्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यांत यावें अशी सूचना योजनेच्या कच्च्या मसुद्यांत केलेली होती. तसेंच, सरकारी यंत्रणेच्या विभागाकडून वा सरकार-पुरस्कृत सहकारी संस्थांमार्फत भांडवल, कच्चा माल व खरेदीविक्रीच्या सोयी यांची व्यवस्था करण्यांत यावी असेंहि सुचविलें होतें.

## छोट्या धंद्यांच्या वाढीस आक्षेप

छोटे उद्योगधंदे आणि घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे यांना हमखास बाजारपेठ लाभावी म्हणून कारखाने आणि असे उद्योगधंदे यांना उत्पादनाचा योग्य तो वांटा ठरवून देऊन त्यांच्यामधील विघातक स्पर्धा टाळावी असेंहि आम्हीं सुचविलें होतें. म्हणजे, स्पर्धा करणाऱ्या कारखान्यांना छोटे व घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे मारून आपलें उत्पादन वाढवितांच येणार नाहीं.

परंतु या सूचनेमुळें आपण मागें पडलेल्या व अकार्यक्षम उत्पादन पद्धतीकडे वळत आहोंत व त्यायोगें आपली प्रगति खुंटेल, उत्पादनाचा खर्च वाढेल, किंमतींत वाढ होईल, गिरण्यांत तयार झालेल्या वस्तू किफायतीनें ग्राहकांना मिळूं शकणार नाहींत व अशा सर्व कारणांनीं ग्राहकोपयोगी मालाची टंचाई निर्माण होऊन चलनाची वाढ होण्याचीहि धास्ती आहे, असे आक्षेप त्या सूचनेवर घेण्यांत येतात. या विविध आक्षेपांतहि बराच अर्थ आहे. परंतु भारतांत असलेल्या परिस्थितींत छोटे अगर घरगुती स्वरूपाचे धंदे वा कुटीरोद्योग यांना उत्तेजन देणेंच सुज्ञपणाचें ठरेल. मी आतां त्याचीं कारणें सांगणार आहें.

मूलभूत उद्योगधंद्यांत तेथें काम करणाऱ्या दर माणशीं भांडवल म्हणून गुंतविलेली रक्कम बरीच असते. पोलादासारख्या कारखान्याच्या बाबतींत ती सुमारें एक लक्ष रु. असते, तर इतर अवजड (हेव्ही) उद्योगधंद्यांच्या बाबतींत ती २० ते २५ हजारांपर्यंत असते.

ग्राहकोपयोगी माल तयार करणाऱ्या कारखान्यांना एकंदरीनें पाहतां त्या मानानें कमी भांडवल लागतें. परंतु तरी देखील त्यांत कामावर येणाऱ्या दर माणसागणिक दहा ते बारा हजार रु. भांडवल गुंतवावें लागतें. भांडवलाची तूट लक्षांत घेतां, अल्प काळांत कारखान्यामुळें रोजगार बऱ्याच प्रमाणावर मिळण्याची शक्यता दिसत नाहीं. अवजड (हेव्ही) उद्योगधंद्यांमुळें अनेक आनुषंगिक उद्योगधंदे उभारले जातील हें खरें. तथापि, त्यासाठीं आणखी १० ते १५ वर्षे तरी लागतील. ग्राहकोपयोगी वस्तू कारखान्यांत तयार झाल्यास आर्थिक व्यवहारहि वाढेल पण यालाहि कांहीं काळ लागेलच.

## घरगुती स्वरूपाचे उद्योगधंदे

आतां घरगुती स्वरूपाच्या धंद्यांचा व कुटीरोद्योगांचा विचार करून पाहूं. अशा धंद्यांना भांडवल अगदीं बेताचें लागतें. सहासातशें रुपयांत कारागिराच्या कुटुंबास प्रारंभ करतां येतो. कारखान्याशीं तुलना केल्यास तितक्या भांडवलांत त्यांत रोजगाराची शक्यता दहा ते पंधरा, इतकेंच काय वीस पटीनें अधिक आहे. छोट्या उद्योगधंद्यांत उत्पादन आणि मालाचा उठाव फार लवकर होतो व त्यापासून फायदेहि लवकर मिळूं शकतात.

छोट्या उद्योगधंद्यांचा आणखी एक फायदा म्हणजे ते उद्योगधंदे देशांत सर्वत्र विखुरलेले असतात व त्याचा परिणाम म्हणून उत्पादन व क्रयशक्ति यांतील वाढहि तशीच विखुरली जाऊन त्यायोगें, विशेषतः ग्रामीण विभागांतून व लहान शहरांतून, स्थानिक अर्थव्यवहारांना चालना मिळते. मोठमोठ्या कारखान्यांत उत्पादन करतांना कामगारांसाठीं ज्या सुखसोयी कराव्या लागतात, त्यांची गरज न उरल्यामुळें घरांची सोय, वहातूक, यांचा खर्च कमी होऊन त्याबाबतच्या अडचणीहि राहात नाहींत.

## बेकारीवर उपाययोजना

अशा प्रकारें फायदे असल्यामुळें आणि बेकारीचें संकट शक्य तितक्या लवकर नाहींसें करण्याची गरज असल्यामुळें छोट्या उद्योगधंद्यांद्वारें शक्य तितकें काम उत्पन्न करावें आणि याचबरोबर शक्य तितकें अधिक भांडवल गुंतवून अवजड उद्योगधंदे उभारून औद्योगीकरणाचाहि भक्कम पाया घातला जावा यावर आम्ही भर कां देतों तें स्पष्ट होईल.

कारखान्यांत तयार झालेल्या वस्तूंच्या किंमतींपेक्षा हस्तव्यवसायाच्या त्याच दर्जाच्या वस्तूंच्या किंमती कांहीं प्रकरणीं अधिक असतील याची मला कल्पना आहे. अशा प्रकरणीं कारखान्यांत तयार झालेल्या वस्तूंवर अबकारी कर बसवून दोन्ही किंमती सारख्या ठेवण्यांत याव्यात अशी सूचना मीं केलेली आहे.

बेकारीचा प्रश्न तांतडीनें सोडविण्यासाठी आणि कांहीं अंशीं आपल्याकडील अपुऱ्या भांडवलामुळेंच छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांस उत्तेजन देण्याच्या धोरणाचा प्रश्न उद्भवतो. परंतु आपल्या देशांत या उद्योगधंद्यांस महत्त्वाचें व कायमचें स्थान देतां येईल व तसें तें दिलेलें राहावें असें मला वाटतें.

बेकारीचा प्रश्न जसजसा सुटेल, विजेच्या पुरवठ्यांत जसजशी वाढ होईल आणि यंत्रसामुग्री तयार करण्याच्या धंद्याचा विकास होऊन पोलाद-उत्पादनांत जसजशी वाढ होईल तसतसें मोटर्स व छोट्या यंत्रांचें उत्पादन वाढेल. यंत्रांचा छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांतील कारागिरांस उपयोग होऊन दर माणशीं उत्पादनांतहि क्रमशः वाढ होईल. आपल्या देशांत तयार केलेल्या अत्यंत आधुनिक अशा यंत्रांच्याद्वारें आणि स्वस्त विजेच्या साह्यानें या उद्योगधंद्यांची उत्पादनशक्ति वाढविणें हें आपलें ध्येय असलें पाहिजे.

उद्योगधंद्यांचे दोन प्रकार कल्पिल्यानंतर देशाच्या आर्थिक घटींत छोट्या उद्योगधंद्यांस कायमचें स्थान कसें राहील याची

स्पष्ट कल्पना येईल. पहिला प्रकार म्हटला म्हणजे मोठ्या प्रमाणावर भांडवल लागणाऱ्या पोलाद, सिमेंट, खतें, यांसारख्या उद्योगधंद्यांचा. या उद्योगधंद्यांमुळें बेकारीचें प्रमाण प्रत्यक्षांत फारसें कमी होणार नाहीं. अशा बाबतींत आपण अत्याधुनिक यंत्रसामुग्री वापरली पाहिजे. तसेंच या धंद्यांत आपण शक्य तितकें स्वयंचालित यंत्रांच्या वापरास उत्तेजन दिलें पाहिजे. यामुळें आतिशय वाकबगार अशा तंत्रज्ञांची गरज बरीच कमी होईल.

दुसऱ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांत आधुनिक यंत्रसामुग्रीनें, छोट्या कारखान्यांत उत्पादन करतां येईल व राष्ट्राच्या दृष्टीनें तें अधिक किफायतशीर पडेल. (कारण, कामगारांच्या सामाजिक सोयींचा खर्च त्यांत पडणार नाहीं आणि शहरांत गर्दीहि व्हावयाची नाहीं.) असे उद्योगधंदे छोट्या व घरगुती स्वरूपांत विकसित होत राहावेत.

वीज, योग्य प्रकारचीं हत्यारें आणि विक्रीच्या सोयी यांच्या मदतीनें कलापूर्ण हस्तव्यवसायाच्या वस्तू छोट्या कारखान्यांत तयार झाल्या पाहिजेत. अखेरीस, मुख्यतः गांवांतच उपलब्ध असलेल्या कच्च्या मालापासून तेथेंच खप होण्यायोग्य वस्तू जेथें तयार करतां येतील अशा ठिकाणींच छोट्या प्रमाणावरील उत्पादन सुरू करण्यास उत्तेजन दिलें पाहिजे.

भारतांत आपल्याला स्वस्त विजेचा व आधुनिक हत्यारांचा वापर करून छोट्या प्रमाणावर व स्वरूपाचें उत्पादन करतां येईल, आणि तें उत्पादन मूलतः कारखान्यांतील उत्पादना-इतकेंच व्यवस्थित कमी खर्चात (राष्ट्रीय पातळीवर) होऊं शकेल.

## कारखान्यांतील उत्पादन

कारखान्यांत तयार होणाऱ्या ग्राहकोपयोगी मालाच्या उत्पादनांतहि धीरेधीरे मोठ्या प्रमाणावर वाढ होईल, हें अर्थातच आम्ही गृहीत धरीत आहोंत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांत अशा तऱ्हेच्या मालाच्या उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ करण्याची तरतूद आहे. तसेंच, अशा मालाच्या निर्यातीसहि उत्तेजन देण्यांत यावें.

उत्पादनाची कमाल मर्यादा ठरविण्याचा प्रश्न, छोट्या प्रमाणावरील व घरगुती उद्योगधंद्यांशीं स्पर्धा करणाऱ्या कारखान्यांच्या बाबतींतच उद्भवतो.

याबाबतचें मूलभूत धोरण आतां स्पष्ट आहे. मूलभूत उद्योगधंदे आणि आरोग्य, शिक्षण, इत्यादींचा नियोजित विकास करून आपण मागणींत वाढ घडवून आणतों. शक्यतों छोट्या आणि घरगुती उद्योगधंद्यांतील उत्पादनाद्वारें आणि जरूरच पडल्यास कारखान्यांतील ग्राहकोपयोगी उत्पादनांत नियोजित वाढ करून ही मागणी आपण पुरी करतों. उत्पादन आणि उत्पन्न जसजसें वाढतें तसतसा उत्पन्नांतील कांहीं भाग आपण परत भांडवलांत घालतों. नवीन उत्पादनाचें नवीन मागणीचा नियोजित समतोलपणा राखणें असा ह्या प्रक्रियेमागील हेतु असतो, आणि हें चक्र सारखें चालूच राहतें.

## सामाजिक दृष्टिकोन

मी आतांपर्यंत नियोजनाच्या आर्थिक व तांत्रिक बाजूंची चर्चा करीत होतों. आतां नियोजनाच्या सामाजिक बाजूचा विचार करूं या. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांत राष्ट्रीय उत्पन्न दर वर्षी पांच टक्क्यांनीं वाढविण्याचें आणि १११ लक्ष लोकांना काम पुरविण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे. बांधकाम धंद्यांत अधिक भांडवल गुंतविण्यानें, छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांतील उत्पादनांत वाढ करण्यानें आणि आरोग्य व शिक्षण-क्षेत्रांचा विकास होण्यानें गरीब जनतेस अधिक प्रमाणांत कामें मिळतील. यामुळें उत्पन्नाच्या वितरणांतील विषमतेचें प्रमाण कमी होईल.

किंमतीमानांतील समानता कायम राखण्यासाठी व आर्थिक साधनांत वाढ करण्यासाठी, तसेंच चैनीच्या वस्तूंची किंमत वाढविण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या वस्तूंवरील अबकारी करांत निरनिराळ्या दरांनीं आकारणी व्हावी असेंहि आम्हीं सुचविलें आहे. यामुळेंहि राहणीमानांतील विषमता कमी होईल. खर्चावराहि कर आकारावा असें माझें मत आहे. कारण त्यामुळें विषमता कमी होण्यास बरेंच साह्य मिळेल.

## सरकारी क्षेत्राची वाढ

'समाजवादी स्वरूपाची समाजरचना' निर्माण करण्याचें ध्येय समोर ठेवून मूलभूत उद्योगधंदे, मुख्यतः सरकारी क्षेत्रांतच म्हणजे सरकारी मालकीचे म्हणून सुरू केले जातील व वाढविण्यांत येईल. विकासाचा वेग जसजसा वाढत जाईल तसतसा सरकारला पैसा अधिक प्रमाणांत लागेल आणि हा पैसा उसनवारी करून, विविध कर बसवून व सरकारी उद्योगधंद्यांच्या व्यवहारांत मिळालेल्या नफ्यांतील पैसा घेऊन उभा करावा लागेल. ठरविलेला नफा निश्चितपणें मिळविण्याकरितां सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंदे वाढवावे लागतील. म्हणून खासगी उद्योगधंद्यांपेक्षा सरकारी क्षेत्रांतील धंद्यांची वाढ झपाट्यानें होईल. ही गोष्ट संसदेच्या निर्णयानुसार व पंतप्रधानांनीं जाहीर केलेल्या धोरणास अनुसरूनच होईल.

योजनाबद्ध आर्थिक व्यवस्थेत खासगी कारखान्यांना उत्पादनाच्या व भांडवल गुंतवणुकीच्या एकूण योजनेंत जमवून घ्यावेंच लागेल. परंतु या चौकटींत मात्र त्यांना भरपूर वाव राहील, वाढत्या अर्थव्यवहारांतून त्यांना हमखास बाजारपेठ मिळेल आणि सरकारकडूनहि शक्य तें सर्व साह्य व उत्तेजन मिळेल.

## लोकांच्या सहकार्याची आवश्यकता

राष्ट्रीय विकास मंडळानें संमत केलेल्या आणि आतां नियोजन मंडळाच्या कार्यास पायाभूत होत असलेल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतील कांहीं मुद्यांचा मीं थोडक्यांत परामर्ष घेतला आहे. अशा स्वरूपाच्या नियोजनासाठी तांत्रिक विश्लेषण आणि भौतिक, शास्त्रीय आणि तांत्रिक-दृष्ट्या विचार करण्याची आवश्यकता असते. अनेक तंत्रज्ञ, इंजिनियर, तंत्रविद्यातज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर, शिक्षक व व्यावसायिक कार्यकर्ते ही योजना आंखण्याकरितां व ती कार्यान्वित करण्यासाठी लागतील. राष्ट्रीय नियोजनांतील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीनें शास्त्रीय व तांत्रिक संशोधनाची सतत जरूरी आहे. कारभारात्मक यंत्रणेस मोठी जबाबदारी उचलावी लागेल आणि अखेरीस सर्व पातळीवरील लोकांचें सहकार्य वाढत्या प्रमाणावर मिळविलें पाहिजे. भौतिक प्रगतीच्या शर्यतींत आपण फारच मागें आहोंत. आतां मात्र आपण न लटपटतां गति वाढविली पाहिजे.

—पी. सी. महालनवीस

॥ श्री ॥

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

★ ॥ यशः श्री सदानंद कल्याणमस्तु ॥ ★

आणि मध्यम वर्गीय महाराष्ट्रीयांनीं आश्वासन दिलें

॥ तथास्तु। तथास्तु। तथास्तु। तथास्तु॥

(१) सिंडिकेटला यशःप्राप्ति झालेलीच आहे.
(२) येत्या हंगामांत साखरेचें उत्पादन एक कोटी रुपयांचें होऊन व स्पिरिटचें उत्पादन होऊन सिंडिकेट श्रीसंपन्न होईल.
(३) भागीदारांना २० टक्के नफा दिला म्हणजे आनंदम् अस्तु।
(४) पुणें विद्यापीठाला देणगी दिली म्हणजे कल्याणम् अस्तु।

## WAIT AND SEE

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना
यंदाची दिवाळी व नूतन वर्ष
सुखाचें व भरभराटीचें जावो!

९८० सदाशिव पेठ
पुणें २
दि. १ नोव्हेंबर १९५५

चंद्रशेखर गोविंद आगाशे
मॅनेजिंग एजंट

# मोठे उद्योगधंदे व बैठे उद्योगधंदे यांचें स्थान

## सुसंगत धोरणाची आवश्यकता

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्यें १९५१ मध्यें रचनात्मक कार्यक्रम सुरू झाल्यापासून कांहीं नवीन तात्त्विक व व्यावहारिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत, व सरकारनें गेल्या जानेवारीपासून समाजवादी आर्थिक धोरण स्वीकारल्यामुळें आणखीहि कांहीं प्रश्न निर्माण झाले आहेत. विनतारणाच्या नोटा किती प्रमाणांत व कशा आणि केव्हां विकासकार्यासाठीं प्रसृत करण्यांत याव्या, हा एक चर्चेचा विषय होऊन राहिला आहे. बेकारी आटोक्यांत आणण्यासाठीं कोणती उपाययोजना करावी हाहि एक चर्चेचा विषय आहे. कुळ-कायद्याचें स्वरूप आर्थिक जीवनाचा दूरवर विचार केला असतां कसें असावें, हाहि एक तीव्र मतभेदाचा प्रश्न बनला आहे. सार्वजनिक किंवा सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंदे व खासगी क्षेत्रांतील उद्योगधंदे यांचे अर्थव्यवहारांत परस्पर-संबंध कसे असावे हाहि एक चर्चेचा विषय बनला आहे. यंत्रशक्तीनें चालणारे मोठाले उद्योगधंदे व ग्रामीण विभागांतील बैठे उद्योगधंदे यांचें निश्चित स्थान अर्थव्यवहारांत कोणत्या प्रकारचें राहिलें पाहिजे व ग्रामीण विभागांतील बैठ्या उद्योगधंद्यांचा विकास कोणत्या प्रकारें साध्य करावा हा एक चर्चेचा प्रश्न झाला आहे. या लेखांत या बाबतींत निर्माण झालेल्या प्रश्नांच्या स्वरूपाबद्दल चर्चा थोडक्यांत केली आहे.

### उद्योगधंद्यांचें स्वरूप

औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळांत प्रत्येक देशांत घरोघर करतां येण्यासारखे बैठे उद्योगधंदे असत. हे सर्व बैठे उद्योगधंदे पूर्णपणें खासगी स्वरूपाचे असत. औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रशक्तीनें मोठ्या प्रमाणांत मालाचें उत्पादन करणारे मोठे उद्योगधंदे स्थापन झाले. सुरुवातीला व नंतर कित्येक वर्षें हे सर्व खासगी क्षेत्रांतीलच उद्योगधंदे असत. आर्थिक जीवनाच्या बाबतींत सरकार–नियंत्रणाची कल्पना गेल्या शतकाच्या मध्यानंतर निर्माण झाल्यावर उद्योगधंद्यांवर फॅक्टरी ॲक्टसुध्या रूपानें कांहीं नियंत्रणें आलीं. कंपन्यांबद्दलचा कायदा व प्राप्तीकर या गोष्टींमुळेंहि थोडीं अप्रत्यक्ष नियंत्रणें आलीं. लोकशाहीच्या कल्पनेचा जास्त विकास झाल्यावर, विशेषतः पहिल्या महायुद्धानंतरच्या काळांत, सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांना पाश्चिमात्य देशांत अल्प प्रमाणांत सुरुवात झाली. सोव्हिएट रशियाची स्थापना व जर्मनी–इटाली या देशांतील सर्वसत्ताधीश (टॉटॅलिटेरिअन स्टेट) सरकार यामुळें सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांना महत्त्व येत चाललें. हिंदुस्थानांतहि रेल्वे सरकारी मालकीच्या झाल्या. दुसऱ्या महायुद्धांतील व नंतरची परिस्थिति यामुळें सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचें प्रमाण प्रत्येक सुधारलेल्या देशांत थोडेंसें वाढत गेलें. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत व नंतर कांहीं उद्योगधंद्यांचें सरकारकडून संपूर्ण नियंत्रण केलें जाऊं लागलें, व कांहीं देशांत आयात–निर्यात व्यापारावरहि आर्थिक जीवनाच्या सोयीसाठीं सरकारनें नियंत्रणें ठेवण्याची पद्धति सुरू केली. भारतांतहि परराष्ट्रीय व्यापाराचे बाबतींत नियंत्रणें सुरू झालीं. याच काळांत सरकारी मालकीच्या किंवा पूर्णपणें सरकारी नियंत्रणाखालीं असलेल्या उद्योगधंद्यांचें प्रमाण हळु हळु वाढत गेलें. औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रांतील हे फरक स्पष्टपणें समजण्यासाठीं 'पब्लिक सेक्टर' म्हणजे 'सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्र' हा शब्दप्रयोग रूढ झाला. अर्थशास्त्रीय परिभाषेच्या दृष्टीनें पब्लिक सेक्टर व प्रायव्हेट सेक्टर (खासगी क्षेत्रांतील उद्योगधंदे) हे शब्दप्रयोग अगदीं अलीकडचे आहेत. मोठ्या प्रमाणांत संपत्तीचें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांतच ही भाषा प्रामुख्यानें रूढ झाली आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळें बैठे उद्योगधंदेहि यंत्रशक्तीनें चालवितां येतात. यामुळें बैठ्या उद्योगधंद्यांच्या बाबतींत केवळ पूर्वीप्रमाणें हातानें म्हणजे मानवी श्रमानें चालविले जाणारे धंदे व यंत्रशक्तीनें चालविले जाणारे उद्योगधंदे हा फरक निर्माण झाला आहे. मोठे व छोटे किंवा बैठे उद्योगधंदे यांचा विचार करतांना सरकारी क्षेत्रांतील मोठे उद्योगधंदे, खासगी क्षेत्रांतील मोठे उद्योगधंदे, यंत्रशक्तीनें चालणारे बैठे उद्योगधंदे व पूर्वीप्रमाणें केवळ मानवी श्रमांनीं चालविले जाणारे बैठे उद्योगधंदे, असे चार प्रकार आपण लक्षांत घेतले पाहिजेत. आज देशामध्यें निर्माण झालेले प्रश्न या चारहि प्रकारांबद्दल आहेत, व या प्रत्येक प्रकाराचें आपल्या रचनात्मक कार्यक्रमांत किंवा अर्थव्यवहारांत कोणतें निश्चित स्थान असलें पाहिजे, हा चर्चेचा व विचाराचा मुख्य प्रश्न आहे.

### सरकारचें गुंतागुंतीचें आर्थिक धोरण

भारतांतील आजच्या परिस्थितीचा विचार करतांना असें दिसतें कीं, १९४८ चें भारत सरकारनें जाहीर केलेलें औद्योगिक धोरण, स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर भारत सरकारनें सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांची केलेली वाढ, इंडस्ट्रीज कंट्रोल बिलानें खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांवर ठेवलेलीं वाढतीं नियंत्रणें, कंपन्यांच्या कायद्यांत केली जाणारी महत्त्वाची दुरुस्ती, नुकसानभरपाई देण्याच्या बाबतींत राज्यघटनेंत करण्यांत आलेली दुरुस्ती, गेल्या वर्षी स्थापन झालेल्या मुंबईनजिकच्या तेलशुद्धीकरणाच्या कारखान्यांच्या स्थापनेच्या बाबतींतील सरकारी धोरण, कापड धंद्याची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कानुंगो कमिटीचा अहवाल, समाजवादी आर्थिक धोरणाचें तत्त्व कृतींत आणण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या गोष्टी, कामगार कल्याण साध्य करण्यासाठीं केलेल्या निरनिराळ्या कायद्यांची अंमलबजावणी, काड्यांच्या पेट्या, तेलाचे घाणे व तांदूळ सडणें या बैठ्या उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठीं स्वीकारलेलें धोरण व सरकारच्या करविषयक धोरणाचा खासगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांवर भांडवल गुंतवणुकीच्या बाबतींत झालेला परिणाम, इत्यादि अनेक गोष्टींवरून सरकारचें सरकारी मालकीच्या व खासगी क्षेत्रांतील मोठ्या उद्योगधंद्यांच्या बाबतींतील व बैठ्या उद्योगधंद्यांच्या बाबतींतील धोरण दिसून येतें. हें धोरण अतिशय गुंतागुंतीचें झालें आहे व सरकारच्या धोरणांत कांहीं वेळां विसंगति दिसून येते. औद्योगिक उत्पादन वाढविणें, बैठ्या उद्योगधंद्यांचा विशेष रीतीनें प्रसार करणें, सरकारी मालकीच्या उद्योगधंद्यांचें क्षेत्र विस्तृत करणें, बेकारी दूर करणें व खासगी क्षेत्रांतील मोठाल्या धंद्यांच्या चालकांनाहि कांहींसें खुष करणें, अशा सर्व गोष्टी एकदम साध्य करण्याचें सरकारचें धोरण दिसतें व त्यामुळें हा सर्व प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे.

### धोरणांतील विसंगतीचे कांहीं नमुने

वास्तविक, १९४८ चें सरकारी धोरण स्पष्ट करणाऱ्या ठरावाप्रमाणें, तेलशुद्धिकरणाचा धंदा हा मूलभूत स्वरूपाचा धंदा असून तो पूर्णतः सरकारी क्षेत्रांत समाविष्ट झाला पाहिजे. परंतु गेल्या वर्षी परकी भांडवलानें मुंबईनजिक तुर्भे येथें स्थापन झालेल्या दोन तेलशुद्धि करणाऱ्या कारखान्यांच्या बाबतींत सरकारनें अपवाद करून अगदीं निराळें धोरण विशिष्ट परिस्थिती-मुळें स्वीकारलें. परकी भांडवलदारांना दीर्घ मुदतीनें सवलतीच्या अटी देण्यांत आल्या आहेत, धंद्यांतील नफा परदेशांत पाठ-विण्याची सवलत देण्यांत आली आहे व वीस वर्षांनीं कदाचित् राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्यास परकी भांडवलदारांना योग्य ती नुकसानभरपाई दिली जाईल, अशा या उदार अटी आहेत. सरकारनें दिलेल्या या उदार सवलतींविरुद्ध भारतांतील प्रमुख कारखानदार व व्यापारी संघटनांनीं आपलें मत स्पष्टपणें सरका-रला कळविलें होतें. याच प्रकरणांतील दुसरी गोष्ट म्हणजे ऑगस्ट, १९५१ पासून किनाऱ्यावरील जलवाहतूक देशी जहाजांसाठी पूर्णपणें राखून ठेवण्यांत आली आहे.

तरीपण, किनाऱ्यावरील तेलवाहतुकीसाठी पूर्णपणें परदेशी टँकर्सचाच उपयोग केला जातो. वास्तविक असें धोरण ठेवावयास नको होतें; कारण यामुळें भारतीय जलवाहतूक धंद्याचा तोटा होतो. समाजवादी आर्थिक धोरणाच्या उद्दिष्टाच्या दृष्टीनें, भारतांत स्थापन होऊन उत्पादन व व्यापार करणाऱ्या परकी कंपन्यांवर सरकारनें निदान आतांतरी नियंत्रणें ठेवलीं पाहिजेत. अशा परकी कारखानदारांचा व्याप देशी भांडवलदारांच्या धंद्याच्या हिताच्या आड येत नाहीं एवढी तरी दक्षता सरकारनें दाखविणें आवश्यक आहे. परंतु या दृष्टीनें अद्याप कांहींहि करण्यांत आलेलें नाहीं, व सरकार या उद्देशानें कांहीं करील असेंहि दिसत नाहीं. देशी साबण कारखानदारांची, भारतांत उत्पादन करणाऱ्या परदेशी मालकीच्या कारखान्यांविरुद्ध तक्रार जुनीच आहे; परंतु पुस्तकें प्रसिद्ध करणें व विकणें याहि व्यवसायांत रुपयाच्या भांडवलांत स्थापन झालेल्या परकी कंपन्या देशी प्रकाशन व विक्री करणाऱ्या कंपन्यांशीं स्पर्धा करीत आहेत! चहाचे मळे, कोळशाच्या खाणी, तागाच्या गिरण्या व कांहीं रासायनिक कारखाने यांच्या बाबतींत परदेशी भांडवल तर कित्येक वर्षां-पूर्वीपासून कायमचें गुंतविलें गेलें आहे.

### रॅशनलायझेशन

यांत्रिक शक्तीनें चालणाऱ्या मोठाल्या उद्योगधंद्यांचें उत्पादन वाढविण्यासाठी योग्य प्रकारें धंद्यांत सर्व प्रकारच्या अद्ययावत् सुधारणा किंवा बाजवीकरण (रॅशनलायझेशन) केलें पाहिजे. आज परिस्थिति अशी दिसते कीं कांहीं कापडगिरण्यांचे मालक अशा प्रकारच्या सुधारणांना तयार आहेत, परंतु कामगारवर्गीचें तात्पुरतें कल्याण साधण्याच्या दृष्टीनें खुद्द सरकारच धंद्यांतील बाजवीकरणाला परवानगी देत नाहीं. आर्थिक धोरणांतील ही एक विसंगति आहे. कापड-उत्पादन व कापड-विक्री या धंद्यांत गेलीं तीन वर्षें तीव्र जागतिक स्पर्धा निर्माण झाली आहे. कापड-धंद्यांतील प्रमुख लोक या धंद्याचा जागतिक पातळीवरून विचार करतात व त्या दृष्टीनें उत्पादनाच्या व विक्रीच्या बाबतींत धोरण आंखण्याचा प्रयत्न करीत आहेत, हें १९५२ अखेर लंडन-नजिक बक्सटन येथें भरलेल्या जागतिक कापड कारखानदारां-च्या परिषदेपासून आपल्याला स्पष्ट दिसत आहे. गेल्या वर्षी कापसाच्या उत्पादनांतहि बरीच वाढ झाली आहे व त्यामुळें कापडधंद्यांत नवीनच अडचण निर्माण होईल. भारताचें कापड वर्षाला निदान १०० कोटि वार परदेशांकडे निर्गत करावयाचें उद्दिष्ट साधावयाचें असेल तर कापडगिरण्यांच्या बाजवीकरणाला सरकारनें परवानगी दिली पाहिजे.

### मतभेदाला अवसर नको

कापडधंद्यासाठी नेमण्यांत आलेल्या कानुगो कमिटीनें सरकार गेलीं तीन वर्षें ज्या पद्धतीनें हातमागाच्या बेढ्या धंद्याला मदत करीत आहे त्या पद्धतीविरुद्ध आपलें मत व्यक्त केलें आहे व कापडगिरण्यांच्या बाजवीकरणालाहि या कमिटीचा अभिप्राय अनुकूल आहे. परंतु तांदूळ सडण्याच्या धंद्याची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिटीनें तांदूळ सडण्याच्या यंत्रशक्तीनें चालणाऱ्या लहान-लहान गिरण्याहि पांच वर्षांत बंद कराव्या व हातानें तांदुळ सडण्याच्या जुन्या धंद्याचें पुनरुज्जीवन करावें म्हणजे निदान ४० लक्ष लोकांना रोजगारी मिळेल असें मत व्यक्त केलें आहे. थोडक्यांत, दोन स्वतंत्र कमिट्यांनीं दोन भिन्न व्यवसायांच्या बाबतींत आमूलाग्र भिन्न असा अभिप्राय व्यक्त केला आहे. अशा परिस्थितींत कोणता अभिप्राय योग्य मानाव-याचा, हा सरकारपुढेंहि प्रश्न आहेच. कारण, दोनहि कमिट्या सरकारनें नेमिलेल्या, व प्रत्येक कमिटीचा दृष्टिकोन भिन्न आहे. वास्तविक रचनात्मक कार्यक्रमासाठी सर्व प्रकारच्या साधनसामु-ग्रीचा जास्तींत जास्त उपयोग केला पाहिजे व युद्धप्रयत्नांप्रमाणेंच जणूं कांहीं उत्पादनाच्या कार्यासाठी शक्ति एकवटली पाहिजे. अशा वेळीं, अशीं भिन्न मतें मतभेदाला अवसर देणारीं व्यक्त केलीं जावीं हेंहि योग्य नव्हे. सरकारी मालकीचें क्षेत्र आणखी विस्तृत करावयाचें आहे व खासगी क्षेत्र आणखी मर्यादित करावयाचें आहे अशी भाषा कांहीं कांहीं वेळां बोलली जाते, तर सरकारी व खासगी या दोनहि औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रांत समन्वय साधावयाचा आहे व त्या दोहोंमध्यें एकसूत्रीपणा साधावयाचा आहे अशीहि भाषा कांहीं वेळां जबाबदार सरकारी अधिकाऱ्यां-कडून बोलली जाते. यामुळें मतभेद निर्माण होण्याला अवसर मिळतो. पोलादाच्या धंद्यांत विकासासाठी धंद्यामध्यें जास्त भांडवल गुंतवितां यावें म्हणून सरकार वेळोवेळीं पोलादाच्या उत्पादनाची हिशेबासाठी कारखानदारांनीं आकारावयाची किंमत वाढवून देते, त्याच तत्त्वावर सिमेंटची विक्रीची किंमत धंद्यांत भांडवल गुंतविण्यासाठी वाढवून द्यावी अशी मागणी सिमेंटच्या कारखान-दारांनीं केल्यास त्यांत गैर काय आहे? परंतु सिमेंट कारखान-दारांची या स्वरूपाची मागणी मान्य करण्यांत आली नाहीं.

### खासगी क्षेत्राला अपुरें महत्त्व

मूलभूत उद्योगधंद्यांच्या बाबतींत सरकारचें धोरण यापुढें एकसूत्रीपणाचें राहील असें दिसत आहे. पोलादाचे तीन कारखाने दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सहकारी नेतृत्वानें निघणार आहेत. या तीन कारखान्यांना निदान ४५० कोटि रु. भांडवल लागेल व सरकारनें परवानगी दिली तरीहि खासगी भांडवलदार या बाबतींत कांहीं करूं शकणार नाहींत. म्हैसूर-मधील सोन्याच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्याचें म्हैसूर सरकारनें ठरविलें आहे. आसामांत तेलाच्या दृष्टीनें पाहाणी करून तेल निर्मितीसाठी सरकारी भांडवल व परकीय भांडवल यांच्या सहकार्यानें एक नवीन धर्तीवर प्रयत्न केला जात आहे. आज सरकार उत्पादन करीत असलेल्या इतर मालाच्या किंवा वस्तूंच्या बाबतींतहि (उ० जहाजें बांधणें, रेल्वे इंजिनें व उतारूंचे व मालाचे डबे बांधणें, टेलिफोन्स, रासायनिक खतें, पेनिसिलीन इ.)

कोणाचा मतभेद दिसून येत नाहीं. सामान्यपणें सरकारी क्षेत्रांतली प्रगति समाधानकारक असली तरी विमानवाहतुकीचें १९५३ च्या मध्यानंतर राष्ट्रीयीकरण झाल्यापासून विमान-वाहतुक-धंद्यांत खाजगी मालकीचा धंदा असतांना झालेल्या तोट्यापेक्षा जास्त प्रमाणांत तोटा होत आहे, ही गोष्ट स्पष्टपणें निदर्शनास येऊन टीकेचा विषय बनली आहे. विजगापट्टम् येथें जहाजें बांधण्याचें काम मंद गतीनें चालतें व त्याला खर्चीहि जास्त येतो. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या दुरुस्त अंदाजाप्रमाणें सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांत ८४ कोटि, ७ लक्ष रु. गुंतविले जातील. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांत सुमारें १००० कोटि रु. गुंतविले जातील असा अंदाज दिसत आहे. खाजगी क्षेत्रांतील मोठाल्या उद्योगधंद्यांत १९५६-६१ च्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत सुमारें ४०० कोटि रु. गुंतविले जावे असा अंदाज करण्यांत आला आहे. हे आंकडे खाजगी कारखानदारांच्या क्षेत्राला अगदीं मर्यादित महत्त्व देण्यांत आलें आहे असें दाखवितात. कारखानदार संघटनांच्या विचारसरणी प्रमाणें गेल्या पांच वर्षांत अर्थव्यवहाराची प्रगति घडवून आणण्याच्या बाबतींत खासगी क्षेत्रानें भरीव कार्य केलें असतांहि, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत खासगी क्षेत्राला अगदीं मर्यादित किंबहुना फारच अपुरें स्थान देण्यांत आलें आहे. सेंट्रल स्टॅटिस्टिकल ऑर्गनायझेशनच्या मताप्रमाणें खासगी क्षेत्रानें १९५१-५४ या तीन वर्षांत १३४५ कोटि रु. भांडवल गुंतवणूक केली. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक (१९५६-६१) योजनेंत, खासगी क्षेत्राला २२०० कोटि रु. ठेवण्यांत आले आहेत. सरकारी क्षेत्राला मात्र ३४०० कोटि रु. ठेवण्यांत आले आहेत. याप्रमाणें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारी क्षेत्राच्या मानानें, खासगी क्षेत्राला फारच मर्यादित स्थान देण्यांत आलें आहे. दोनहि क्षेत्रांचे तुलनात्मक महत्त्व हा एक अलिकडे वादाचा मुद्दा बनला आहे.

### उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाला मर्यादा

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, उपभोग्य मालाचें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांना मर्यादित महत्त्व देण्यांत आलें आहे. अशा मालाचें (कापड, साखर, औषधें, इ.) उत्पादन करणारे उद्योगधंदे खासगी क्षेत्रांतील आहेत व त्यांपैकीं पुष्कळसे धंदे यंत्रशक्तीनें मोठ्या प्रमाणांत उत्पादन करणारे आहेत. सरकारचा उद्देश औद्योगिक जीवनाची पार्श्वभूमि बळकट करण्यासाठीं मूलभुत उद्योगधंद्यांवर भर देणें हा आहे व तो योग्यहि आहे. बेकारीच्या प्रश्नानें गेल्या दोन वर्षांत उग्र स्वरूप धारण केलें आहे. तेव्हां ग्रामीण विभागांत बैठ्या उद्योगधंद्यांच्या विकासावर विशेष भर देऊन मोठ्या प्रमाणांत नवीन रोजगारी किंवा कामधंदा निर्माण करावयाचा आहे. केवळ मानवी श्रमानें केल्या जाणाऱ्या बैठ्या उद्योगधंद्यांवर भर दिला तर त्यामुळें पुष्कळांना कामधंदा मिळेल हें खरें असलें तरी त्यामुळें आर्थिक व्यवहाराची प्रगति होणार नाहीं, जनतेचें राहाणीचें मान सुधारणार नाहीं व उच्च दर्जाच्या विमा-बँकिंग-व्यापार-वाहतूक या प्रकारच्या व्यवसायांची मुळींच प्रगति होणार नाहीं. यामुळें बैठ्या उद्योगधंद्यांच्या विकासावर वाजवीपेक्षा जास्त भर देणें परिणामीं योग्य ठरणार नाहीं, असें खाजगी क्षेत्रांतील अनेक अनुभवी कारखानदारांचें मत आहे व तें योग्यहि आहे. सर विश्वेश्वरय्या सांगतात त्याप्रमाणें, विजेच्या शक्तीनें चालणारे बैठे उद्योगधंदे खेडेगांवांतून घरोघर निघाले पाहिजेत, व अशा बैठ्या यंत्रशक्तीनें चालणाऱ्या धंद्यांनीं अनेक सुटे लहान लहान भाग जपान किंवा स्वित्झर्लंडप्रमाणें मोठाल्या कारखानदारांना पुरविलें पाहिजेत. भारताच्या औद्योगिक जीवनांत मोठाले उद्योगधंदे व बैठे उद्योगधंदे यांच्यांत समतोलपणा राखला गेला पाहिजे. परदेशांची बाजारपेठ भारताला फार मोठ्या प्रमाणांत खुली नाहीं हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे. देशाचें कृषिप्रधान स्वरूप बरेंचसें कायम राहणार हें जाणूनच मूलभूत उद्योगधंदे, मोठ्या प्रमाणांतील उद्योगधंदे व बैठे उद्योगधंदे यांच्यांत योग्य तो संबंध राखला पाहिजे. परंतु कापड धंद्यावर कर बसवून हातमागाच्या बैठ्या उद्योगधंद्याला उत्तेजन देणें, कारखान्यांत तयार होणाऱ्या कापड्याच्या पेटंट्यांवर जकात बसवून बैठ्या कापडाच्या पेट्याच्या धंद्याला उत्तेजन देणें, भात दळणाऱ्या गिरण्या बंद करून हातानें तांदूळ सडण्याचा धंदा सुरू करणें, अशा प्रकारचे मार्ग कितपत योग्य ठरतील हा विचाराचा प्रश्न आहे. हे मार्ग आर्थिक प्रगतीच्या निःसंशय आड येतील. सुधारलेलें आर्थिक जीवन या मार्गांनीं साध्य होणार नाहीं. कसेंबसें जगावयाचें एवढेंच उद्दिष्ट असल्यास तें कदाचित् साध्य होईल. मूलभूत उद्योगधंद्यांना उत्तेजन द्यावयाचें, व बेकारी दूर करण्यासाठीं ग्रामीण विभागांत बैठ्या उद्योगधंद्यांच्या विकासावर भर द्यावयाचा हें धोरण व्यवहाराच्या दृष्टीनें कसें चुकीचें आहे याचें मार्मिक विवेचन प्रसिद्ध उद्योगपती श्री. जे. आर. डी. टाटा यांनीं नुकतेंच एका प्रसंगीं केलें आहे.* कारखान्यांत तयार होणाऱ्या कापड, इत्यादि उपभोग्य मालाचें उत्पादन मर्यादित ठेवलें तर परिणामीं चलन-विस्तारामुळें उद्भवणाऱ्या महागाईचें संकट ओढवेल असाहि इशारा या प्रसंगीं श्री. टाटा यांनीं दिला. सरकारी धोरणामध्यें स्वाभाविक रीतीनें आर्थिक प्रगति कशी होते या गोष्टीकडे दुर्लक्ष केलेलें आढळतें, असेंहि श्री. टाटा म्हणाले. उपभोग्य वस्तूंचा तुटवडा, व मूलभूत उद्योगधंद्यांचा माल कांहीं प्रमाणांत पडून रहाणें अशी विचित्र परिस्थिति सरकारी धोरणामुळें निर्माण होईल. भारत सरकारचे आकडेशास्त्रविषयक सल्लागार प्रो. महालनबीस यांचें म्हणणें असें आहे कीं मोठाल्या कारखान्यांत तयार होणाऱ्या उपभोग्य मालाचा तुटवडा पडतो असें आढळून आल्यास सरकार त्वरित अशा मालाचें उत्पादन वाढविण्याबद्दल सूचना देईल. बेकारीचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठीं देशांतील जनतेची क्रयशक्तिच वाढविली पाहिजे, व ही गोष्ट विचारपूर्वक योजना करून मूलभूल उद्योगधंद्यांत भांडवल गुंतवून व सामाजिक सुखसोयी पुरवूनच साध्य होईल.** सरकारनें स्वीकारलेल्या करपद्धतीमुळें व कामगारविषयक कायद्यांमुळें कराव्या लागणाऱ्या वाढत्या खर्चामुळें खासगी रीत्या उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याची प्रवृत्ति यापुढें बरीच कमी होईल, असें मत श्री. जे. आर. डी. टाटा व इतर कारखानदार पुढारी यांनीं गेल्या कांहीं महिन्यांत कंपन्यांच्या वार्षिक सभांच्या वेळीं व निरनिराळ्या व्यापारी-कारखानदार संघटनांच्या त्रैमासिक व इतर सभांपुढें व्यक्त केलें आहे. खासगी क्षेत्राचें (प्रायव्हेट सेक्टर) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत कोणतें स्थान रहाणार याबद्दल बराच गैरसमज निर्माण झाला आहे. विशेषतः कारखानदारवर्गामध्यें अनिश्चितता उद्भवली आहे. सरकारी क्षेत्र वाजवीपेक्षा जास्त

---

* श्री. जे. आर. डी. टाटा यांचें टाटा आयर्न अँड स्टील कंपनीच्या भागीदारांच्या ४८ व्या वार्षिक सभेपुढील ता. २५ ऑगस्ट, १९५५ चें भाषण. टाईम्स ऑफ इंडिया २६ ऑगस्ट, १९५५.

** टाइम्स ऑफ इंडिया, २५ ऑगस्ट १९५५. प्रो. महालनबीस यांची प्रसिद्ध झालेलीं मतें.

वाढविण्यावर भर असल्यामुळें खासगी क्षेत्राला योग्य तें स्थान मिळणार नाहीं असें पुष्कळांना वाटतें. परंतु दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील औद्योगिक क्षेत्रांतील विकासकार्याचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं धंद्याच्या संघटनेच्या प्रश्नांचा व तांत्रिकदृष्ट्या विकासाचा विचार करावा लागेल व अर्थव्यवहारांतील निरानिराळ्या प्रश्नांकडे बुद्धिवादी मूलभूत दृष्टीनें पहावें लागेल, असें मत सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रो. सी. एन्. वकील यांनीं नुकतेंच व्यक्त केलें आहे.* आपल्या आर्थिक जीवनाचे प्रश्न व त्यांचें स्वरूप बारकाईनें निरीक्षण करून विचारपूर्वक उपाययोजना केली पाहिजे.

### विवेचनाचा सारांश व भावी आशा

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेबद्दल आतांपर्यंत जें कांहीं प्रसिद्ध झालें आहे व त्या आधारावर मागील अनुभव विचारांत घेऊन जी चर्चा केली गेली आहे त्यांतील एक मुख्य वादाचा मुद्दा, मोठे उद्योगधंदे व बैठे उद्योगधंदे यांच्या स्थानाबद्दलचा आहे. या मुद्याशीं प्रत्यक्ष जास्त संबंध सरकार व कारखानदार यांचा येतो. आतांपर्यंत भारताची आर्थिक प्रगति साधण्यासाठी खासगी क्षेत्रानेंच फार मोठी कामगिरी बजावली आहे. समाजवादी आर्थिक धोरण व काळाचा बदललेला ओघ यांमुळें सरकारी क्षेत्राचें महत्त्व निश्चित वाढत जाणार. तरीहि समतोल आणि टिकाऊ आर्थिक प्रगति साधण्यासाठी अजूनहि कित्येक गोष्टी खासगी क्षेत्राकडे ठेवल्या जाणार हें निश्चित. तेव्हां खासगी क्षेत्राचें सहकार्य पूर्णपणें साधण्यासाठी मतभेद शक्य तितके दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या बाबतींत सरकारच सर्व प्रकारचे गैरसमज दूर करावयास समर्थ आहे. आज मोठे व बैठे उद्योगधंदे यांच्या बाबतींत उत्पन्न झालेले प्रश्न खासगी क्षेत्राचें निश्चित स्थान कोणतें व बेकारीचा प्रश्न कसा सोडवावा या मुद्यावरील मूलभूत मतभेदामुळें निर्माण झाले आहेत.

गांधीवादी विचारसरणीमुळें भारून गेलेलें सरकार बैठ्या उद्योगधंद्यांच्या प्रश्नांकडे एका विशिष्ट दृष्टिकोनांतून पहातें असें कांहीं वेळां तरी दिसतें. यामुळें सर विश्वेश्वरय्या यांच्यासारख्या मोठ्या आदरणीय व्यक्तींचीं मतेंहि सरकारी धोरणाला मानवत नाहींत असें वाटतें. श्री. जे. आर. डी टाटा यांच्या सारख्यांचीं मतें दीर्घ अनुभवावर आधारलेलीं आहेत व तींहि विचार करण्यासारखीं आहेत. प्रो. महालनवीस म्हणतात त्याप्रमाणें उपभोग्य यांत्रिक मालाचा तुटवडा आढळून आला तर त्या मालाच्या उत्पादनाकडे जास्त लक्ष दिलें जाईल. याबद्दल असें वाटतें कीं दरम्यानच्या काळांत नको असलेल्या हातानें करावयाच्या ग्रामोद्योगावर भर दिल्यानें श्रमशक्ति वाया जाईल त्याचें काय व कांहीं यांत्रिक उद्योगधंद्यांची उत्पादनशक्ति केवळ पडून राहील त्याचें काय? परराष्ट्रांकडे विशेष निर्गत करण्यावर भर देऊन भारताचें चालणार नाहीं; मूलभूत उद्योगधंद्यांचा योग्य विकास व ग्रामीण विभागांतील श्रमशक्तीचा उपयोग या मार्गानींच भारताची आर्थिक प्रगति घडून येईल. यासाठी, अनुभव व व्यवहार यांच्या दृष्टिकोनांतूनच मतभेदाचे प्रश्न सोडविणें श्रेयस्कर ठरेल.

— भा. म. काळे

* ऑल इंडिया रेडिओ मुंबई. "एकॉनॉमिक ट्रेंड्स" या व्याख्यानमालेंतील प्रो. वकील यांचें भाषण. ता. १७ ऑगस्ट, १९५५.

WILICO

— आपणांस —
नवीन वर्ष सुखाचें जावो !
आजहि वेस्टर्नच्या विम्यानें अल्पखर्चांत जास्त रकमेचा लाभ होतो
वेस्टर्नचा विमा घेऊन
दीपावलीचा आनंद द्विगुणित व चिरकालीन करा.

वेस्टर्न इंडिया
विमा कं. लि., सातारा.

पुणें शाखा :
वेस्टर्न इंडिया हाउस, लक्ष्मीरोड, पुणें नं. २.
फोन नं. १४०१

रजिस्टर नंबर ७२१८        स्थापना १९३५
सातारा जिल्हा को-ऑपरेटिव्ह लँडमॉर्गेज बँक, लि.

शेतकरी बांधवांच्या कर्जाची खास सोय !
शेतकरी लोकांना कर्जातून मोकळें होणेची, जमीन सुधारणेची, विहीर दुरुस्त करणेंची, अगर नवीन विहीर काढणेची, इंजिनादि यंत्रसामुग्री खरेदी करणेची अगर जमीन खरेदी करणेची अमूल्य संधि !
हेड ऑफिस, कराड ——→•←—— ब्रँच ऑफिस, सांगली

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. २,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. १,०२,००० |
| खेळतें भांडवल | रु. १५,००,०००चे वर |
| वांटलेलें कर्ज | रु. २०,००,००० |

सुरुवातीपासून बँकेचा ऑडिट वर्ग "अ"
व्याजाचे दर:—

| | |
|---|---|
| विहीर व विहीर दुरुस्ती | ४½% |
| शेती व यंत्रसामुग्रीकरितां | ५½% |
| जमीन-खरेदी व जुनें कर्ज भागविणें | ७½% |

म. सि. पुटाणी, मॅनेजर.        नीलकंठ आण्णाप्पा कल्याणी, चेअरमन.

# भारतामधील लिमिटेड कंपन्या

## गेल्या शंभर वर्षांचा आढावा

भारतीय सरकारच्या अर्थखात्यातर्फे कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीसंबंधी एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. १८५० पासून भारतांत जॉइंट स्टॉक कंपन्यांची वाढ कसकसी होत गेली त्याची माहिती अहवालांत देण्यांत आली आहे. गेल्या शंभर वर्षांत भारतांत जी औद्योगिक प्रगति झाली तिचा हा इतिहासच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८५० सालीं भारतांत प्रथमच जॉइंट स्टॉक कंपनीचा कायदेशीर जन्म झाला आणि १८५७ सालीं मर्यादित जबाबदारीचें तत्त्व स्वीकारण्यांत आलें. १८८२ सालीं भारतांत जितक्या कंपन्या होत्या त्यापेक्षा गेल्या पाऊणशें वर्षांत त्यांची संख्या ५९ पटीनें वाढली आणि त्यांचें वसूल भांडवलहि ६३ पटीनें वाढलें. १८८२ ते १९०० पर्यंतच्या कालांत कोळसा, चहा, कापड, ताग, बँका, इत्यादि विवक्षित औद्योगिक गोष्टी कंपन्यांच्या क्षेत्रांत आल्या होत्या. पण पुढें सर्व प्रकारचे उद्योगधंदे कंपन्यांच्या कक्षेत आले. १९२० सालानंतर भारतांत औद्योगिक युग सुरू झालें आणि १९४७ सालीं स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कंपन्यांचे औद्योगिक कार्यक्रम आणखी बऱ्याच प्रमाणांत विस्तार पावले. नुकताच मंजूर झालेला कंपनी कायदा ह्या विषयासंबंधींचा व्यापक असा ५ वा कायदा आहे. १९३९ ते १९४५ ह्या कालांत भारतामध्यें ३,७४५ नव्या कंपन्यांची भर पडली आणि त्यांचें वसूल भांडवलहि १०० कोटी रुपयांनीं वाढलें. पण त्याचबरोबर व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांतील कारभारांत बऱ्याच अनिष्ट गोष्टींचा प्रादुर्भाव झाला. १९३६ च्या दुरुस्त कंपनी कायद्यांतील कलमांच्या आधारानें त्या गोष्टींना आळा घालतां येणें अशक्य होऊं लागलें. १९४७ सालीं भारत स्वतंत्र झाला आणि १९५० सालीं भारताची घटना मंजूर झाली. त्याचबरोबर भारताच्या आर्थिक व राजकीय तत्त्वज्ञानांतहि बदल झाला. गेल्या कांहीं वर्षांतील घडामोडी आणि कंपन्यांच्या कारभारांतील लांछनास्पद व्यवहार ह्यांचा विचार करतां, ह्यासंबंधी कायदा व सुव्यवस्था ह्यांची अंमलबजावणी अधिक कसोशीनें करणें आवश्यक वाटूं लागलें. म्हणूनच कंपनी कायद्याची पुन्हां नव्यानें मांडणी करण्यांत आली.

### कंपन्यांत व भांडवलांत वाढ

चालू शतकाच्या प्रारंभीं भारतांत १,३४० कंपन्या काम करीत होत्या, आणि त्यांचें वसूल भांडवल ३४·७ कोटी रुपये होते. १८८२ सालीं कंपन्यांची संख्या ५०५ होती व त्यांचें वसूल भांडवल १५·७ कोटी रुपये होतें. १८९२ सालचे हेच आंकडे अनुक्रमें ९५० कंपन्या आणि २६·६ कोटी रुपये वसूल भांडवल असे आहेत. १८८२ ते १९०० ह्या कालांत कंपन्यांच्या संख्येंत आणि त्यांच्या वसूल भांडवलांत दुपटीपेक्षा अधिक वाढ झालेली दिसून येते. १८९० च्या सुमारास दरवर्षी सरासरी १५० नव्या कंपन्या निघत असत आणि सरासरी ६१ कंपन्या गुंडाळल्या जात असत. बंगाल, मुंबई व मद्रास ह्या इलाख्यांतून मुख्यतः कंपन्यांचें केंद्रीकरण झालेलें होतें. १८९९-१९०० ह्या कालांत ब्रिटिश भारतांत जितकें भांडवल कंपन्यांतून गुंतविण्यांत आलें होतें, त्यांपैकी ८६ टक्के भांडवल बंगाल आणि मुंबई ह्यांमधील कंपन्यांतून गुंतविलें गेलेलें होतें. इतर प्रांतांपैकीं सध्याच्या उत्तर-प्रदेशांत ह्या सुमारास ७१ कंपन्या होत्या व त्यांचें वसूल भांडवल १·५ कोटी रुपये होतें. इतर प्रांतांतील रजिस्टर्ड कंपन्यांचें वसूल भांडवल अवघें १ कोटी रुपये होतें. मुंबई प्रांतांत ह्यावेळीं ५५२ कंपन्या होत्या. त्यांपैकी २२१ कंपन्या कापडाच्या व इतर गिरण्या व प्रेसेस ह्यांच्या होत्या. त्यांचें वसूल भांडवल १३·२ कोटी रुपये होतें. बंगाल प्रांतांतील कंपन्या मुख्यतः चहा, ताग, खाणी व इतर अशा होत्या.

### १९०० ते १९३९ ह्या कालांतील कंपन्या

गेल्या शतकांत कंपन्यांची वाढ हळु हळू होत होती. व्यापार-धंदा करण्याच्या ह्या नव्या पद्धतीची लोकांच्या मनावर अद्याप पकड बसली नव्हती. पुढाकार घेण्याच्या वृत्तीच्या कांहीं व्यक्ती आणि त्यांचे नातलग अगर स्नेही हे लोक मिळून जरूर तें भांडवल जमवीत आणि धंदे काढत. ह्या धंद्यांना युरोपिअन धंदेवाले यांच्या पूर्वीच्या कर्तृत्वाचा लाभ मिळालेला असल्यामुळें त्यांचें यश ठरल्यासारखेंच असे. १९१० सालीं संपलेल्या १० वर्षांत कंपन्यांची संख्या २,२१६ इतकी झाली. त्यांचें वसूल भांडवल ६१ कोटी रुपये होतें. १९१४ अखेर संपलेल्या ४ वर्षांत कंपन्यांची संख्या अधिक झपाट्यानें वाढली. ह्या सुमारास कंपन्यांची संख्या २,७४४ झाली आणि त्यांचें वसूल भांडवल ७७ कोटी रुपये झालें. चालू शतकाच्या पहिल्या १५ वर्षांत कंपन्यांच्या संख्येंत आणि त्यांच्या वसूल भांडवलांत १०० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाल्याचें दिसून येतें. भारतांत १९०७-०८ सालीं जी स्वदेशीची चळवळ सुरू झाली तीमुळें भारतांत तयार करण्यांत आलेल्या अनेक वस्तूंची मागणी नव्यानें वाढली. कंपन्यांच्या वाढींत अधिक गति ह्या कालांत उत्पन्न झालेली दिसते. तिचें एक महत्त्वाचें कारण म्हणून ह्या चळवळीकडे बोट दाखवितां येईल. १९१४ ते १९१८ पर्यंत चाललेल्या पहिल्या महायुद्धामुळेंहि कंपन्यांच्या विकासाला मदत झाली. तथापि, युद्धकालांत परदेशाहून यंत्रसामुग्री आणण्याच्या कामांत बऱ्याच अडचणी होत्या. त्यामुळें उद्योगधंद्यांच्या जलद वाढीला कांहींसा पायबंद बसला. पण युद्ध संपल्यावर परदेशांतून भांडवली मालाचा पुरवठा होण्यासारखी परिस्थिति उत्पन्न झाली. शिवाय देशांतील लोकांची रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंची मागणीहि तुंबून राहिलेली होती. त्यामुळें १९१८ ते १९२२ ह्या कालांत औद्योगिक जीवनाची गति चांगलीच वाढली. १९१८ सालीं कंपन्यांची संख्या २,६६८ होती ती १९२२ सालीं ५,१८९ इतकी झाली. १९१८च्या मार्चअखेर कंपन्यांचें वसूल भांडवल ९९ कोटी रुपये होतें तें १९२२ अखेर २८१ कोटी रुपयांपर्यंत वाढलें. ह्यापुढील दहा वर्षांत मात्र कंपन्यांच्या संख्येंत अगर त्यांच्या वसूल भांडवलांत डोळ्यांत भरण्यासारखी प्रगति झालेली दिसत नाहीं. ह्या दहा वर्षांच्या कालांतील शेवटचीं चार वर्षें तीव्र स्वरूपाच्या मंदीचीं होतीं. मंदीच्या तडाख्यानें बऱ्याच कंपन्यांना आपला कारभार गुंडाळावा लागला. दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीं भारतामधील कंपन्यांची संख्या ११,११४ होती आणि त्यांचें वसूल भांडवल २९० कोटी रुपये होतें. सामान्यपणें असें म्हणतां

येईल कीं, १९२२–१९३९ ह्या कालखंडांत कंपन्यांची संख्या एकंदरीनें सतत वाढत गेलेली दिसत असली तरी त्यांच्या वसूल भांडवलांत चढउतार होत होती. १९३९ सालीं कंपन्यांच्या वसूल भांडवलाची रक्कम १९३२ सालच्या वसूल भांडवलापेक्षा थोडीशीच अधिक होती.

### दुसऱ्या महायुद्धानंतरची वाढ

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत कंपन्यांची संख्या १४,८५९ पर्यंत आली. त्यांचें एकूण वसूल भांडवल ३८९ कोटी रुपये होतें. १९४५–४६ व १९४६–४७ ह्या दोन वर्षांत तर कंपन्यांच्या संख्येंत खूपच वाढ झाली. १९४६ सालीं २,४८४ व १९४७ सालीं ४,५१० नव्या कंपन्या अस्तित्वांत आल्या. त्यांचें वसूल भांडवल अनुक्रमें ३५ कोटी व ५६ कोटी रुपये होतें. ह्यानंतर देशाची फाळणी झाल्यामुळें कंपन्यांची संख्या २,००० नीं कमी झाली. तथापि मार्च, १९४८ मध्यें पुऱ्या झालेल्या फाळणीनंतरच्या पहिल्या वर्षांत कंपन्यांची संख्या २२,६७५ पर्यंत आली. त्यांचें वसूल भांडवल ५७० कोटी रुपये होतें. फाळणीनंतरच्या व स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांतहि कंपन्यांची वाढ लक्षांत भरण्यासारखी होत गेली. राष्ट्राच्या भरभराटीविषयीं लोकांत विश्वास उत्पन्न झाला होता. त्यामुळें आणि कोरिआंतील युद्धामुळें कंपन्यांच्या वाढीला उत्तेजन मिळालें. १९५५ च्या मार्चमध्यें पुऱ्या झालेल्या सात वर्षांच्या काळांत आणखी ७,००० नव्या कंपन्या स्थापन करण्यांत आल्या. १९४८ च्या मार्च अखेर कंपन्यांची संख्या २२,६७५ होती आणि त्यांचें वसूल भांडवल ४१२ कोटी रुपये होतें.

### कंपन्यांची वाढ व घट

चालू शतकाच्या पहिल्या दशकांतील कांहीं वर्षांची जी माहिती आहे त्यावरून असें दिसून येतें कीं ह्या दशकांत दरवर्षी सरासरी १७७ नव्या कंपन्या स्थापन करण्यांत येत आणि सरासरी ८१ कंपन्या आपला कारभार गुंडाळीत असत. पहिलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वीच्या पांच वर्षांत दरवर्षी ३३·८ कोटी रुपये अधिकृत भांडवल असलेल्या २८७ नव्या कंपन्यांची स्थापना होत असे आणि १·१ कोटी रुपये अधिकृत भांडवल असलेल्या १५० कंपन्यांना आपला कारभार गुंडाळावा लागत असे. १९४३–४४ पर्यंत दर पांच वर्षांसाठीं घेण्यांत आलेल्या सरासरीवरून असें दिसतें कीं, जितक्या कंपन्या आपला कारभार बंद करीत त्यापेक्षा अधिक नव्या कंपन्या स्थापन करण्यांत येत. १९१५ ते १९१९ ह्या काळांत दरवर्षी सरासरी १९९ नव्या कंपन्या निघत तर १८९ कंपन्या बंद होत. १९४० ते १९४४ ह्या काळांत १,१८२ नव्या कंपन्या निघाल्या व अवघ्या ६६२ बंद झाल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नजीकच्या काळांत, विशेषतः १९५१–५२ नंतर, नवीन कंपन्या स्थापन करण्याची प्रवृत्ति मंदावलेली दिसते. कंपन्या बुडण्याच्या प्रगतींत मात्र सतत वाढ झालेली दिसत नाहीं. तथापि १९५१–५२ व १९५२–५३ ह्या काळांत मात्र १,२४४ कंपन्यांची इतिश्री झालेली दिसून येते.

गेल्या आठ वर्षांत नव्या कंपन्या निघाल्यामुळें सरासरी ६·६ कोटी रुपये वसूल भांडवलाची भर पडली असून ९ कोटी रुपये भांडवलाच्या कंपन्या बुडाल्या अगर त्यांना आपले कारभार बंद करावे लागले. एका बाजूनें २·४ कोटी रुपयांचें भांडवल सरासरीनें बुडत असतांना ज्या कंपन्या चालू आहेत त्यांच्या वसूल भांडवलांत सरासरीनें ४९ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे.


आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांस नवीन वर्ष आनंदाचे व भरभराटीचे जावो!

**दि बेळगांव बँक लि., बेळगांव**

स्थापना १९३०] [शेड्यूल्ड बँक

**दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक**

बेळगांव, रत्नागिरी, धारवाड व कोल्हापूर जिल्ह्यांत शाखाः— १ संकेश्वर, २ होसूर, (बेळगांव) ३ गोकाक, ४ जयसिंगपूर (कोल्हापूर जिल्हा), ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी, बेळगांव, २३ सावंतवाडी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,१५,१३,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२८,००,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः**—श्री. एम्. जी. हेरेकर, (चेअरमन), श्री. एल. व्ही. देशपांडे, (व्हा. चेअरमन), श्री. जी. एल गजेंद्रगडकर, श्री. जी. व्ही. सराफ, श्री. एस्. एम् मुतूर, श्री. जे. डब्ल्यू. कलघटगी, श्री. बी. बी. पोतदार, श्री. एन्. एस्. शिराळी व श्री. ए. आर. नाईक, (मॅनेजिंग डायरेक्टर).

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्यावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हाल्ट बांधण्यांत आला असून सेफ डिपॉझिट व्हाल्टमधील लॉकर्सचे दर खास लोकाग्रहास्तव कमी केले आहेत. तरी सर्वांनीं एकवेळ व्हाल्टला भेट देऊन सवलतीच्या दराचा अवश्य फायदा घ्यावा.

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

श्री. एच. एस. कुलकर्णी, मॅनेजर.



**पुणें म्युनिसिपल कार्पोरेशन सर्व्हंट्स को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लिमिटेड, पुणें**

७३ बुधवार पेठ, पुणें शहर

[स्थापना १९१४]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १,५०,००० |
| वसूल भांडवल | रु. | ९९,४३० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४४,८१९ |
| खेळतें भांडवल | रु. | ६,५०,००० |
| काटकसर फंड | रु. | २,७०,००० |

मा. सल्लागार मंडळः—(१) मा. रा. द. भट (अध्यक्ष), (२) मा. दि. न. धाकस (उपाध्यक्ष), (३) मा. रा. ग. जोशी, (४) मा. डॉ. प्र. रा. महाजनी, (५) मा. डॉ. दे. त्र्यं. विसाळ.

मा. कार्यकारी मंडळः—(१) मा. कृ. द. घारमळकर (चेअरमन), (२) मा. वि. द. नवले, व्हा. (चेअरमन). (३) मा. व. रा. कोतवाल. (४) मा. सो. शं. नाईक. (५) मा. श्री. ह. मांबे. (६) मा. द. ल. भडगांवकर. (७) मा. ना. धों. भोकरे. (८) मा. सि. धों. आवनावे. (९) मा. रा. ता. कांबळे. (१०) मा. भि. वि. पाटील. (११) मा. पु. न. प्रभुणे.

**बँकेच्या सभासदांसाठीं आकर्षक काटकसरफंड योजना**

सभासद व बिगर–सभासद यांच्या सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. इतर माहितीसाठीं समक्ष भेटावें.

मा. कृ. कुलकर्णी
सेक्रेटरी

### उद्योगधंद्यांची प्रगति

गेल्या ५० वर्षांत जॉइंट स्टॉक कंपन्यांनीं आपल्या औद्योगिक कार्याचें क्षेत्र बरेंच वाढविलेलें आहे. देशाच्या औद्योगिक रचनेंत पूर्ण बदल घडून आलेला आहे. पहिल्या महायुद्धापूर्वी भारताला कापड व इतर रोजच्या गरजांच्या वस्तूंसाठी परदेशांकडून येणाऱ्या आयात मालावर अवलंबून रहावें लागे. पण त्यानंतर, विशेषतः १९३० च्या पुढें, भारतानें आपल्या गरजा स्वतःच भागविण्यास सुरवात केली. साखर, कापड, लोखंड व पोलाद ह्या धंद्यांना संरक्षण मिळाल्यामुळें त्यांचें उत्पादन वाढलें. त्यामुळें जो कच्चा माल भारत पूर्वी परदेशीं पाठवीत असे त्यांचा व्यापार देशांतच होऊं लागला. लोकांची खरेदी-शक्ति वाढल्यामुळेंच मुख्यतः व्यापार व उद्योगधंद्यांना मदत झाली. शिवाय, देशांतील भांडवल कमी बुजरें झालें आणि विशेषतः १९३६ सालीं रिझर्व्ह बँकेची स्थापना झाल्यापासून बळकट पायावर आधारलेल्या बँकिंगच्या व्यवसायाचा विकास झाला. दुसऱ्या महायुद्धामुळें उद्योगधंद्यांना अधिक वाव मिळाला. ह्याच काळांत वनस्पति-तेल, विजेचीं उपकरणें, यांत्रिक हत्यारें, इत्यादि धंद्यांची भारतांत नव्यानें उभारणी झाली. उद्योगधंद्यांच्या वाढीची ही प्रवृत्ति गेल्या कांहीं वर्षांत अधिकच जोरावली आहे.

### बँका आणि विमा कंपन्या

दुसरें महायुद्ध सुरू होण्यापर्यंतच्या काळांत देशांतील जॉइंट स्टॉक बँका व विमा कंपन्या ह्यांच्या संख्येंत वाढ होत असलेली दिसून येते. १९०० सालीं बँकांची संख्या ४०७ होती, ती १९३९ सालीं २,०४५ इतकी झाली. विमा कंपन्यांची संख्याहि ह्याच काळांत ४३ वरून ६८८ पर्यंत आली. १९३९ सालापासून पुढें मात्र ह्या दोन्ही प्रकारच्या कंपन्यांच्या संख्येंत भर पडली नाहीं. युद्धाच्या काळांत इतर प्रकारच्या कंपन्यांच्या संख्येंत मात्र वाढ झालेली दिसते. १९४८ ते १९५५ ह्या काळांत बँकांची संख्या ३०० नें घटली आणि विमा कंपन्यांची संख्या २५ नें घटली. तथापि, ह्या प्रकारच्या कंपन्यांच्या वसूल भांडवलांत मात्र घट झालेली नाहीं. विमा कंपन्यांच्या बाबतींत असें दिसून येतें कीं, त्यांचें वसूल भांडवल गेल्या ५५ वर्षांत सतत वाढत गेलें आहे. बँका व कर्जे देणाऱ्या कंपन्यांचें वसूल भांडवल १९२१ ते १९३९ ह्या काळांत ३ कोटी रुपयांनीं कमी झालें, आणि १९४८ ते ५५ ह्या काळांत त्यापूर्वी होतें तेवढेंच राहिलें. १९३९ ते १९४८ ह्या काळांत दोन्ही गटांतील कंपन्यांचें वसूल भांडवल युद्धपूर्व काळापेक्षा तिपटीनें वाढलेलें दिसतें. इतर प्रकारच्या कंपन्यांपैकीं कापड, ताग, लोकर व रेशीम, चहा, कॉफी व विशेषतः साखर ह्या प्रकारच्या कंपन्यांच्या संख्येंत व त्यांच्या वसूल भांडवलांत वाढ झालेली दिसते. अशीच वाढ, प्रिंटिंग, स्टेशनरी, रसायनें, एंजिनिअरिंग, कांच, ह्याहि कंपन्यांच्या बाबतींत झालेली दिसते. ही वाढ गेल्या ३५ वर्षांत झालेली असली तरी वाढीला विशेष जोराची चालना गेल्या महायुद्धांत व त्यानंतरच्या काळांत मिळाली. १९५२ ते ५५ ह्या काळांत १ कोटी रुपये अगर अधिक अधिकृत भांडवलाच्या ३० कंपन्या रजिस्टर करण्यांत आल्या. ह्या काळांत स्थापन करण्यांत आलेल्या कंपन्यांपैकी ६० टक्के कंपन्यांचें भांडवल १ लाख रुपये ते ७॥ लाख रुपयांपर्यंत होतें.

### 'बड्या' कंपन्या

१ कोटी रुपये अगर अधिक अधिकृत भांडवल असलेल्या कंपन्यांना 'बड्या कंपन्या' म्हणण्याचा प्रघात आहे. अशा कंपन्यांत सिंद्री येथील रसायनाचा व खताचा कारखाना, हिंदुस्थान शिपयार्डस्, बर्माशेल रिफायनरीज, हिंदुस्थान मशीन टूल्स, हिंदुस्थान स्टील, दुर्गापूर आयर्न अँड स्टील वर्क्स व भारत इलेक्ट्रॉनिक्स ह्यांचा समावेश होतो. ह्या कंपन्यांचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपये अगर त्यापेक्षा अधिक आहे. ह्या कंपन्यांपैकी बर्माशेल व दुर्गापूर आयर्न ह्या दोन सोडून बाकीच्या सरकारी मालकीच्या आहेत. वरील 'बड्या कंपन्यां'खेरीज कमी अधिकृत भांडवलाच्या आणखीहि कांहीं सरकारी मालकीच्या कंपन्या काढण्यांत आल्या आहेत. त्याशिवाय इंडस्ट्रीज क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ही संस्था १९५५ च्या जानेवारींत काढण्यांत आली. तिचें अधिकृत भांडवल २५ कोटी रुपयांचें आहे. गेल्या चार वर्षांत काढण्यांत आलेल्या नव्या कंपन्यांचें जितकें अधिकृत भांडवल आहे, त्यांपैकी ६६ टक्के भांडवल 'बड्या' कंपन्यांचें आहे. गेल्या चार वर्षांतील कंपन्यांच्या एकूण अधिकृत भांडवलापैकी २६ टक्के भांडवल सरकारी कंपन्यांचें आहे.

### १९५३ ते १९५४

१९५२ ते ५५ ह्या चार वर्षांत युद्धकालांत सुरू करण्यांत आलेल्या ७०० पेक्षा अधिक कंपन्या बंद झाल्या, बंद करण्यांत आल्या अगर त्यांचीं नांवें कंपन्यांच्या रजिस्टरवरून काढून टाकण्यांत आलीं. ह्याच काळांत चालू असलेल्या कंपन्यांनीं आपल्या वसूल भांडवलांत १·२४ कोटी रुपयांची नक्त भर टाकली. ह्या वाढीपैकी ४० टक्के वाढ ६५ कंपन्यांनीं केली. १९५४-५५ ह्या आर्थिक वर्षात २,५२८ कंपन्यांनीं आपल्या वसूल भांडवलांत बदल केला, त्यांपैकी ९२ कंपन्यांनीं आपलें वसूल भांडवल कमी केलें, २,४४६ कंपन्यांनीं आपलें भांडवल वाढविलें.

### नफ्याचा निर्देशांक

नफ्याचा संयुक्त निर्देशांक मंदीच्या काळांत १९२८ च्या निर्देशांकाच्या मानानें ७० टक्के खालीं आला. नंतर निर्देशांकांत बरीच सुधारणा होऊन तो १९३८ सालीं, १९२८ हें प्रमाण वर्ष धरल्यास, त्या निर्देशांकाच्या ३० टक्के खालीं राहिला. युद्धकाळांतील नफ्याचा संयुक्त निर्देशांक युद्धपूर्वकालापेक्षा १४५ टक्के वरच्या पातळीवर होता. पण १९४३-४७ ह्या काळांत युद्धविषयक मालाची मागणी कमी होताच तो घसरला. १९४७ च्या डिसेंबर महिन्यांत नियंत्रण करण्यांत आल्यावर संयुक्त निर्देशांक पुन्हां सुधारला. पण १९४९ सालीं तो पुन्हां खालीं आला. १९५० व १९५१ हीं दोन वर्षे कोरिआंतील युद्धामुळें भरभराटीची गेलीं. ह्या दोन वर्षांचे संयुक्त निर्देशांक अनुक्रमें २१७ व ३११ असे आहेत. त्यानंतर १९५२ मध्यें तो ५० टक्क्यांनीं घटून १९१ वर आला व १९५३ सालीं पुन्हां २६१ वर गेला. १९२९ ते ३२ च्या मंदींत साखरेखेरीज इतर धंद्यांचे नफ्याचे संयुक्त निर्देशांक बरेच खाली आले. चहा व तागाच्या धंद्यांतील नफ्यांत खूपच घट झाली. १९३८ सालपर्यंत चहाच्या धंद्यांतील नफ्यांत झालेली घसरगुंडी बऱ्याच प्रमाणांत भरून आली. पण तागाच्या धंद्यांतील नफा मात्र मंदीच्या पूर्वीच्या नफ्याच्या पातळीपेक्षा बराच खाली राहिला. युद्धकालांतील तेजीनेंसुद्धां त्यांत सुधारणा झाली नाहीं. कोळसा व कापड ह्या धंद्यांवर मंदीचा परिणाम कमी झाला. कागदाच्या धंद्याच्या नफ्याचा निर्देशांक १९२९-३३ ह्या काळांत १५ टक्क्यानें खालीं आला. पण नंतर तो मंदीपूर्वीच्या निर्देशांकापेक्षा बराच वर गेला. लोखंड व पोलादाच्या

धंद्याचा निर्देशांक १९२९ सालीं सुरवातीला घसरला पण नंतर सावरला. १९३८ सालीं तो १९२८ च्या पातळीच्या सुमारें २१७ टक्के वर होता. युद्धोत्तर काळांत १९४३ व १९४४ सालीं कापड, ताग, साखर, कागद व सिमेंट ह्या धंद्यांच्या नफ्याच्या निर्देशांकानें अधिकांत अधिक उंच शिखर गांठलें. लोखंड व पोलादाच्या धंद्यांतील निर्देशांकानें १९४१ सालीं आणि चहाच्या धंद्यांतील निर्देशांकानें १९४२ सालीं उच्चांक गांठला. किंमतीवरील नियंत्रणें, युद्धविषयक गरजाप्रमाणें होणारें वांटप आणि वहातुकींतील अडचणी ह्या कारणांमुळें कोळशाच्या धंद्याला इतर धंद्यांप्रमाणें युद्धांतील तेजीचा फायदा मिळाला नाहीं. युद्धाच्या अतिशय धामधुमीच्या काळांत सुद्धां ह्या धंद्यांतील नफा-निर्देशांक युद्धपूर्व कालांतील नफ्याच्या पातळीपेक्षा १८ टक्के खालीच होता. कापड, कोळसा, कागद, सिमेंट, लोखंड व कोळसा ह्या धंद्यांच्या दृष्टीनें १९४६ व १९४७ हीं वर्षें फारशीं चांगलीं गेलीं नाहींत. १९४६ सालीं तागाच्या धंद्यांतील नफा जरा बरा होता. पण नंतर झालेली फाळणी व तज्जन्य परिस्थिति ह्यामुळें पुढील दोन वर्षांत तो घसरला. १९५० सालीं भारत व पाकिस्तान ह्यांच्यामधील आर्थिक तेढ कमी होण्याचीं चिन्हें दिसूं लागल्यामुळें तागाच्या धंद्यांतील नफ्यानें उचल खाल्ली. युद्धानंतरच्या पहिल्या दोन वर्षांत चहाच्या धंद्यांतील नफ्यानें आपली पातळी उंच ठेवली. युद्धकाळांतील निर्देशांका-इतकाच जवळ जवळ ह्याहि काळांतील निर्देशांक आहे. १९४८ व १९४९ सालीं नफ्याचें प्रमाण घसरलें. पण १९५० सालीं तें सुधारून युद्धकाळांतील उच्चांकापेक्षाहि अधिक झालें. १९५१ सालीं नफ्यांत पुन्हां घट होऊन १९५२ सालीं तर प्रत्यक्ष तोटाच झाला. तथापि, १९५३ हें साल चहाच्या धंद्याला पुन्हां चांगलें गेलें. १८४८ सालीं साखरेवरील नियंत्रणें सरकारनें रद्द केल्यावर साखरेच्या धंद्यांत फायदा बराच वाढला. भरपूर नफ्याचा कांहीं थोडा काळ फायदा मिळाला. पण १९४९ व १९५० सालीं पुन्हां नियंत्रणें बसविण्यांत आल्यावर नफा पुन्हां घसरला. १९५१ ते १९५३ ह्या कालांत नफ्याचें प्रमाण सुधारलें. १९४८ ते १९५३ ह्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालांत कागदाच्या धंद्यांतील नफा सतत वाढत गेल्याचें दिसतें. सिमेंटच्या धंद्यांत १९५१ पर्यंत नफा चढण्याची प्रवृत्ति दिसून येते. त्यानंतर नफा कमी होऊं लागून १९५३ सालीं ह्या धंद्याचा निर्देशांक २७९ वर आला. कोळशाच्या धंद्याच्या दृष्टीनें १९४९ साल हें सर्वांत चांगलें गेलें. १९५२ साल सोडून त्यानंतरचीं वर्षें ह्या धंद्याला तितकीशीं चांगलीं गेलीं नाहींत. कापडाच्या गिरण्यांच्या धंद्यांत युद्धोत्तर कालांतील नफ्यांत बरेच चढ-उतार झालेले दिसतात. तथापि, १९४८ व १९५१ हीं वर्षें कापड गिरण्यांना विशेष चांगलीं गेलीं.

### भारताबाहेर स्थापन झालेल्या कंपन्या

१९१३ अखेर भारताबाहेर स्थापन झालेल्या पण ज्यांच्या कचेऱ्या भारतांत होत्या अशा ५७९ कंपन्या होत्या. त्यांचें वसूल भांडवल व डिबेंचर्सवर काढलेलें कर्ज ३८९ कोटी रुपये होतें. १९२१ सालीं अशा कंपन्यांचा आंकडा ६७८ झाला. त्यांचें वसूल भांडवल व डिबेंचर्सवरील कर्ज ९०७ कोटी रुपये होतें. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभीं, म्हणजे १९३९ सालीं, अशा कंपन्यांची संख्या ८०० होती. त्यांचें एकूण वसूल भांडवल व डिबेंचर्सवरील कर्ज १,१३८ कोटी रुपये होतें. त्यानंतर अशा कंपन्या कमी होऊं लागल्या. १९३९ ते १९४९ ह्या कालांत त्यांची संख्या ८२२ ते ८७० च्या दरम्यान होती आणि त्यांचें वसूल भांडवल व डिबेंचर्सवरील कर्ज १०५९ कोटी ते १,१३८ कोटी रुपयांच्या दरम्यान होतें. पुढील पांच वर्षांत अशा कंपन्यांची संख्या ८२२ पर्यंत खाली आली. ३१ मार्च १९५४ अखेर त्यांचें एकूण वसूल भांडवल व डिबेंचर्सवरील कर्ज १,२५५ कोटी रुपये होतें. ह्या ८२२ कंपन्यांपैकी ५७७ ब्रिटनमध्यें रजिस्टर केलेल्या, २९ पाकिस्तानांत रजिस्टर केलेल्या, ९ हॉंगकॉंगमध्यें रजिस्टर केलेल्या, ८ ऑस्ट्रेलियांत रजिस्टर केलेल्या आणि ७ न्यूझलिंडमध्यें रजिस्टर केलेल्या होत्या. कॅनडा, सीलोन, सिंगापूर ह्या ठिकाणीं रजिस्टर केलेल्या प्रत्येकीं ४ कंपन्या होत्या. कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांव्यतिरिक्त इतर देशांत रजिस्टर केलेल्या १७४ कंपन्या होत्या, त्यांची रजिस्टरबाबतची वर्गवारी अशी होती:—७७ अमेरिकेंतील. १८ जपानमधील, १४ हॉलंडमधील, १२ फ्रान्समधील, ११ स्वित्झरलंडमधील आणि ९ ब्रह्मदेशामधील.

फो. नं. ४२४८४ [ तार : माधवाश्रम, बॉम्बे

माधवाश्रम लि.

भोजनाची व रहाण्याची उत्कृष्ट सोय

तसेंच ★ उपाहाराची खुल्या बगीच्यांत व्यवस्था.
★ विवाह-कार्यांची थोड्या खर्चांत सर्व प्रकारची उत्तम सोय.
★ कुटुंबासह रहाणारांसाठीं स्वतंत्र खोल्या.

★ माधवाश्रम लि., गिरगांव मुंबई ४ ★

टे. नं. ६०४२८

वामन गणेश हरचेकर

लिमिटेड.

चांदी, सोनें, मोत्यें व जवाहिरांचे व्यापारी.
केळकर रोड, दादर, मुंबई नं. १८
यांजकडून

अभीष्ट चिंतन

चालू दीपावलि व नूतन संवत्सर
सर्व भारतीयांना सुखाचें व भरभराटीचें जावो.

तमाम दंतरोगांवर

माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

# नवीन कंपनी कायदा

## महत्त्वाचे बदल व सुधारणा

*कंपन्यांच्या कारभारावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याच्या उद्देशानें नवा कंपनी कायदा करण्यांत आला आहे; व हा कायदा मोडणारांना त्यानें कडक शिक्षेची तरतूद केलेली आहे. कायद्यांतील सर्व तरतुदींची नीट माहिती होण्यास तज्ज्ञाच्या सल्ल्याचीच आवश्यकता आहे, आणि असा सल्ला लहान व मध्यम आकाराच्या कंपन्यांच्या आवाक्याबाहेरचाच असणार. म्हणून, पहिलीं कांहीं वर्षें तरी कायद्याची अंमलबजावणी तत्परतेनें परंतु सहानुभूतीनें केली जाणें आवश्यक आहे. सरकारला कायद्यानें दिलेले व्यापक अधिकार नीट वापरले जावे, ह्या दृष्टीनें अॅडव्हायसरी कमिशनच्या कामास अत्यंत महत्त्व प्राप्त होणार आहे.*

१९५५ च्या कंपनी कायद्याला राष्ट्रपतींची लवकरच मंजुरी मिळून तो १ एप्रिल, १९५६ रोजीं अंमलांत येईल, अशी अपेक्षा आहे. त्या कायद्यानें घडवून आणलेले महत्त्वाचे बदल येथें दिले आहेत :—

### ६५० कलमें

नवीन कायद्यांत ६५० कलमें व १२ परिशिष्टें आहेत. प्रॉस्पेक्टस्, शेअर्स व डिबेंचर्ससंबंधीं सुमारें ७० कलमें असून ३० कलमें भागीदारांच्या सभासंबंधीं आहेत. २० कलमें चौकशीबाबत आहेत, तर ७० कलमें डायरेक्टरांबाबत व ५५ मॅनेजिंग एजंटांबाबत आहेत. मॅनेजर्स, मॅनेजिंग डायरेक्टर्स व सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स ह्यासंबंधीं आणखी कांहीं कलमें आहेत.

### कायद्याची अंमलबजावणी कसोशीनें होणार

१९५१ च्या कायद्यानें १९१३ च्या कायद्यांत वाइंडिंग-अपविषयीं केलेली दुरुस्ती, कांहीं सुधारणा करून, कायम ठेवली आहे. घेणेकऱ्यांच्या हिताचे दृष्टीनें वाइंडिंग-अपविषयीं तरतुदी कडक केलेल्या आहेत. कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीचे बाबतींत बरीच सुधारणा घडवून आणलेली आहे.

### मॅनेजिंग एजंटांच्या असोसिएटवर बंधनें

मॅनेजिंग एजंटांबाबत तरतुदी परिणामकारक व्हावयाच्या असतील, तर अशा मॅनेजिंग एजंटांशीं धंद्याचें किंवा इतर जवळचें नातें असणाऱ्या लोकांसहि त्या बंधनाच्या तरतुदी लागू केल्या पाहिजेत, असें कंपनी कायदा कमिटीनें आपलें मत नमूद केलें होतें. "असोसिएटस ऑफ मॅनेजिंग एजंटस" चें व्यापक वर्तुळ कायद्यानें निश्चित करून दिलें आहे व त्यावर खालील बंधनें घातलीं आहेतः—

(१) मॅनेजिंग एजंटाच्या व्यवस्थेखालील कंपनीनें मॅनेजिंग एजंटाला किंवा त्याच्या असोसिएटसना कर्ज देतां कामा नये.

(२) खरेदीची एजन्सी, विक्रीची एजन्सी, प्रिन्सिपल टु प्रिन्सिपल करार, इत्यादिबाबत मॅनेजिंग एजंटावरील बंधनें असोसिएटसूनाहि लागू आहेत.

(३) मॅनेजिंग एजंटाच्या व्यवहारांची तपासणी करणारा इन्स्पेक्टर, त्याला वाटलें तर, असोसिएटसूच्या व्यवहारांचीहि तपासणी करूं शकेल.

(४) कोर्टानें मॅनेजिंग एजन्सी रद्द करून मॅनेजिंग एजंटाला त्याच्या जागेवर रहाण्यास बंदी केली असेल, तर मॅनेजिंग एजंटाच्या असोसिएटला कोर्टाच्या परवानगीविना मॅनेजिंग एजंट म्हणून नेमता येणार नाहीं.

(५) भागीदारांसाठीं बोर्डावर दोन तृतीयांश जागा राखून ठेवलेल्या असतात. त्यांपैकी एकाद्या जागेवर असोसिएटला निवडून येतां येणार नाहीं; कंपनीनें स्पेशल ठराव करून त्याच्या निवडणुकीस मान्यता दिली, तर गोष्ट वेगळी.

### प्रायव्हेट कंपन्यांच्या कित्येक सवलती गेल्या

प्रायव्हेट कंपन्या ह्यापुढें पूर्वीसारख्या प्रायव्हेट रहाणार नाहींत. त्यांनीं आपल्यापुढें 'प्रायव्हेट लिमिटेड' असे शब्द घातले पाहिजेत. त्यांचे हिशेब सरकारमान्य ऑडिटरांनींच तपासले पाहिजेत. त्यांनीं रजिस्ट्रारकडे आपले ताळेबंद नोंदविले पाहिजेत. १९१३ च्या कायद्याखालीं, प्रायव्हेट कंपन्यांना डायरेक्टर असण्याची आवश्यकता नव्हती. नव्या कायद्याप्रमाणें प्रत्येक प्रायव्हेट कंपनीला किमान दोन डायरेक्टर असले पाहिजेत.

### आर्टिकल्स ऑफ असोसिएशन व 'ए' टेबल

१९१३ च्या कायद्याखाली पहिल्या परिशिष्टांतील 'ए' टेबलांमधील कांहीं तरतुदी सक्तीच्या होत्या. नव्या कायद्यानें आवश्यक त्या तरतुदी कायद्याच्या मुख्य भागांतच समाविष्ट केल्या आहेत.

### प्रॉस्पेक्टसमधील तपशील

नव्या कायद्यानें प्रॉस्पेक्टसच्या बाबतींत खूपच बदल केले आहेत. इंग्लंडमधील कायद्याचें ह्या बाबतींत अनुकरण करण्यांत आलेलें आहे. प्रॉस्पेक्टसमध्यें आतां अधिक तपशीलवार माहिती देण्यांत आली पाहिजे; चुकीची माहिती दिली, तर त्याबद्दल फौजदारी करतां येऊन, २ वर्षेपर्यंत शिक्षेची तरतूद केलेली आहे. माहितीच्या भरपूर तपशिलाच्या बाबी अशा आहेतः—

(१) ज्या कंपनीचे वतीनें प्रॉस्पेक्टस काढण्यांत येत आहे, ती कंपनी मॅनेजिंग एजंटाच्या व्यवस्थेखालीं राहणार असेल, तर मॅनेजिंग एजंटानें घेतलेलें भाग भांडवल प्रॉस्पेक्टसमध्यें स्पष्ट दाखविलें पाहिजे.

(२) किती किमान भाग भांडवल जमलें म्हणजे कंपनी सुरू व्हावी (मिनिमम सबस्क्रिप्शन) ह्याची रक्कम १९१३ च्या कायद्यानेंहि द्यावी लागे. मालमत्तेच्या खरेदीची किंमत, प्राथमिक खर्च, घेतलेल्या कर्जाची परतफेड आणि चालू भांडवल, ह्यांच्या बेरजेचा तो आंकडा असे. नवीन कायद्याप्रमाणें ह्या चारहि बाबींचे स्वतंत्र आंकडे दिले पाहिजेत आणि त्याबरोबर "इतर कांहीं खर्च" हा नव्या बाबीचाहि तपशील दाखविला पाहिजे.

(३) भागांचे अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ होण्याची वेळ नमूद केलेली असली पाहिजे.

(४) एकाद्याला शेअर्स किंवा डिबेंचर्स घेण्याच्या बाबतींत विशेष प्राधान्य दिलें गेलेलें असेल, तर त्याबाबत कराराची माहिती प्रॉस्पेक्टसमध्यें दिली पाहिजे.

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना ] बेळगांव [ १९४२

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,००,००० |
| वसूल भांडवल | रु. ६०,९७५ |
| एकूण रिझर्व्ह फंड | रु. ५०,३४१ |
| एकूण ठेवी | रु. ४,३८,१२४ |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. १,५०,२९४ |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ५,६३,८४६ |

★ या बँकेंत सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ व्याजाचे दर आकर्षक आहेत, याचा ठेवीदारांनीं अवश्य फायदा घ्यावा.

★ बँक सुरुवातीपासून " अ " वर्गात आहे.

विशेष माहितीसाठी भेटा.

ए. के. सोमणाचे, सेक्रेटरी. जी. एम्. मातकांडे, चेअरमन.



# दि कराड अर्बन कोऑपरेटिव्ह बँक लि.

## कराड (जिल्हा–उत्तर सातारा)

स्थापना : १९१७ ] [ फोन नं. ४३

सतत १५ वर्षे ' अ ' वर्ग

अध्यक्ष :—श्री. पु. पां. ऊर्फ बाबूराव गोखले

************************************

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | ... | रु. १,४६,५३० |
| रिझर्व्ह फंड | ... | रु. १,५३,१९१ |
| इतर फंड | ... | रु. १,३७,१८७ |
| ठेवी | ... | रु. १८,१५,४१५ |
| कर्जें | ... | रु. ११,०३,१०५ |
| खेळतें भांडवल | ... | रु. ३३,८०,७११ |

************************************

चेक, हुंड्या, रेल्वे रिसिट्स, वगैरेंची वसुली योग्य दरांत केली जाते. निरनिराळ्या विमाकंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची सोय आहे. आकर्षक दरानें चालू, सेव्हिंग्ज, मुदत ठेव, वगैरे प्रकारच्या ठेवी स्वीकारणें वगैरे बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. विशेष माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

कऱ्हाड, ता. २८।१०।५५. शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी मॅनेजिंग डायरेक्टर.



## दिवाळीचे आनंदांत भर



# सह्याद्रि विमा कंपनीचे

विमेदार, भागीदार, प्रतिनिधी, प्रचाराधिकारी व हितचिंतक या सर्वांना दिवाळीचे सुमुहूर्तावर भरपूर आयुष्य व आरोग्य लाभो; तसेंच त्यांची सर्वांगीण उन्नति होवो अशी सदिच्छा व्यक्त करतों. त्रैवार्षिक दर हजारीं रु. २४ व ३० याप्रमाणें जाहीर झालेल्या बोनसचीं सर्टिफिकिटें विमेदारांकडे लवकरच रवाना होतील. त्याचप्रमाणें भागीदारांची नफ्याची रक्कमहि त्यांच्याकडे रवाना होईल. याच कंपनींत आपल्या आयुष्याचा विमा उतरा तसेंच एजन्सी घेऊन पैसा कमवा व राष्ट्रांतील बेकारी नष्ट करा. एजन्सीसाठी तावडतोब लिहा.

गो. ग. सौंदणकर.
मॅनेजिंग डायरेक्टर
सह्याद्रि विमा कंपनी लि., नासिक.



# " शिवदर्शन लॉज "

डेक्कन जिमखाना कॉर्नर,
पुणें ४.

[१] पुण्यांतील उत्तमोत्तम वस्तींत

[२] सर्वांनीं वाखाणलेलें

[३] म्युनिसिपल बस स्टँड, टॅक्सी, रिक्षा, खाली

[४] पोस्ट ऑफिस समोर, थिएटर्सना नजिकच

[५] स्वच्छता, टापटीप, कटाक्षानें ठेवली जाते

[६] हवेशीर खोल्या

आगाऊ खोल्या राखून ठेवल्या जातात.

(५) एखादी मालमत्ता घ्यावयाची असेल तर, तिचेवर मालकी कोणाची आहे, त्यापूर्वी दोन वर्षे मालकी हक्क कसे बदलत गेले आहेत, त्यांच्या तारखा, हितसंबंधित डायरेक्टरांची नांवें, द्यावयाची किंमत, हा सर्व तपशील प्रॉस्पेक्टसमध्यें नमूद पाहिजे.

(६) १९१३ च्या कायद्यानें, कांहीं विशिष्ट करारांचाच फक्त तपशील द्यावयास सांगितला होता; आतां महत्त्वाच्या प्रत्येक कराराचा तपशील प्रकट केला पाहिजे.

(७) प्राथमिक खर्चाची रक्कम कोणी दिली किंवा कोण देणार आहे, प्राथमिक खर्चाचा तपशील, हें सर्व प्रॉस्पेक्टसमध्यें दाखविलें पाहिजे.

(८) सब-अंडररायटर्सना दिलेल्या किंवा द्यावयाच्या रकमा ह्याहि प्रकट केल्या पाहिजेत.

(९) जी कंपनी अगोदरच व्यवहार करीत आहे; किंवा जो धंदा तीन वर्षांपेक्षा कमी काळ चालू आहे व तो धंदा घ्यावयाचा आहे अशा बाबतींत किती काळ धंदा चालू आहे, हें नमूद व्हावें.

(१०) एखाद्या कंपनीचे रिझर्व्ह किंवा नफे भांडवलांत वर्ग करण्यांत आलेले असले, तर त्या कॅपिटलायझेशनचा तपशील प्रॉस्पेक्टसमध्यें दिला पाहिजे.

(११) कंपनीच्या पूर्वीच्या दोन वर्षांतील पुनर्मूल्यमापनामुळें वाढावा दिसला, तर त्याचा तपशील देऊन त्या वाढाव्याची कशी व्यवस्था लावली, हें दाखविलें पाहिजे.

कांहीं बाबतींत, अकौंटंटसचे रिपोर्ट प्रॉस्पेक्टसला जोडण्यांत आले पाहिजेत. एखाद्या तज्ज्ञाचें विधान प्रॉस्पेक्टसमध्यें उद्धृत केलें असेल, तर त्या तज्ज्ञाची त्या प्रसिद्धीला लेखी संमति मिळविण्यांत आलेली असली पाहिजे. कंपनीच्या उभारणीशीं किंवा व्यवस्थेशीं त्या तज्ज्ञाचा कांहींहि संबंध असतां कामा नये.

स्टॉकएक्सेंजवर कोटेशन मिळविण्यासाठीं अर्ज केला जाईल असें प्रॉस्पेक्टसमध्यें म्हटलेलें असेल, तर प्रॉस्पेक्टस् काढल्यापासून दहा दिवसांत तसा अर्ज पाठविण्यांत आला पाहिजे. शेअर्सच्या मागणी-अर्जाची मुदत संपल्यावर ठराविक मुदतींत स्टॉक-एक्सचेंजकडून परवानगी मिळाली नाहीं, तर शेअरसाठीं अर्ज करणारांच्या रकमा ८ दिवसांत परत केल्या पाहिजेत.

प्रॉस्पेक्टस् काढल्यापासून १२० दिवसांत 'मिनिमम सब-स्क्रिप्शन'ची रक्कम जमली नाहीं, तर त्यानंतर १० दिवसांत अर्जदारांचे पैसे परत केले पाहिजेत.

### शेअर्सचे प्रकार—डिफर्ड शेअर्स जाणार

डिफर्ड शेअर्स नव्या कायद्यानें काढून टाकले आहेत. मतें, डिव्हिडंड किंवा इतर कोणत्याहि बाबतींत अप्रमाण अधिकार देणारे कोणतेहि शेअर्स नव्या कायद्याला संमत नाहींत. ह्यापुढें फक्त दोनच शेअर्स राहतील—(१) ऑर्डिनरी व (२) डिफर्ड. शेअर्सवर भरलेल्या रकमांचे प्रमाणांत मताचे अधिकार राहातील. नवा कायदा सुरू झाल्यापासून एक वर्षाचे आंत डिफर्ड शेअर्सचें इतर शेअर्समध्यें रूपांतर करण्यांत आलें पाहिजे.

### शेअर ट्रॅन्स्फर

एखाद्याची डायरेक्टरांविरुद्ध शेअर्सची वर्गावर्गी नोंदण्याबाबत तक्रार असेल तर त्याबाबत अपिलाची तजवीज करण्यांत आलेली आहे. नोंदण्यास नकार दिल्यापासून दोन महिन्यांचे आंत मध्यवर्ती सरकारकडे तक्रारीचा अर्ज गेला पाहिजे. अपिलाचें काम गुप्तपणें चालेल.

### नोंदलेली कचेरी हलविणें

एखाद्या शहराच्या, गांवाच्या किंवा खेड्याच्या बाहेर कंपनीचें रजिस्टर्ड ऑफिस हलविणें असेल, तर त्याला शेअरहोल्डर्सचा स्पेशल ठराव आवश्यक आहे. कचेरी एका राज्यांतून दुसऱ्या राज्यांत न्यावयाची असल्यास त्याला कोर्टाची मंजुरीहि पण हवी.

### भागीदारांची सभा

वार्षिक सभा भरविण्यासाठीं दिलेली मुदत कांहीं विशिष्ट बाबतींत वाढवून देण्याचा अधिकार रजिस्ट्रारला देण्यांत आलेला आहे; पूर्वी तो नव्हता. वार्षिक सभा भरविण्यांत आलेली नसली, तर ती भरविण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारला राहील. भागीदारांच्या सभेस पूर्वी १४ दिवसांची नोटीस पुरत असे; आतां २१ दिवसांची नोटीस लागेल.

नोटिशींत सभेची तारीख, जागा, वेळ, ह्याप्रमाणें सभेंत होणाऱ्या विशेष कामाचा महत्त्वाचा सर्व तपशील दिला पाहिजे. दुसऱ्या भागीदारांना आपला सभासदत्वाचा अधिकार वापरतां यावा ह्यासाठीं बिगर-सभासदांनाहि प्रॉक्सी म्हणून नेमतां येईल. ज्यांना एकापेक्षा अधिक मतें आहेत, असे भागीदार त्या मतांपैकीं कांहींच मतेंहि फक्त देऊं शकतील; त्यांना कांहीं मतें अनुकूल व कांहीं मतेंहि प्रतिकूल अशींहि देतां येतील. पोलसंबंधीं तंत्र तपशीलवार दिलें आहे.

### ठरावांचे प्रकार

(१) ऑर्डिनरी, (२) एक्स्ट्रॉ-ऑर्डिनरी व (३) स्पेशल, असे तीन प्रकारचे ठराव १९१३ च्या कायद्यास संमत होते. नव्या कायद्यानें एक्स्ट्रॉ-ऑर्डिनरी ठराव काढून टाकले आहेत. स्पेशल ठरावाच्या नव्या व्याख्येप्रमाणें, ठरावाला विरुद्ध पडणाऱ्या मतांच्या तिप्पट मतें अनुकूल पडलीं पाहिजेत. पूर्वीपेक्षा कितीतरी ज्यास्त बाबतींना आतां भागीदारांच्या स्पेशल ठरावाची आवश्यकता निर्माण करण्यांत आली आहे. "स्पेशल नोटिशीची आवश्यकता असणारे ठराव" अशा ठरावांचा नवा प्रकार निर्माण करण्यांत आला आहे. ह्या ठरावाला २८ दिवसांची नोटीस लागेल. कांहीं बाबतींत डायरेक्टर्स किंवा ऑडिटर्स नेमण्याच्या बाबतींत हा ठराव जरूरीचा असेल.

### जाहीर केलेलें डिव्हिडंड वाटलें पाहिजे

डिव्हिडंड जाहीर केलें तरी तें प्रत्यक्ष दिलें जात नाहीं, अशा बऱ्याच तक्रारी होत्या. जाहीर केलेलें डिव्हिडंड वाटलें नाहीं, तर दंडाबरोबर ७ दिवस कैदेचीहि शिक्षा सांगितली आहे. मॅनेजिंग एजंटसबरोबर डायरेक्टर्सहि जबाबदार धरले जातील.

### हिशेब

बिनचुक हिशेबाबद्दल डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंटस् ह्यावर जबाबदारी टाकली आहे. सबसिडिअरी कंपन्यांचे ताळेबंद, नफा-तोटापत्रकें, ऑडिटरांचे रिपोर्ट, इतकेंच नव्हे तर इतरहि कित्येक पत्रकें होल्डिंग कंपन्यांच्या हिशेबाच्या पत्रकांस जोडण्यांत आलीं पाहिजेत.


### ऑडिट

एकदां नेमलेला ऑडिटर बदलणें नव्या कायद्यानें अत्यंत अवघड करून ठेवलेलें आहे. साधारण सभांच्या नोटिसा त्याला गेल्या पाहिजेत; ह्या सभांत त्याचा संबंध असलेल्या बाबींवर बोलण्याचा त्याला अधिकार राहील.

### इन्स्पेक्शन

१९१३ च्या कायद्यांत इन्स्पेक्शनची तरतूद होती. पण ती

विपुल अुत्पादनासाठीं—



किर्लोस्कर

ओव्ही १. सेरीज 2
डिझेलओन्जिन
व
सेन्ट्रिफ्युगल पंप

किर्लोस्कर ऑईल ओन्जिन्स लिमिटेड
एलफिन्स्टन रोड, खडकी, पुणें ३

TOM & BAY LTD.

— सुंदर बनारसी पातळें, नवीन जरीचीं लुगडीं —
व
मिलचें कापड
—यांकरितां—

शाहाडे-आठवले लि., दादर

शाहाडे बिल्डिंग; एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई २८
:: टेलिफोन ६०५५४ ::

अपुरी होती. इन्स्पेक्टर्स नेमण्याच्या आवश्यक त्या अटी पुऱ्या पडणें अवघड जात असे व भागीदारांना किंवा रजिस्ट्रारला कंपन्यांतील गैरव्यवस्था माहीत असली तरी गप्प रहावें लागे. नव्या कायद्यानें ही अडचण दूर केली आहे, एवढेंच नव्हें तर नव्या तरतुदी फारच परिणामकारक व कडक आहेत. इन्स्पेक्टर्सना अधिकारहि व्यापक राहतील. इन्स्पेक्शन पुरी झाल्यावर सरकार जरूरीप्रमाणें भागीदारांच्या हितासाठी योग्य ते उपाय योजूं शकेल किंवा खटले भरूं शकेल.

### डायरेक्टर बोर्ड

पब्लिक कंपन्यांना किमान तीन व प्रायव्हेट कंपन्यांना किमान दोन डायरेक्टर्स हवेत. फक्त व्यक्तीच डायरेक्टर होऊं शकेल; फर्मला किंवा कंपनीला डायरेक्टर होतां येणार नाहीं. पब्लिक कंपनीच्या डायरेक्टरांपैकी दोनतृतीयांशांची जागा आलटूनपालटून रिकामी होईल; दरवर्षी एकतृतीयांश डायरेक्टरांची निवृत्त होण्याची पाळी येईल. १९५१ च्या कायद्यानें, डायरेक्टर्स व मॅनेजिंग एजंट्स ह्याविषयीं केलेल्या दुरुस्त्या आतां नव्या कायद्यांत समाविष्ट झाल्या आहेत. प्रत्येक डायरेक्टराच्या निवडणुकीसाठी स्वतंत्र ठराव करावा लागेल. निवृत्त होत नसलेला डायरेक्टर वगळून बाकीचा कोणीहि निवडून आला तर त्याची संमति प्रथम मिळवून ती रजिस्ट्रारकडे नोंदविण्यांत आलेली पाहिजे. प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशनच्या तत्त्वानें डायरेक्टर्सची निवड होण्यास आर्टिकलसमध्यें वाव आहे. डायरेक्टरच्या पात्रतेस ५,००० रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे शेअर्स कधींच आवश्यक असणार नाहींत.

### डायरेक्टर कोणाला होतां येणार नाहीं?

कंपनी, तिचे मॅनेजिंग एजंट किंवा तिच्या सबसिडिअरी कंपन्या ह्यांचे अधिकारी व नोकर ह्यांना डायरेक्टरचे जागेसाठी उभे रहातां येणार नाहीं. "स्पेशल नोटीस" देऊन भरविलेल्या भागीदारांच्या सभेनें मुद्दाम संमति दिली, तर मात्र हें शक्य होईल. वयाला ६५ वर्षे झालेल्याला डायरेक्टर नेमतां येणार नाहीं. वरप्रमाणेंच भागीदारांनीं मुद्दाम संमति दिली, तर गोष्ट वेगळी. कोणत्याहि डायरेक्टरला एकाच उमे वेळीं २० पेक्षा जास्त कंपन्यांत डायरेक्टर म्हणून रहातां येणार नाहीं. डायरेक्टराची मुदत संपण्यापूर्वी त्याला दूर करण्याचा अधिकार भागीदारांना देण्यांत आला आहे.

### डायरेक्टरांच्या अधिकारावर नियंत्रण

डायरेक्टरांचे अधिकार व त्यांचा वापर, ह्यावर कायद्यानें बरींच नियंत्र तलेलीं आहेत. बोर्डाची सभा तीन महिन्यांतून एकदां तरी झाली पाहिजे. बोर्डाचे कांहीं ठराविक अधिकार सभेंतच वापरले गेले पाहिजेत. कॉल्स करणें, डिबेंचर्सच्या किंवा इतर मार्गांनीं कर्ज उभारणें, ज्या करारांत डायरेक्टरांचा हितसंबंध आहे अशा करारांस मंजुरी देणें, त्याच व्यवस्थेखालील कंपन्यांच्या भागांत व डिबेंचसमध्यें पैसे गुंतविणें, दुसऱ्या कंपनींत मॅनेजर किंवा मॅनेजिंग डायरेक्टर असणारांना मॅनेजर अथवा मॅनेजिंग डायरेक्टर नेमणें, बोर्डातील तात्कालिक रिकाम्या जागा भरणें, हे सर्व अधिकार बोर्डानें सभेंतच वापरले पाहिजेत. बोर्डानें सोल एजंटाची नेमणूक केली, तर त्यास भागीदारांच्या सभेकडून सहा महिन्यांत मंजुरी मिळविली पाहिजे. भागीदारांच्या ठरावाखेरीज डायरेक्टरांना पुढील गोष्टी करतां येणार नाहींत:—

(१) सबंध धंदा किंवा त्याचा मोठा भाग विकणें, भाड्यानें देणें.

(२) डायरेक्टराकडून येणें असलेल्या कर्जाची मुदत वाढविणें किंवा कर्ज माफ करणें.

(३) धंद्याच्या, त्याच्या मालमत्तेच्या किंवा जामिनीच्या विक्रीची रक्कम ट्रस्ट सिक्युरिटीजखेरीज इतरत्र गुंतविणें.

(४) वसूल भांडवल अधिक 'फ्री' रिझर्व्हज, ह्यांच्या मर्यादेपलीकडे कर्जे काढणें. नित्याच्या व्यवहारांत बँकेकडून तात्कालिक कर्जे घेण्यास हरकत नाहीं.

(५) कोणत्याहि वर्षी २५,००० रुपयांपेक्षा ज्यास्त किंवा पूर्वीच्या तीन वर्षांच्या नफ्याच्या सरासरीच्या ५% पेक्षा अधिक रक्कम धर्मादाय किंवा इतर फंडांस देणगीदाखल देणें.

### डायरेक्टरांना कर्जे

डायरेक्टर आणि त्यांचा संबंध असलेल्या फर्म्स व प्रायव्हेट कंपन्या, ह्यांना कर्जे देण्यास १९१३ च्या कायद्यानें बंदी केलेलीच होती. ह्या बाबतींतील निर्बंध वाढविण्यांत आले आहेत.

### डायरेक्टरांचा मुशाहिरा

डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंटस, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स, मॅनेजिंग डायरेक्टर्स आणि मॅनेजर्स, ह्या सर्वांना मिळून ठराविक प्रमाणापेक्षा अधिक रकमा मिळता कामा नये. ही कमाल रक्कम निश्चित करतांना, डायरेक्टरांची 'सिटिंग फी' मोजली जाणार नाहीं. नफा झाला नाहीं किंवा अपुरा झाला, तर ही कमाल मर्यादा लागू पडणार नाहीं; पण एका वर्षांत एकूण खर्च ५० हजार रुपयांपेक्षा अधिक होता कामा नये. योग्य त्या ठिकाणीं ही अट सैल करून ज्यास्त मुशाहिरा देणें शक्य करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारास आहे. कंपनीचें पूर्ण वेळ काम करणाऱ्या डायरेक्टरांना नफ्याच्या कांहीं प्रमाणांत हिस्सा देण्यास हरकत नाहीं; हा हिस्सा एकच असा डायरेक्टर असल्यास कमाल ५% व जास्त असे डायरेक्टर असल्यास कमाल १०% असें त्या हिश्शाचें प्रमाण असावें. भागीदारांच्या स्पेशल ठरावानें इतर डायरेक्टरांनाहि (ज्यांना मासिक वेतन मिळत नाहीं) नफ्याचा कांहीं अंश देतां येईल. कंपनीची व्यवस्था मॅनेजिंग एजंट, मॅनेजिंग डायरेक्टर, मॅनेजर, सेक्रेटरीज अँड ट्रेझरर्स किंवा पूर्ण वेळ काम करणारा डायरेक्टर ह्यांकडे असल्यास, ह्या खातीं एकूण कमाल खर्च निव्वळ नफ्याच्या १% पेक्षा जास्त होऊं नये. इतर बाबतींत ३% ला परवानगी आहे.

### डायरेक्टरांना कडक शासनाची तरतूद

कंपनी कायद्याप्रमाणें कंपनीचा कारभार चालविण्याची संपूर्ण जबाबदारी डायरेक्टरांवर टाकण्यांत आलेली आहे व त्यांत त्यांची चूक झाल्यास कडक शासनाची तरतूद केलेली आहे. उदाहरणार्थ,

(१) शेअर्सच्या अर्जापोटीं आलेले पैसे शेडयूल्ड बँकेंत न ठेवल्यास ५,००० रु. पर्यंत दंड.

(२) डिव्हिडंड जाहीर केल्यानंतर तें तीन महिन्यांचे आंत न वांटल्यास ७ दिवसांपर्यंत कैद व दंड; दंडाची कमाल रक्कम सांगितलेली नाहीं.

(३) कायद्यांतील तरतुदीप्रमाणें ताळेबंद व डायरेक्टरांचा रिपोर्ट नसेल, तर ६ महिन्यांपर्यंत कैद व १,००० रु. पर्यंत दंड.

(४) डायरेक्टरांना कायद्याविरुद्ध कर्जे दिल्यास ६ महिन्यांपर्यंत कैद व ५,००० रु. पर्यंत दंड.

(५) कंपनींतील स्वतःच्या शेअर्ससंबंधीं तपशील कंपनीला कळूं न दिल्यास २ वर्षेपर्यंत कैद व ५,००० रु. पर्यंत दंड.

अशा कित्येक तरतुदी आहेत, कीं त्यामुळें कंपनीचे डायरेक्टर होणें ही गोष्ट आतां अत्यंत जबाबदारीची होणार आहे.

### मॅनेजिंग एजंटस

सरकार केव्हांहि जाहीर करील, कीं विवक्षित उद्योगधंदा ह्यापुढें मॅनेजिंग एजंटांच्या व्यवस्थेखालीं रहाणार नाहीं. ह्या नोटिफिकेशननंतर तीन वर्षांचे आंत, ह्या धंद्याच्या कंपनीची व्यवस्था मॅनेजिंग एजंटाकडे राहणार नाहीं. कंपनी अनेक उद्योगधंदे करीत असली आणि त्यांपैकीं काहींच उद्योगधंद्यांना नोटिफिकेशन लागू असली तरी त्या कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सीवर गदा येईल; नोटिफाइड उद्योगधंद्यांपुरतीच ती मर्यादित रहाणार नाहीं.

जी कंपनी मॅनेजिंग एजंट म्हणून काम करते, तिची स्वतःची व्यवस्था पुनः मॅनेजिंग एजन्सीकडे असूं नये. मध्यवर्ती सरकारच्या पूर्व मंजुरीशिवाय, ह्याच्यापुढें कोणाचीहि मॅनेजिंग एजंट म्हणून नेमणूक होऊं शकणार नाहीं. सार्वजनिक हिताच्या विरुद्ध अशी नेमणूक होणार नाहीं, अशी स्वतःची खात्री झाल्यावरच सरकार मंजुरी देईल. १५ ऑगस्ट, १९६० पूर्वी पुनः नव्यानें नेमणूक केल्याखेरीज, चालू सर्व मॅनेजिंग एजन्सीज त्या दिवशीं रद्द होतील; पहिल्या नेमणुकीची मुदत १५ वर्षे राहील; पुनः नेमणुकीची मुद्दत १० वर्षांची असेल. १५ ऑगस्ट, १९६० नंतर, कोणत्याहि मॅनेजिंग एजंटाला १० पेक्षा अधिक कंपन्यांची व्यवस्था पहातां येणार नाहीं.

एकाच व्यवस्थेखालीं अनेक कंपन्या असतील, तर त्या कंपन्यांतील एकमेकांमधील गुंतवणुकीवर बरींच बंधनें रहातील.

कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या १०% पेक्षा जास्त मेहेनताना मॅनेजिंग एजंटांना मिळणार नाहीं. जास्त मेहनताना द्यावयाचा असेल, तर त्याला कंपनीचा स्पेशल ठराव हवा व त्याला मध्यवर्ती सरकारनें सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें दिलेली मंजुरी हवी. मॅनेजिंग एजंटांना ऑफिस अलावन्स मिळणार नाहीं; पण बोर्ड मंजुरी देईल तेवढा प्रत्यक्ष खर्च त्यांना कंपनीकडून मिळूं शकेल.

नफा झाला नाहीं किंवा अपुरा झाला तर मॅनेजिंग एजंटाला मिळावयाचा किमान मेहेनताना वार्षिक ५०,००० रुपयांपेक्षा अधिक असतां कामा नये. खास कारणासाठीं मध्यवर्ती सरकारला अपवाद करण्याचा अधिकार आहे. डायरेक्टर बोर्डावर आपला प्रतिनिधी नेमण्याचा मॅनेजिंग एजंटाचा अधिकार राहील. बोर्डांत पांच पेक्षा ज्यास्त डायरेक्टर असल्यास दोन डायरेक्टर त्याला नेमतां येतील; त्यापेक्षा कमी डायरेक्टर बोर्डांत असतील, तर त्याला एकच डायरेक्टर नेमतां येईल.

कंपनीचे खरेदीसाठीं किंवा विक्रीसाठीं एजंट म्हणून मॅनेजिंग एजंट किंवा सहकारी (असोसिएटस) ह्यांची नेमणूक भारतांत करतां येणार नाहीं. भारताबाहेर, कांहीं विशिष्ट परिस्थितींत, भागीदारांच्या स्पेशल ठरावानें, अशी नेमणूक करतां येईल.

### अडव्हायसरी कमिशन

पांच सभासदांचें एक सल्लागार मंडळ नेमण्याचा मध्यवर्ती सरकारला अधिकार राहील. कायद्याच्या कक्षेतील विविध बाबींवर सरकारला सल्ला देणें, हें कमिशनचें काम असेल. एक प्रसिद्ध न्यायाधीश, उद्योगधंद्यांचा एक प्रतिनिधी व एक ऑडिटर, ह्यांचा कमिशनमध्यें समावेश केला जाईल, असें अर्थमंत्र्यांनीं सूचित केलेलें आहे.

### वाइंडिंग अप

वाइंडिंग अप च्या बाबतींत नव्या कायद्यानें बऱ्याच सुधारणा केलेल्या आहेत.

### विदेशी कंपन्या

हिंदी कंपन्यांनीं ज्या तक्त्याप्रमाणें ताळेबंद व नफातोटापत्रकें तयार करावयाचीं आहेत, तोच तक्ता विदेशी कंपन्यांना लागू केला जाईल. त्यांच्या प्रॉस्पेक्टसमधील मजकुरालाहि हिंदी कंपन्यांचा प्रॉस्पेक्टसबाबत कायदा बहुंशीं लागूं होणार आहे.

### सरकारी कंपन्यांना सवलत

कंपनीच्या भांडवलापैकीं ५१% किंवा अधिक भांडवल मध्यवर्ती किंवा राज्य सरकार धारण करीत असेल तर त्या कंपनीस सरकारी कंपनी असें म्हटलें जाईल. सरकारी कंपनीला नव्या कंपनी कायद्यांतील तरतुदी लागू करतांना, सरकार त्यांत तारतम्यानें बदल करूं शकेल.


४२ वर्षांवर चाललेली, कोल्हापुरांतील पहिली सहकारी बँक

**दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, कोल्हापूर.**

(स्थापना सन १९१३ इसवी)

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २,००,००० |
| खपलेलें शेअर भांडवल | ९८,२४० |
| रिझर्व्ह फंड | ८७,२४८ |
| इतर फंडस् | ८२,५८२ |

सर्व वर्गांचे सभासदांच्या उपयोगी पडणारी संस्था. सुरक्षित व आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात. सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

प. प. बोगार, बी. ए., मॅनेजर. प. एम्. मौलवी, प्रेसिडेंट.



**पुणें पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

२७०, सदाशिव पेठ, पेरूगेटाजवळ, पुणें शहर.

सहकारी चळवळीशीं अनेक वर्षें ज्यांचा निकटचा संबंध आहे, अशा अनुभवी कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखालीं चाललेली एक नवीन सहकारी बँक.

सभासदांना व नाममात्र सभासदांना वेगवेगळ्या योजनेप्रमाणें रु. २५,००० पर्यंत व्यक्तिशः कर्ज देणारी पुणें शहरांतील हीं एकच अर्बन बँक आहे. हिचा फायदा गरजूंनीं अवश्य घ्यावा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# हिंदी बँका आणि उद्योगधंदे

## भांडवलाचा प्रश्न

ता. १ जुलै, १९५५ ह्या दिवशीं भारतीय सरकारनें इंपीरिअल बँक ऑफ इंडिआ आपल्या ताब्यांत घेतली आणि. तिचें स्टेट बँक ऑफ इंडिआ असें रूपांतर केलें. राष्ट्रीयीकरणाच्या सरकारच्या धोरणांतील पहिली ही मोठी पायरी होती. ह्या दिवशीं इंपीरिअल बँकेच्या ४०० शाखा होत्या आणि शेजारच्या देशांशीं मोठ्या प्रमाणावर व्यवहारहि होते. भारतांत जितक्या बँका कार्य करीत होत्या त्यांच्याजवळ जितक्या एकूण ठेवी होत्या, त्यापैकी सुमारें ⅓ ठेवी स्टेट बँकेच्या अखत्यारांत आल्या. ३१ डिसेंबर, १९५४ ह्या दिवशीं अशा ठेवींची एकूण रक्कम ९८७·६ कोटी रुपये होती. अशा रीतीनें देशांतील बँकिंगच्या व्यवहाराच्या बऱ्याच मोठ्या भागाचें नियंत्रण भारतीय सरकारनें आपल्याकडे घेतलें. वास्तविक, मालकीव्यवस्थेंत आणि नियंत्रणांत झालेल्या ह्या बदलामुळें देशांतील द्रव्यविषयक व्यवहारांवरील सरकारच्या देखरेखींत फार मोठा फरक पडला, असें नाहीं. कारण, ३५ वर्षांपूर्वी कायदेशीरपणानें अस्तित्वांत आलेली इंपीरिअल बँक सरकारतर्फे नाणेबाजारावर अंशतः हुकमत ठेवत होतीच.

### स्टेट बँकेची स्थापना

इंपीरिअल बँकेचें विसर्जन करून स्टेट बँकेची स्थापना करण्याचें कारण काय? ग्रामीण भागांत बँकिंगची वाढ करणें आणि पतीवरील व्यवहारांची तेथें सोय करणें हे दोन प्रमुख उद्देश साध्य करण्यासाठीं स्टेट बँकेची स्थापना करण्यांत आली. ग्रामीण विभागांत कार्य करण्यास व्यापारी बँका तयार नव्हत्या अगर त्यांना तें शक्य नव्हतें. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिआ-च्या आदेशाप्रमाणें ग्रामीण भागांतील अर्थव्यवस्थेची पहाणी करण्यासाठीं एक कमिशन नेमण्यांत आलें होतें. कमिशननें सुचविलेल्या योजनेप्रमाणें स्टेट बँक ही मध्यवर्ती बँक कल्पून तिला आणखी १० किंवा १२ बँका जोडण्यांत येतील. ह्या बँकांचें राज्य–सरकारांशीं आधींच संबंध आहेत. ही योजना पूर्ण झाली म्हणजे भारताची स्टेट बँक ही आशिआंतील अशा प्रकारच्या संस्थांपैकी सर्वांत मोठी संस्था होईल.

### जुन्या मागणीची पूर्तता

भारताच्या ग्रामीण भागांत ठिकठिकाणीं बँकेच्या अनेक शाखा काढून पतीचे व्यवहार स्वस्त करणें आणि सावकारांची उचलबांगडी करणें हें स्टेट बँकेचें उद्दिष्ट आहे. पिकांना आर्थिक मदत देण्याचें कार्य इंपीरिअल बँक ह्यापूर्वी दलालांच्या द्वारां करीत होतीच. ह्या पद्धतींत प्राथमिक कर्जदार जी रयत, तिचा बँकिंगशीं फारच थोडा संबंध येत असे. स्टेट बँकेच्या शाखांच्या द्वारां रयतेशीं अधिक निकटचा संबंध येईल अशी आशा करण्यांत येत आहे. ह्या योजनेच्या चांगल्या हेतूबद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं. भारतीय सरकारनें समाजवादी पद्धतीची समाजरचना अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. ग्रामीण भागांतील बँकिंगला आज सहकारी लँडमॉर्टगेज बँका आणि जिल्हा बँका ह्यांच्याकडून तुटपुंजा आधार मिळत आहे. पण समाजवादाचें ध्येय अशा कमकुवत आधारावर अवलंबून ठेवण्याची अपेक्षा सरकारला अर्थातच बाळगतां येणार नाहीं. शिवाय, इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण ही फार वर्षांपासून करण्यांत येत असलेली राजकीय मागणी होती.

### बाजारभाव आणि बँकांचीं कर्जें

१९५४ मधील बँकिंगच्या धंद्यांतील प्रवृत्ति व प्रगति ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेनें जो अहवाल प्रसिद्ध केला आहे, त्यांत गेल्या वर्षांतील शेतीच्या मालाच्या उतरत्या किंमतींकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे. शेतीच्या मालाच्या किंमतींत घट होण्याचें कारण म्हणजे अन्न-धान्याच्या उत्पादनांत झालेली मोठी वाढ. अन्न-धान्याच्या उत्पादनाच्या ठरलेल्या उद्दिष्टापेक्षा ४४,००,००० टन अधिक धान्य निर्माण झालें. त्याचप्रमाणें रोखीच्या पिकांच्या उत्पादनांतहि बरीच वाढ झाली. १९५४ सालीं घाऊक किंमतींचा अधिकृत निर्देशांक बहुधा एकसारखा उतरत चाललेला दिसतो. बारा महिन्यांत निर्देशांकांत ६·५ टक्के घट झाली. ह्याच्या उलट, १९५३ सालीं निर्देशांकांत ४·८ टक्के वाढ झाली होती. १९५४ च्या दुसऱ्या अर्धांत निर्देशांकांतील उलटापालट अधिक त्वरेनें झालेली दिसते. १९५५ सालांतहि हीच प्रवृत्ति चालू राहिलेली दिसते. १९५४ च्या जुलैच्या सुरवातीला निर्देशांक ३८१·६ होता. १९५५ च्या जुलैच्या पहिल्या आठवड्यांत तो ३५०·९ होता. ३१ डिसेंबर, १९५४ अखेर सर्व शेड्यूल्ड बँकांनीं उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जांची रक्कम १९०·९ कोटी (३४·३ टक्के) होती. २७७·९ कोटी रु. ची (४९·९ टक्के) कर्जें व्यापारी स्वरूपाचीं होतीं. फक्त ४·५ कोटी (०·८ टक्के) रुपयांचीं कर्जें अन्नधान्यें अगर इतर शेतीचा माल ह्यावर दिलेली होती. एक वर्षापूर्वी शेतीसाठीं दिलेल्या कर्जांची रक्कम ११·९ कोटी रुपये होती. ह्या आंकड्यांवरून सरकारी अधिकाऱ्यांनीं असें मत बनविलें आहे कीं, व्यापारी बँका देशांतील शेतीविषयक अर्थव्यवस्थेशीं बऱ्याच अंशीं अपरिचित आहेत; आणि त्यांचें हें मत खरें दिसतें. तथापि, ही परिस्थिति अगदीं बिनचूक म्हणतां यावयाची नाहीं. कारण, व्यापारी कर्ज म्हणून दिलेल्या रकमांपैकीं कांहीं भाग पिकांसाठीं दिलेला असतो. सहकारी बँकांनीं दिलेलीं कर्जें तर बहुशः सर्वच शेतीसाठीं दिलेलीं असतात. १९५३ च्या मध्याच्या सुमारास अशा कर्जांची रक्कम ८८ कोटी रुपये होती.

### सरकारची उद्योगपतीची भूमिका

हिंदी बँका आणि देशांतील उद्योगधंदे ह्यांचे संबंध कशा प्रकारचे आहेत? भारतांतील वाढत्या उत्पादनासाठीं जो वाढता पैशाचा पुरवठा लागतो तो पुरविणें हें बँकांचें कार्य आहे. ह्या व्यवहारांत कच्च्या मालांत एकसारखा पैसा गुंतवावा लागतो. उद्योगधंद्यांना जें कायम स्वरूपाचें खेळतें भांडवल लागतें तें स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत बँकांनीं पुरविलें. पण हा काळ आतां संपलेला दिसतो. उद्योगधंद्यांना लागणारें दीर्घ मुदतीचें भांडवल नाणेबाजारांतून सामान्यतः मिळावयास हवें. ज्या कंपन्या नफावाटणीच्या बाबतींत समाधानकारक इतिहासाकडे बोट दाखवूं शकतात त्यांना असें भांडवल मिळण्यांत विशेष अडचणी भासत नाहींत. पण ताग आणि साखर ह्या दोन धंद्यांच्या बाबतींत मात्र सरकारला मदतीचा हात पुढें करावा

लागला आहे. ह्या दोन धंद्यांचें विस्तृत आधुनिकीकरण करण्याच्या योजना आखण्यांत आल्या आहेत. भारतीय सरकार हें स्वतःच एक मोठा उद्योगपति बनत चाललें आहे. रेल्वे एंजिनें, टेलिफोन व टेलिग्राफचें साहित्य, खतें, इत्यादि माल तें स्वतःच तयार करूं लागलें आहे. अशा प्रकारच्या सार्वजनिक योजनांना मोठ्या प्रमाणावर भांडवल लागतें आणि तें सर्वच कांहीं अंदाजपत्रकांतील शिलकींतून उभारतां येत नाहीं. त्यामुळें नाणेबाजारांत नियमितपणें कर्जें उभारावीं लागतात. १९५४ अखेर शेड्यूल्ड बँकांच्या एकूण गुंतवणुकींपैकीं ८६·४ टक्के ( ४१३·९ कोटी रुपये ) गुंतवणूक सरकारी रोख्यांत होती. त्यांपैकीं बहुतेक रोखे मध्यम व दीर्घ मुदतीचे होते. नॅशनल प्लॅन बाँडसच्या दुसऱ्या १०० कोटी रुपयांच्या कर्जाला चांगली साद मिळाली. बँका व विमा कंपन्या सरकारी रोख्यांना चांगला पाठिंबा देतात. मध्यवर्ती सरकारांच्या कर्जांच्या मानानें राज्य सरकारांचीं कर्जें लहान असतात, पण त्यांच्याबद्दल मात्र ह्या संस्था अगर व्यक्ती फारसा उत्साह दाखवीत नाहींत.

### श्रीमंतांना गरीब करणें सोपें आहे, पण

भारतामधील भांडवलाच्या बाजारासंबंधीं विचार करतांना पार्लमेंटमधील काँग्रेस पक्षाची भांडवलशाहीच्या विरोधी वृत्ति लक्षांत घेतली पाहिजे. शिवाय, मधून मधून राष्ट्रीयीकरणाची भीतीहि घालण्यांत येत असते. खाजगी भांडवलदारी पद्धतींत बचत व पैशाची गुंतवणूक ह्यांना एक स्थान आहे. सध्यांची भांडवलदारी रचना मोडून टाकण्याचे जे प्रयत्न मधून मधून करण्यांत येतात त्यांच्यामुळें त्या स्थानाला धोका उत्पन्न झाल्याशिवाय रहाणार नाहीं. व्यक्तीगत उत्पन्नावर घेण्यांत येणारे कर भारतांत आतां जबर आहेत. ब्रिटनमधील मोठ्या उत्पन्नाच्या लोकांकडून जितके कर घेण्यांत येतात तितकेच जवळ जवळ भारतांत घेण्यांत येत आहेत. भारताच्या एकूण ३५ कोटी लोकसंख्येपैकीं ९० टक्के लोक अतिशय दरिद्री आहेत. त्यामुळें पैसे वाचवून ते भांडवल म्हणून गुंतविण्याचें काम अगदीं लहान, अल्पसंख्याक, गट करीत असतो. ह्याच छोट्या गटावर भारतीय सरकारच्या समानतेच्या धोरणाचा बोजा पडत आहे. भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत औद्योगिक विस्तारावर जोर देण्यांत आला आहे. ह्यावेळीं बचतींतून भांडवल उभारण्याची अतिशय जरूर आहे. पण मुंबईतील एका ब्रोकर कंपनीनें म्हटल्याप्रमाणें, करचौकशी समितीच्या शिफारसी ह्या उद्दिष्टाला पूरक अशा नाहींत. ही कंपनी आपल्या वार्षिक अहवालांत म्हणते कीं, भारतासारख्या देशांत श्रीमंतांना गरीब करणें सोपें आहे. पण असें करण्यामुळें जे परिणाम होतात ते टाळण्यासाठीं अगर सौम्य करण्यासाठी जर हेतुपूर्वक उपाय योजण्यांत आले नाहींत, तर बेकारीमुळें गरीबहि अधिक गरीब होत जातील.

---

### आसाममध्यें कागदाची गिरणी

आसाममध्यें कागदाची पहिलीच गिरणी काढण्याची प्राथमिक तयारी पूर्ण होत आली आहे. गिरणी दिनापूर येथें काढण्यांत येणार असून ती खाजगी मालकीची आहे. भांडवल १ कोटी रुपये आहे.

### परदेशीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या

भारतीय सरकार परदेशीय विद्यार्थ्यांसाठीं १०० शिष्यवृत्त्या देणार आहे. निरनिराळ्या ३२ देशांतील विद्यार्थ्यांना त्या मिळतील. परदेशी विद्यार्थ्यांना हिंदी भाषा शिकण्यासाठीं उत्तेजन देण्यांत येईल.


## पूर्व खानदेश सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. जळगांव

मुख्य कचेरी : जळगांव

तारेचा पत्ता "EKCOBANK" टेलिफोन नं. ३५४

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. १६,०३,४०० |
| राखीव गंगाजळी | रु. १३,४१,५६७ |
| इतर गंगाजळी | रु. ९,३६,४२९ |
| ठेवी | रु. २,१२,६२,०६५ |
| खेळतें भांडवल | रु. २,८५,५६,२८९ |
| सहकारी सो. ना. दिलेलीं कर्जें | रु. १,३०,००,२४५ |

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

शाखा १३ : अंमळनेर, चाळिसगांव, भुसावळ, पाचोरा, चोपडा, पारोळा, यावल, जामनेर, धरणगांव, फैजपूर, बोदवड, एरंडोल आणि रावेर.

उपशाखा १५ : सावदा, वरणगांव, मेहुणबारे, कजगांव, शेंदुर्णी, भडगांव, एदलाबाद, नशिराबाद, निंभोरा, म्हसावद, वरखेडी, भालोद, अडावद, मारवड व नेरी बुद्रुक.

जळगांव हेड ऑफिस, पारोळा व चोपडा शाखेस सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय आहे.

बँकेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

(१) श्री. जे. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी., एम्. एल. ए., चाळीसगांव, अध्यक्ष.
(२) श्री. डी. एम. निकम, बी. ए., एलएल. बी., बार ॲट लॉ., जळगांव, उपाध्यक्ष.
(३) श्री. माधवराव गोटू पाटील, एम्. एल. ए., चोपडा.
(४) श्री. सोनुसिंग धनसिंग पाटील, बी. ए., एलएल. बी., एम्. एल. सी., चाळीसगांव.
(५) श्री. सुपडू भादू पाटील, पाचोरा.
(६) श्री. वामनराव व्यंकटराव पाटील, उपाध्यक्ष डि. लो. बोर्ड, पू. खा., कंडारी.
(७) श्री. दाजीबा फकीरा पाटील, गोवर्धन, ता. अमळनेर.
(८) श्री. सहेबराव सदाशिवराव पाटील, मुडी, ता. अमळनेर.
(९) श्री. भगवान नथु पाटील, आडगांव, ता. पारोळा.
(१०) श्री. देवराव माधवराव पाटील, जमिनदार, गुढे, पेटा भडगांव.
(११) श्री. घनःशाम काशिराम पाटील, बागायतदार व व्यापारी, भुसावळ.
(१२) श्री. दीपचंद चुनिलाल सावदा, बी. ए., एलएल. बी., जामनेर.
(१३) श्री. विठ्ठल चावदस नेहेते, संपादक, बानमीदार, जळगांव.
(१४) श्री. रामराव दगडू पाटील, मानद चिटणीस, पू. खा. जि. विकास मंडळ, जळगांव.
(१५) श्री. भीमसिंग गोविंदसिंग पाटील, जमीनदार, पाथरी, ता. जळगांव.
(१६) श्री. राजाराम यादवराव सोनवणे, बी. ए., मॅनेजिंग डायरेक्टर.
(१७) श्री. धा. द. साळुंखे, बी. एजी. ऑनर्स, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर.

आर. वाय. सोनवणे,
मॅनेजिंग डायरेक्टर

# भारतांतील कापडाच्या गिरण्या

## काल, आज व उद्यां : प्रगतीची दिशा

मनुष्यप्राण्याला अन्नाइतकीच, आपलें शरीर झाकण्यासाठीं व थंडीवाऱ्यापासून शरिराचें संरक्षण करण्यासाठीं वस्त्राची जरूरी लागते. खूप श्रीमंत व सधन लोक रेशमी वस्त्रें, व चांगल्या मध्यम वर्गांतील लोक लोकरीचीं वस्त्रें मुख्यतः वापरतात; पण शेंकडा ९५ लोक कापसाचीं वस्त्रें वापरतात. या लहान लेखांत कापसाच्या कापडासंबंधीं थोडी माहिती देत आहे.

कापडासाठीं हिंदुस्तानची ख्याति व कीर्ति इसवी सनापूर्वी दीड-दोन हजार वर्षे तरी होती. कापडाचा उल्लेख वेदांतून व पुढें महाभारतासारख्या ग्रंथांतून आहे. भारतांत त्या काळीं राजेरजवाडे रेशमी व लोकरीचीं वस्त्रें वापरीत व इतर लोक कापसाचीं. नेसण्यास धोतर, पांघरण्यास उपरणें ( उत्तरीय ) व डोक्यास फेटा असा पोषाख पौराणिक काळीं होता. पुढें भारताबाहेर कापडाची निर्यात व्यापारी करूं लागले. त्या काळीं हिंदुस्तानांत आलेले प्रवासी, कापसाला "झाडावरील लोकर," म्हणून संबोधीत. त्यांनीं व व्यापारी लोकांनीं कापसाचें झाड हिंदुस्तानाबाहेर नेलें. उत्क्रांति तत्त्वाप्रमाणें आपला कापसाचा दर्जा कमी कमी होत गेला, तर इजिप्त-अमेरिकेसारख्या नवराष्ट्रांतील कापूस लांब धाग्याचा व उच्च दर्जाचा निघूं लागला. त्यामुळें यंत्रयुगांत लँकेशायरला त्याचा उपयोग तलम कापड विणण्याकरतां येऊन, पुढें आमचा तलम कापडाचा धंदा बुडविण्यांत त्याला यश आलें.

**तीन हजार वर्षे**—इसवी सनापूर्वी पंधराशें वर्षे व पुढील पंधराशें वर्षे, अशीं तीन हजार वर्षे, हिंदुस्तानास "कापड," मुख्यतः, "झाडावरील लोकरीचें" (म्हणजे कापसाचें) कापड विणण्याचा मक्ता होता. हीं तीन हजार वर्षे, हिंदुस्तानांतील रहिवाश्यांना कापड पुरवून शिवाय हिंदुस्थानबाहेर चारी दिशांना व्यापारी तें पाठवीत असत. तें व्यापाराचें मोठें साधन होतें व परदेशांहून भरपूर उत्पन्न पुरवीत असे. पुढें युरोपियन व्यापाऱ्यांनीं आमच्या देशांत येऊन आमच्याशीं प्रत्यक्ष व्यापार सुरू केला.

इंग्लंड वगैरे युरोपियन राष्ट्रांत यांत्रिक शोध लागून यंत्रयुग सुरू झालें. अठराव्या शतकाचे द्वितीयार्धांत कापसाचें सूत व कापड विणण्याचे यंत्रांचा शोध व उत्क्रांति होत गेली. १७८४ सालीं पॉवरलूम-माग उपयोगांत आला. यंत्रावर भरघोस माल काढतां येऊं लागून तो खूप स्वस्त देता येऊं लागला व त्यामुळें हस्तेव्यवसायास मोठा धक्का बसला. याचें एकच उदाहरण दिलें असतां हें कळेल. १८४० सालीं इंग्लिश १६० नंबरचे सुताचे दीड अटीला फक्त २ आणे १० पै पडत, तर इकडे हातकताईवर तेवढ्या नंबरच्या तेवढ्या सुताला चार आणे पडत.

कापूस साफ करणें, त्याचे बेळू काढणें, त्यापासून सूत कातणें व सुताचें कापड विणणें हीं सर्व कामें यंत्रावर होऊं लागलीं व त्यामुळें उत्पादन वाढून खर्च फार थोडा, त्यामुळें हातानें तयार केलेल्या कापडापेक्षा, यंत्रावरील कापड अति स्वस्त विकतां येऊं लागलें व त्यामुळें आमचा कापडाचा व्यापार मुख्यमुख्य जातींचा बसला. शिवाय, इंग्लंडमध्यें आमच्या तलम कापडावर जबरदस्त कर बसविले गेले व तेथील धंद्याला संरक्षण मिळालें. यंत्रयुगांत व त्यानंतर निर्गत व्यापार इंग्लिश व इतर युरोपियन व्यापाऱ्यांच्या हातीं गेल्यामुळें, ते त्यांच्या फायद्याच्या दृष्टीनें इकडे हालचाली करीत गेले. त्याचा परिणाम आम्ही कापड-विणणारे होतों, ते आम्ही फक्त कापूस पिकविणारे शेतकरी झालों. पाश्चिमात्यांत इंग्रजांनीं येथें यश मिळवून राज्य स्थापलें व व्यापार वाढविला; आम्हीं मागें पडलों.

तिकडे यंत्रांत सुधारणा होत होत्या. तिकडील यंत्रकारखान्याप्रमाणें, या देशांतच यंत्रें आणून त्यावर कापड काढल्यास जास्त फायदेशीर व्हावें, या कल्पनेनें १९ वे शतकाचे सुरुवातीला दोन इंग्लिश व्यापाऱ्यांनीं दोन गिरण्या कलकत्त्याला काढल्या. त्यांपैकीं एक, इतर धंद्यांतील नफ्यामुळें कशीबशी चालली, तर दुसरी थोड्याच दिवसांत बंद पडली. या सुरुवातीचें अपयशामुळें, अशी समजूत झाली कीं, या देशांत यंत्रावर कारखाने फायदेशीर होणार नाहींत. पुढें चाळीस वर्षांनीं, १८५४ ते १८५८ या काळांत, मुंबईला तीन गिरण्या दोन धाडशी पार्शी व्यापाऱ्यांनीं व भडोचला एक एका युरोपियन व्यापाऱ्यानें काढून व त्या यशस्वी करून "कापड-गिरणी" या धंद्याचा पाया घातला व आम्हीं यंत्रयुगाचा फायदा घेऊं लागलों. मधें मधें पाय ओढले गेले तरी या शंभर वर्षांत सारखी प्रगतीच होत गेली. जागतिक परिस्थितीचेमुळें फायदे होत गेले त्याचप्रमाणें जागतिक मंदीचे तडाखे या धंद्याला सहन करावे लागले. १८५४-५८ च्या चार गिरण्यांच्या आतां चारशेचाळीसावर गिरण्या झाल्या. यंत्रयुगाचे पूर्वकालीन स्थानाप्रमाणें, आज १९५४ सालीं कापड उत्पादनांत, पहिलें नाहींतरी, दुसरें मानाचें स्थान आम्हीं पटकावलें आहे व तें आतां आमचें स्वराज्य झाल्यामुळें आम्हीं यापुढें टिकवूं शकूं असा भरंवसा वाटतो. १९५४ सालीं जगांत मुख्य राष्ट्रांत कापड उत्पादन येणेंप्रमाणें:—अमेरिका ९८१ कोटी वार, हिंदुस्तान ५०२ कोटी वार, जपान ३०४॥ कोटी वार, इंग्लंड २०० कोटी वार, जर्मनी २५२ कोटी वार, इटली ११५ कोटी वार.

**कापसास लहानसा शह**—शास्त्रीय शोध अजब वस्तू शोधून काढतात. शास्त्रज्ञांनीं नकली रेशीम तयार केलें. गेल्या ५० वर्षांत यांत खूप प्रगति झाली आहे व नकली रेशीम व तत्सम नवीं सुतें यांपासून वाढत्या प्रमाणावर कापड निघूं लागलें आहे, हें खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

जगांतील एकंदर कापडाची निर्मिति : कोटी वार

| सन | कापसापासून | लोकरीपासून | खऱ्या रेशमापासून | रेऑन पासून | इतर तंतूंपासून |
|---|---|---|---|---|---|
| १९१० | ९५० | १७७ | ५ | १¾ | — |
| १९३१ | १२७० | २२३ | १२½ | ५०¾ | — |
| १९४१ | १२२४½ | २५४ | १०७ | २८१¼ | — |
| १९५१ | १५८० | २५२ | ४४ | ३९५¾ | १६ |

[ टीप—आमचेकडेहि नकली रेशमी कापडावरील मागांचा आंकडा वाढत आहे. १९३१ सालीं एक हजार माग; १९४५ मध्यें दहा हजार, तर १९५६ मध्यें २५,००० माग नकली रेशमावर चालू होते ]

स्थापना सन १९३५ फोन नंबर ५३

# अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली.

जिल्हा–दक्षिण सातारा. | हेड ऑफिस–हरभट रोड, सांगली.
शाखा :—(१) पे ऑफिस, सांगली.
(२) माधवनगर शाखा. माधवनगर (द. सातारा)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रू. | ५.००,०००–०–० |
| वसूल झालेलें भांडवल | रू. | १,८९,०००–०–० |
| रिझर्व्ह फंड | रू. | १,०५,७४१–१३–६ |
| इतर फंड | रू. | १,३१,१८९–८–११ |
| ठेवी | रू. | १८,८८,११५–४–४ |
| एकूण खेळतें भांडवल | रू. | ३३,१८,३०८–१०–१ |

— संचालक मंडळ —

श्री. केशव विनायक तथा दादूकाका भिडे, व्यापारी
श्री. विष्णु हरी माईणकर, B. Sc., LL. B.
श्री. गंगाधर गोविंद विनीवाले
श्री. महादेव हरी गोडबोले, B. A., LL. B., (M. L. C.)
श्री. ज्ञानोबा आप्पाजी येडके, जमीनदार.
श्री. लक्ष्मण दत्तात्रय भिडे
श्री. वामन विष्णु वाटवे, B. A., LL. B. चेअरमन
श्री. गणेश काशिनाथ वांडेकर, D. M. E., कारखानदार
श्री. रामचंद्र लक्ष्मण कुलकर्णी, उदगांवकर, जमीनदार.

पेन्शत वसुलीची व्यवस्था आहे
सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था आहे.
बचत निधि पद्धत चालू आहे.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

एल्. वाय्. लागू, B. A., LL. B., मॅनेजर.



महाराष्ट्रांतील नागरी सहकारी चळवळीमध्यें कित्येक वर्षें लोकादरास व ठेवीदारांच्या विश्वासास पात्र असलेली एकमेव नागरी सहकारी संस्था

# दि पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. पंढरपूर ( जि. सोलापूर )

| | | |
|---|---|---|
| ( १ ) शेअर भांडवल | ... रू. | ६१,१७० |
| ( २ ) रिझर्व्ह फंड | ... रू. | ५४,९१५ |
| ( ३ ) इतर फंडस् | ... रू. | ५५,०३५ |
| ( ४ ) ठेवी | ... रू. | ८,९६,००३ |
| ( ५ ) सरकारी कर्जरोख्यांत | ... रू. | ३,६३,१२३ |
| ( ६ ) खेळतें भांडवल | ... रू. | १०,६७,११३ |

या बँकेंत मुदतीच्या ठेवी, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणावर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक्स, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी–विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तसेंच सभासदांमध्यें बचतयोजनेचा प्रचार करणेचे दृष्टीनें या बँकेंत ' सभासद प्रॉव्हिडंट फंड ' पद्धति सुरू केली आहे.

दागदागिने, मौल्यवान् वस्तु व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं अवश्य फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां ऑफिसकडे लिहा.

पं. रा. कुलकर्णी, जी. डी. सी. अँड ए. मॅनेजर } औ. ह. कवठेकर चेअरमन



# दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

जमखंडी

[ पूर्वीची दि जमखंडी स्टेट सेंट्रल को. बँक लि. जमखंडी ]

( स्थापना सन १९४० )

मुख्य कचेरीः– जमखंडी ] :: [ शाखाः— बनहट्टी

फक्त पंधरा वर्षांतील प्रगतीचे आंकडे !

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रू. | २,००,७८५ |
| ठेवी | रू. | १४,४८,७२४ |
| गंगाजळी | रू. | २,३९,७२२ |
| खेळतें भांडवल | रू. | १९,३४,७३९ |

★ भांडवलावर नफावांटणीचें साधारण प्रमाण ५ टक्के.
★ प्रमुख विमाकंपन्यांचीं हप्तेवसुलीचीं खातीं.
★ मध्यवस्तींत स्वतःची भव्य इमारत.
★ सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्च्या सोयी.
★ अनुभवी व शिक्षित नोकरवर्ग.
★ ठेवींवर आकर्षक व्याज.
★ ऑडिट वर्ग 'अ'.

—सर्व तऱ्हेचे बँकेचे व्यवहार केले जातात—

चेअरमन. श्री. म. अथणी

मॅनेजर. म. वृ. खाडिलकर



महाराष्ट्रांतील सर्व सहकारी अर्बन बँकांत अग्रस्थानीं असलेली

# दि नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

अहमदनगर

स्थापना : सन १९१० | हेड ऑफिस : अहमदनगर शहर
शाखाः–१ संगमनेर ( जि. नगर ) २ बेलापूर रोड–श्रीरामपूर ( जिल्हा नगर ) ३ घांचोरी ( जि. नगर. )

| | | |
|---|---|---|
| (१) अधिकृत व काढलेलें भांडवल | रू. | ५,००,००० |
| (२) वसूल भांडवल | रू. | ३,७१,११० |
| (३) रिझर्व्ह फंड | रू. | २,६६,११२ |
| (४) इतर फंड | रू. | ३,३८,५३६ |
| (५) चालू ठेवी | रू. | २५,५७,९३६ |
| (६) सेव्हिंग्ज ठेवी | रू. | ९,०९,४६५ |
| (७) मुदत ठेवी | रू. | १७,६६,६७१ |
| (८) अल्प मुद्दत ठेवी | रू. | ३,७०,१०१ |
| (९) खेळतें भांडवल | रू. | ६६,८३,४२५ |

या बँकेंत मुदतीच्या, अल्प मुदतीच्या, सेव्हिंग्ज व चालू ठेवी स्वीकारल्या जात असून सर्व प्रकारचे तारणांवर कर्जें दिलीं जातात. तसेंच चेक, हुंड्या, सरकारी रोख्यांची खरेदी-विक्री, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

दागदागिने, मौल्यवान् वस्तू व कागदपत्रें सुरक्षित ठेवणेसाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था या बँकेंत आहे. तरी गरजूंनीं फायदा घ्यावा.

जास्त माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांकडे लिहा.

पां. का. मुळे मॅनेजर | त्र्यं. वि. निसळ जनरल मॅनेजर | मो. कुं. फिरोदिया चेअरमन

**आंतरराष्ट्रीय कापड व्यापार**—राष्ट्रांराष्ट्रांत, आंतरराष्ट्रीय कापडव्यापारांत खूप चढाओढ चालू असते. एकोणिसाव्या शतकांत या व्यापाराचा मक्ता मुख्यतः इंग्लंडकडे होता. या शतकाचे प्रारंभीं जपाननें डोळे दिपविणारी प्रगति करून इंग्लंडला शह दिला. इतर राष्ट्रेंहि मोठा व्यापार करीत. पुढें दुसरें महायुद्ध सुरू झाल्यामुळें, पुष्कळ राष्ट्रांतून कारखान्यांचा नाश झाला, व युद्धापासून हिंदुस्थानला या धंद्यांत स्थैर्य कांहीं वर्षें लाभलें. ४०-५० वर्षांपूर्वी इंग्लंड ७०० कोटी वार कापड परदेशीं पाठवी; तें आतां ७० कोटींचे खालीं आलें. जपाननें युद्धोत्तर परिस्थितीला तोंड देऊन, नवी मशिनरी बसवून, आपला युद्धपूर्व व्यापार पुन्हां काबीज करण्याचा चंग बांधला व त्यांत यश मिळविलें आहे. १९५० मध्यें जपाननें ११० कोटी वार कपडा निर्यात केला, तर १९५४ मध्यें १२८ कोटी वारावर. पण आपल्या परदेशी व्यापारास १९५० पासून १९५२ पर्यंत ओहटी लागली, पुढें १९५३–५४ मध्यें वाढ झाली आहे, हीं समाधानाची गोष्ट आहे. १९५०–११ कोटीवार, १९५१–७८ कोटी, १९५२–५८३ कोटी, १९५३–६२३ कोटी व १९५४–८३३ कोटी वार कपडा आम्हीं परदेशीं पाठविला.

**नवी प्रवृत्ति**—सध्यां बहुतेक राष्ट्रांची, "स्वतःचें कापड स्वतः तयार करावयाचें," अशी प्रवृत्ति व प्रयत्न आहे. त्यामुळें यापुढें परराष्ट्रीय व्यापार व राष्ट्राराष्ट्रांतील कापडाचा व्यापार कमी कमी होत जाईल असें दिसून येतें. त्याचप्रमाणें हिंदुस्तान व जपान यांचें कापड-उत्पादन या पांच वर्षांत वाढलेलें दिसतें, तर इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, इटली वगैरे राष्ट्रांतून तें हळुहळु कमी होत आहे.

**आमची प्रगति**—आपल्या देशांतील कापडगिरण्यांची वाढ व आजची स्थिति याचा विचार करूं.

मुख्यतः गिरण्यांमध्यें कापड निघतें पण हातमाग व नवीन पॉवरलूमचे लहान लहान कारखाने पुष्कळ कापड काढतात. कापड गिरण्यांची वाढ खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| सन | गिरणी संख्या | चात्या | माग–लूम | रोजी मजूर |
|---|---|---|---|---|
| १८५४ | १ | ३०,००० | — | सुरवातीस १८५४ |
| १८५८ | ४ | १,०८,००० | ३०० | सालीं ५०० मजूर |
| १८६९ | १७ | ३,९३,००० | ४,६०० | कामाला होते ते |
| १८७९ | ५६ | १४,५२,७९४ | १३,०१८ | १८९९ मधें दीड |
| १८८९ | १२४ | २७,६२,५१८ | २१,५६१ | लाखावर लागले. |
| १८९९ | १८८ | ४७,२८,३३३ | ३९,०६९ | १९१९ मधें तीन |
| १९०९ | २५९ | ६०,५३,२३१ | ७६,८९८ | लाखावर. १९३९ |
| १९१९ | २५८ | ६६,८९,६८० | १,१८,२२१ | मधें साडेचार |
| १९२९ | ३४४ | ८८,०७,०६४ | १,७४,९९२ | लाखावर व सध्यां |
| १९३९ | ३८९ | १,००,५९,००० | २,०१,००० | साडेसात लाख |
| १९४७ | ४२३ | १,०३,५४,००० | २,०३,००० | झाले आहेत. |
| १९५४ | ४६१ | १,१८,८८,१६५ | २,०७,७६३ | |

**चढ-उतार**—अमेरिकन सिव्हिल वॉर (१८६१), नंतर रूसो-जपानी युद्ध, त्यानंतर पहिलें महायुद्ध (१९१४) व त्यानंतरचें दुसरें महायुद्ध (१९३९) या जागतिक परिस्थितींत पहिल्यांदा भरमसाट नफे व त्यानंतर जागतिक मंदीचे तडाखे या धंद्यानें पाहिले. १९०६ ची स्वदेश चळवळ व १९३० चे सुमारास कॉंग्रेसनें केलेला स्वदेशीचा पुरस्कार यामुळें या धंद्यास एकतऱ्हेचें स्थैर्य आलें. सुरवातीचीं पाऊणशें वर्षें तरी मँचेस्टरनें या धंद्यांत अनेक अडचणी व अडथळे आणले, कर बसविले व तें सर्व विलायतेस स्टेटसेक्रेटरी हाच सर्वाधिकारी असल्यामुळें. त्यांना पाहिजे त्याप्रमाणें त्याचेकडून, हिंदुस्थानांतील न्याय्य मतांना धाब्यावर बसवून. तीमुळें आमचा पुष्कळ तोटा झाला, प्रगति जेवढी जलद व्हावी तेवढी झाली नाहीं. याशिवाय या शतकाचे सुरवातीला जपान हा नवा प्रतिस्पर्धी उभा राहिला. जपानचे प्रगतीनें, घडाडीनें व व्यापारी पद्धतीनें कापडधंदा करणारी राष्ट्रें हादरून गेलीं. आमचा कापूस घेऊन आमचेच घरांत आमच्या॰ सारखीं कापडे, ते स्वस्त विकूं लागले. पुढें त्यांचेबरोबर व्यापारी तह करून ती आपत्ति थोडी कमी केली गेली. त्याप्रमाणें १८९१ चा व नंतरचा प्लेग, वेगवेगळ्या प्रांतांतील दुष्काळ, अवर्षणें हीं दैवी व संपासारखी मानवी आपत्ति यांना या धंद्यास तोंड द्यावें लागलें. मंदीचे व आपत्तीचे काळीं पुष्कळ गिरणीमालकांनीं दिवाळीं काढलीं, पण नव्या लोकांनीं त्या गिरण्या घेतल्या. शिवाय नव्या नव्या गिरण्या निघतच होत्या. मजुरांचे संपाचा जसा या धंद्यावर परिणाम झाला तसाच नादान व स्वार्थी एजन्टांचाहि झाला. सध्यां जशी "मॅनेजिंग एजन्टस" या संस्थेविरुद्ध ओरड होत आहे, तशी दर मंदीचे वेळींहि ओरड होत असे.

मुख्यतः दुसऱ्या महायुद्धांत व त्यानंतर या धंद्याची घडी नीट बसविली गेली व दुसऱ्या महायुद्धानंतर इतर वेळाप्रमाणें मोठ्या प्रमाणावर मंदीची लाट न आल्यामुळें आम्हांस लाभलेली भरभराट टिकवितां आली. परराष्ट्रीय व्यापाराचा जवळजवळ मक्ताच मिळाला. पण आतां जपान, मागच्याप्रमाणें आमच्याशीं सध्यां जोराची टक्कर देत आहे.

१९४७ मध्यें विभागणी झाली व पाकिस्तान निराळें झाल्यामुळें पंजाबच्या शुभ्र व लांब धाग्याच्या कापसास आम्हांस मुकावें लागलें; शिवाय पाकिस्तान स्वतःच कापसाच्या गिरण्या काढीत असल्यामुळें एक लहानसा प्रतिस्पर्धी उभा राहत आहे. शिवाय तो बाजार आमचे हातून गेला. तथापि, १९४८ सालीं ४०६ गिरण्या आमचे देशांत होत्या त्या १९५४ सालीं ४६१ झाल्या, ही आमची प्रगति चालू राहिली.

१९२९ सालीं मुंबई व मुंबई प्रांत यांत ३४४ पैकी २११ गिरण्या होत्या. बाकीच्या १३३ गिरण्या मद्रास, बंगाल व इतर प्रांतांत. पण १९५४ सालीं याउलट स्थिति झाली. ४६१ पैकी मुंबई व मुंबईप्रांत यांत २०० गिरण्या व बाकीच्या २६१ गिरण्या हिंदुस्थानचे इतर भागांत. यापुढील वाढ इतर प्रांतांत, जेथें जेथें कापूस पिकतो व जेथें जेथें हातमाग आहेत त्या ठिकाणीं होईल व सुमारें १०,०००–१२,००० चात्या असलेल्या लहान लहान गिरण्या काढल्या जातील.

गेल्या शतकांत मुख्यतः चीनशीं सुताचा व्यापार करण्यासाठी सुताच्या गिरण्या निघाल्या. चात्यांचे मानानें माग कमी. पुढें चीनमध्यें गिरण्या निघाल्या व जपाननें तो बाजार बळकावल्यामुळें व विशेषतः लो. टिळकांच्या स्वदेशी चळवळीमुळें सुताचे माग बसवूं लागले. त्याच सुमारास धुवट व रंगीत कापड काढण्याचें आम्हीं सुरू केलें. त्या अगोदर मुख्यतः कोरें कापड व मांजरपाट निघत असे. सध्यां तर आम्हीं सर्व जातींचें, सर्व तऱ्हेचें सुंदर कापड काढूं लागलों आहोंत.

**मागांचें चात्यांशीं प्रमाण**—१८६९ सालीं एका मागामागें ८३ चात्या होत्या, १८७९ ते १८९९ पर्यंत १११ ते १२८ होत्या; म्हणजे सूत काढून सूत विकलें जाई. १९०९ सालीं

८०, १९१९ सालीं ५७ व नंतर १९४७ पर्यंत ५०. म्हणजे साधारणपणें ३० चात्यांचें सूत मागावर कापड काढण्यास व २० चात्यांचें सूत हातमाग व परदेशी पाठविण्यास. सध्यां उभ्या असलेल्या एका मागामागें पुन्हां ५७ चात्या दिसतात. कारण, या दोनतीन वर्षे गिरण्यांत माग वाढवून दिले गेले नाहींत. नव्या गिरण्या सूत कातण्यासाठींच काढल्या.

१९५० पूर्वी या धंद्याची चौकशी वेळोवेळीं झाली. टॅरिफबोर्डे नेमलीं होतीं, मजुरासाठी कमिशनें नेमलीं व इतर चौकशा झाल्या. त्याचप्रमाणें युरोपप्रमाणें फॅक्टरी ॲक्ट वेळोवेळीं सुधारून सध्यांचा १९४८ चा फॅक्टरी ॲक्ट व त्याबरोबर मजुरांच्या हिताचें रक्षण करणारे इतर ॲक्ट सध्यां अमलांत आले आहेत. कंपनी कायदाहि व्यापक स्वरूपांत लवकरच अंमलांत येईल. १९५० मध्यें सरकारनें " कापड गिरणी " या धंद्याची सर्वांगीण चौकशी करण्यासाठीं, " वर्किंग पार्टी " नांवाची एक कमिटी नेमली. तिनें महत्त्वाच्या सूचना मांडल्या व फार उपयुक्त माहिती उजेडांत आणली. तिचा रिपोर्ट बाहेर पडण्यापूर्वी इकडे "हातमाग" या धंद्याला फार अवकळा आली. त्यांचा माल पडून राहिला व विणकर बेकार झाले. तेव्हां सरकारनें टेक्स्टाईल कमिटी नेमून गिरण्या, हातमाग व नवीन सुरू झालेले पॉवरलूमचे लहान लहान कारखाने यांचा एकमेकांशीं संबंध सलोख्याचा रहावा, ते एकमेकांना मारक होऊं नयेत तर पूरक व्हावेत वगैरे प्रश्नांचा विचार करण्यास त्या कमिटीला सांगितलें. या दोन्ही कमिटींच्या सूचना सरकारपुढें असून, विचार करून सरकार एकेक पाऊल टाकीत आहे.

**प्रगतीसाठीं चालू प्रयत्न** — कापूस-कापसासंबंधींचे प्रश्न इंडियन सेंट्रल कॉटन कमिटी पहाते. सध्यां जास्त कापूस पिकवून, त्याबरोबर त्याची प्रत सुधारावयाची व लांब धाग्याच्या कापसाचें क्षेत्र वाढवावयाचें व चांगल्या व हलक्या कापसाची भेसळ होऊं द्यावयाची नाहीं व एकरी उत्पादन सुधारावयाचें, असे प्रयत्न चालू आहेत. गिरण्यांची प्रतवारी व सुधारणा घडवून येत आहे. मजुरांचे प्रश्न, काम, वेतन, वगैरेंचा शास्त्रीय रीतीनें अभ्यास करून सोडविण्याकडे कल आहे. तथापि, इकडे अजून व्हावी तशी प्रगति झाली नाहीं व होत नाहीं. पण हें दिरंगाईवर टाकून यापुढें चालणार नाहीं. मालक व मजूर यांनींच हे प्रश्न सोडविले पाहिजेत.

१९१०. पूर्वीची मशिनरी टाकाऊ झाली आहे, चांगल्या पायावर व भक्कम आर्थिक पाठिंबा असणाऱ्या गिरण्या याबाबत प्रगति करीत आहेत. तथापि, इतर गिरण्यांची चौकशी, एकेक गिरणीची निरनिराळी, होऊन त्यांची पुनर्रचना होणें जरूर आहे.

परदेशी निर्यात व्यापाराबाबत सरकारनें गेल्या सालीं " कॉटन टेक्टाइल एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिल " नेमलें आहे. तें भरभक्कम पायावर परदेशी व्यापाराचे बाबतींत खटपट करीत आहे. बाहेरच्या बाजारांची माहिती गोळा करून ती आमचे गिरण्यांना व व्यापाऱ्यांना पुरविणें, माल तपासून 'खात्री' चा शिक्का करणें, उभे राहिलेले तंटे मिटविणें, परदेशांत प्रदर्शनें भरविणें व " शो रूमस् " स्थापणें, वगैरे कामास जोरांत सुरवात झाली आहे.


हातमागांचा अभ्यास करून, सोसायट्या वाढवून, मध्यस्थांना, जे व्यापारांतील मलई खात असत, त्यांना वगळून, हातमागांची सुधारणा घडवून आणून, त्यावरील मालाची योग्य भावांत विक्री करण्यास केंद्रें स्थापून, त्यांना सोसायट्या व केंद्रें काढण्यास भांडवल पुरवून व जरूर तेथें रिबेट देऊन, अशा अनेक तऱ्हेनें, " हातमाग " धंदा उर्जितावस्थेस आणण्याचा जोराचा प्रयत्न सुरू आहे.

प्रि. कर्वे यांचे अध्यक्षतेखालीं 'स्मॉल स्केल इंडस्ट्रीज' बाबत कमिटी नेमलेली आहे. हातमागाचा धंदा त्याचे कक्षेंत येतो. ह्या कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. "हातमाग" या संस्थेची, तिच्या मालाची, खरेदी-विक्री-मूळ भांडवल वगैरे प्रश्नांची सर्वांगीण चौकशी होत आहे, त्यास योग्य वळण मिळून, भावनांना थोडें वळण लावून हे प्रश्न जागतिक स्पर्धा वगैरे लक्षांत घेऊन सोडविले पाहिजेत. निव्वळ जुनें म्हणून जवळ बाळगण्यांत अर्थ नाहीं. योग्य त्या सुधारणा विचारपूर्वक केल्या पाहिजेत. वाढत्या लोकसंख्येस १९६० सालीं (ही ४० कोटी व्हावी असा अंदाज आहे.) वाढत्या प्रमाणावर कापडपुरवठा झाल्यासच कापडाचे भाव आटोक्यांत राहतील. पुनर्रचनेंत माणशीं उत्पादन वाढेल व मग वाढता खर्च करणें परवडेल. सध्यां माणशीं खप १५-१६ वार धरला जातो तो १८-२० पर्यंत यापुढें जावा, परदेशी व्यापारहि संघटित प्रयत्नांनीं वाढावा, वगैरे प्रयत्न सुरू आहेत. तेव्हां उत्पादन वाढविलें पाहिजे.

आज ४६१ कापडगिरण्या आहेत. सुमारें १२ लाखांवर चालू हातमाग आहेत, शिवाय पॉवरलूमस. या सर्वांवर ५०२ कोटी वार गिरणीचें कापड व १४० कोटी वर हातमाग व पावरलूमसचें कापड निघतें, तें ७२० कोटींवर वाढविलें जावें असा प्रयत्न होईल.

यावरून भविष्यकाळाबद्दल फार आशा वाटूं लागते. सरकारप्रमाणें मालक—चालक व मजूर यांनीं नवा दृष्टिकोन धरावा लागेल; तशी प्रवृत्ति दिसत आहे व म्हणून या दिवाळीच्या शुभप्रसंगीं या प्रयत्नांना आपण सुयश चिंतून, आपला धंदा स्थायी उत्कर्षाप्रत जावो अशी प्रार्थना करूं या.

—ग. कृ. चितळे

भारत सरकारमान्य ड्रेसेस
स्पेशॅलिस्ट
मे. पाटसकर
कंपनी
डेक्कन जिमखाना, पुणें ४.
प्रोप्रायटर :
मो. ना. पाटसकर
अमेरिका, इंग्लंड, जर्मनी रिटर्न्ड.

★ बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

# नव्या सहकारी कायद्याची मागणी

## ठिगळांची गोधडी केव्हां बदलणार ?

कोणताहि समाज अगर संघ हा गतिमान असतो व त्यामुळें त्याच्या धारणेसाठी व स्वास्थ्यासाठी करण्यांत आलेले कायदे हेहि समाजाच्या अगर संघाच्या बदलत्या परिस्थितीनुरूप वेळोवेळीं दुरुस्त करावे लागतात व कांहीं वेळीं तर त्यांत आमूलाग्र फेरफार करावे लागतात. या कायद्यांत जरूरीप्रमाणें दुरुस्त्या अगर फेरफार केले गेले नाहींत, तर ते कायदे समाजास अगर संघास उपकारक न ठरतां कांहीं वेळां ते त्रासदायकच वाटतात व त्यामुळें समाजाची अगर संघाची कुचंबणाच होते, असें अनुभवास येतें. हे विचार मनांत येण्याचें कारण असें आहे कीं, मुंबई राज्यांतील सहकारी सोसायटयांचा सन १९२५ सालीं तयार करण्यांत आलेला कायदा, त्यांत विशेषशा दुरुस्त्या न करतांहि, अद्याप तसाच चालू आहे व त्यामुळें सहकारी संस्थांना तो सोयीचा न वाटतां त्रासदायकच होत आहे, असें "अर्थ" या साप्ताहिकांत गेले सालीं जे बरेच लेख व तक्रारी सहकारी संस्थांच्या कार्यकर्त्यांकडून प्रसिद्ध झाल्या, त्यावरून दिसून येतें.

### पूर्वीच्या कायद्यांचा इतिहास

मुंबई राज्यांतील सहकारी सोसायटयांच्या कायद्याचा इतिहास आपल्या वाचकांपैकीं बऱ्याच मंडळींना अवगत असेल. तथापि त्याची संक्षिप्तपणें येथें माहिती दिल्यास ती जास्त सोयीची होईल असें वाटल्यावरून ती थोडक्यांत पुढें देत आहों.

हिंदुस्थानांत सहकारी चळवळीचा प्रारंभ सन १९०४ सालीं झाला व त्यावेळीं सहकारी संस्थांचा पहिला कायदा मंजूर करण्यांत आला. त्याचें नांव "सहकारी पतपेढ्यांचा कायदा" असें असून तो हिंदुस्थान सरकारनें सन १९०४ सालीं मंजूर केला होता. त्यावेळीं हे कायदे करण्याचा अधिकार हिंदुस्थान सरकारचा होता. पुढें हा कायदा बदललेल्या परिस्थितीस गैरसोयीचा वाटूं लागल्यामुळें त्यांत आमूलाग्र फेरफार करून सन १९१२ सालीं हिंदुस्थान सरकारनें दुसरा कायदा मंजूर केला. त्या कायद्याचें नांव "सहकारी सोसायटयांचा कायदा" असें आहे. सहकारी संस्थांची दिवसेंदिवस वाढ होत होती व त्यांच्या कामांतहि विविधता निर्माण झाली होती. सन १९१९ सालीं प्रांतिक सरकारांना कांहीं विशिष्ट विषयांबाबतचे आपल्यापुरते कायदे करण्याचा अधिकार प्राप्त झाला होता. सन १९१२ सालीं हिंदुस्थान सरकारनें मंजूर केलेला सहकारी सोसायट्यांचा कायदा सन १९१९-२० चे सुमारास गैरसोयीचा वाटूं लागला व म्हणून त्यावेळच्या मुंबई इलाख्यांतील सहकारी सोसायट्यांना उपकारक ठरेल असा नवीन कायदा मुंबई सरकारनें मंजूर करावा अशी मागणी वेळोवेळीं व वेगवेगळ्या परिषदांतून व सभांतून मुंबई सरकारास करण्यांत येत होती. त्या मागण्यांचा मुंबई सरकारनें विचार करून सहकारी सोसायटयांच्या कायद्याचा मसुदा प्रसिद्ध केला. प्रांतिक सरकारांना सहकाराबाबतचा कायदा करण्याचा जो अधिकार मिळाला होता, त्याचा उपयोग करण्याचा पहिला मान मुंबई सरकारानें मिळविला. इतर प्रांतिक सरकारांनीं आपापल्या इलाख्यासाठी आपापले सहकारी सोसायटयांचे कायदे त्यानंतर मंजूर केले. मुंबई सरकारनें सहकारी सोसायटयांच्या कायद्याचा जो मसुदा प्रसिद्ध केला होता त्याचा पुण्यांत भरलेल्या एका मोठ्या सभेंत फार तपशीलवार असा विचार झाला. त्यावेळीं मुंबई कौन्सिलांतील विरोधी पक्षाचे नेते श्री. ल. ब. भोपटकर हे होते आणि सहकारी सोसायटयांचे रजिस्ट्रार श्रीयुत (नंतर सर) जनार्दन आत्माराम मदन हे होते. वर उल्लेख केलेल्या सभेंत या मसुद्याबाबत जी चर्चा झाली, त्या चर्चेस अनुसरून श्री. भोपटकर यांनीं सदर कायद्यास अनेक उपसूचना कौन्सिलपुढें मांडल्या व त्यांपैकीं पुष्कळच उपसूचना सरकारतर्फे मान्य करण्यांत आल्या. कांहींवर साधकबाधक चर्चा होऊन त्याहि थोड्याफार दुरुस्त्यांसह मंजूर झाल्या व फारच थोड्या उपसूचना सरकार पक्षानें नामंजूर केल्या. या कामीं श्री. भोपटकर यांना श्री. मदन यांचें पुष्कळच सक्रिय सहकार्य मिळालें होतें, हें त्यावेळेच्या सहकारी कार्यकर्त्यांना माहित असेलच. असो. अशा खेळीमेळीच्या वातावरणांत मंजूर झालेला हा "मुंबई सहकारी सोसायटयांचा कायदा" (सन १९२५ चा ७ वा) पुष्कळच प्रगमनशील असा होता हें कोणीहि कबूल करील. त्या कायद्याखालीं वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांना आपली पुष्कळ प्रगति करण्यास अवसर मिळालेला होता.

### १९२५ नंतरचीं स्थित्यंतरें

सन १९२५ सालानंतर आपल्या देशांत पुष्कळच स्थित्यंतरें झालीं. स्वराज्याचे हक्क हळूहळू मिळूं लागले. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेक आंदोलनें झालीं. दुसरें जागतिक महायुद्ध झालें. अहिंसामय क्रांति झाली. शेवटीं स्वातंत्र्य प्राप्त झालें. दरम्यान फार मोठी आर्थिक घडामोड झाली. जागतिक मंदीची झळ हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांस फारच मोठ्या प्रमाणांत जाणविली; परंतु महायुद्धामुळें त्यांना थोडेंफार स्थैर्य प्राप्त झालें व पुढें शेतीचे मालास फारच किंमत मिळूं लागल्यावर साहजिकच हिंदी शेतकऱ्यांची सांपत्तिक परिस्थिति पुष्कळच सुधारली. सन १९२५ सालानंतर शेतकरी ऋण विमोचन कायदा, सावकारी कायदा, कूळकायदा, बाजारनियंत्रण कायदा, कोठार कायदा, वगैरे अनेक कायदे शेतकऱ्यांची सांपत्तिक परिस्थिति सुधारावी या हेतूनें करण्यांत आले.

सन १९२५ सालीं सहकारी संस्थांकडून जीं कामें व्हावीत अशी अपेक्षा होती त्यापेक्षा कितीतरी भिन्न भिन्न प्रकारचीं कामें त्यानंतर त्यांना विशिष्ट परिस्थितींत करावीं लागलीं, हें आपल्या वाचकांपैकीं अनेकांना माहीत असेलच. विशेषतः नियंत्रणाचे काळांत वेगवेगळ्या सहकारी संस्थांना त्यांच्या मूळ उद्देशांत नमूद नसलेलीं अनेक कामें विशिष्ट परिस्थितींत अंगीकारणें क्रमप्राप्त झालें.

### चळवळींत पडलेला फरक

सन १९४४-४५ चे सुमारास हिंदुस्थान सरकारनें वेगवेगळ्या विषयांची पहाणी करण्यासाठी व त्या विषयांबाबत आपल्या शिफारसी सादर करण्यासाठी बऱ्याच समित्या नेमल्या होत्या. त्या समित्यांनीं सरकारकडे आपापले अहवाल सादर केल्यानंतर त्या अहवालानुसार सरकारनें जें धोरण आखलें त्याचे बरेच परिणाम सहकारी संस्थांवर झाले. उदाहरणार्थ, गाडगीळ कमिटीच्या

व सरय्या कमिटीच्या शिफारशींमुळें पुष्कळ सहकारी बँकांना व संस्थांना आपल्या उद्देशांत, घटनेंत व कामकाजांत बरेच फेरफार करावे लागले. रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या गोरवाला कमिटीच्या शिफारशीनुसार आतां तर बऱ्याच सहकारी संस्थांच्या घटनेंत व त्यांच्यावर असलेल्या जबाबदारींत आणि त्यांच्या कामकाजांत पुष्कळच फेरफार होतील असें दिसतें. या सर्व बदललेल्या परिस्थितीवरून असें स्पष्टपणें दिसून येईल कीं, सन १९२५ सालीं मुंबई राज्यांत असलेली सहकारी चळवळ व हल्लींची सहकारी चळवळ यांत जमीन–अस्मानाचें अंतर पडलें आहे; सन १९२५ सालीं जो सहकारी सोसायट्यांचा कायदा त्यावेळेच्या परिस्थितीस सोयीचा म्हणून मंजूर केला होता तोच कायदा ( त्यांत थोडे फेरफार केले आहेत ) सन १९५५ सालींहि राहूं देणें श्रेयस्कर ठरणार नाहीं, असें आमचें प्रामाणिक मत आहे.

### नव्या कायद्याची तातडीनें आवश्यकता

सन १९२५ सालानंतर मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांत पंधरा–सोळा वेळां दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत व त्यांपैकीं सन १९३६ व सन १९४८ मध्यें करण्यांत आलेल्या दुरुस्त्या विशेष महत्त्वाच्या होत्या याची जाणीव आम्हांस आहे. तथापि, सन १९४८ सालीं स्थापण्यांत आलेल्या को–ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलनें ( न्यायदान मंडळानें ) आजवर जे अनेक महत्त्वाचे निकाल वेगवेगळ्या दाव्यांच्या आपिलाचे कामीं दिले आहेत ते पाहिले म्हणजे आपला हल्लींचा सहकारी सोसायट्यांचा कायदा हा पुष्कळ बाबतींत अपुरा आहे असें म्हणणें भाग आहे. या सर्व बाबींचा विचार करतां असें कोणासहि वाटेल कीं हल्लींच्या आपल्या सहकारी सोसायट्यांच्या कायद्याची गोधडी आतां पूर्णपणें दुरुस्त केली पाहिजे व या कायद्यांत आमूलाग्र फेरफार करून एक नवीनच कायदा हल्लींच्या परिस्थितीस लागूं होईल व सोयीचा ठरेल आणि भविष्य कालांत वेगवेगळ्या सोसायट्यांना आपली वाढ व प्रगति करण्याचे दृष्टीनें पुरेसा अवसर देईल व प्रगमनशील असेल असा मुंबई सरकारनें तावडतोब मंजूर करावा. हल्लीं हें काम एका निमसरकारी समितीकडे सोपविलें आहे, असें आमच्या ऐकिवांत आहे. या समितींतील सभासद अनुभवी व कार्यक्षम असे सद्गृहस्थ आहेत असेंहि आम्ही ऐकतों. परंतु या समितीचें काम चालूं आहे अगर थंडावलें आहे, तें मात्र कांहींच समजत नाहीं. जें एखादें काम लवकर पुरें होऊं नये असें वाटत असेल, तें एखाद्या समितीकडे सोंपवावें म्हणजे तें आपोआपच दिरंगाईवर पडतें व कालांतरानें ती समितीच विसर्जन पावते असें म्हणतात. ही समजूत खोटी ठरविण्यासाठी व सहकारी सोसायट्यांचा कायदा फार तातडीनें दुरुस्त झाला पाहिजे असें मुंबई सरकारासच वाटत असेल तर हें काम समितीवर न सोंपवितां तें सरकारनें स्वतःच हातीं घेऊन पुरें केलें पाहिजे. हिंदुस्थान सरकारास " कंपनी ॲक्ट " संपूर्णपणें दुरुस्त करून घ्यावयाचा होता तेव्हां हें काम त्या सरकारनें स्वतःवरच घेऊन तें पुरें केलें हें आपणां सर्वांस माहीत आहे. कंपनी कायद्याचे मानानें सहकारी कायदा हा फारच लहान असल्यानें तो दुरुस्त करण्याचें राज्य सरकारनें ठरविल्यास तें फार तावडतोबीनें होण्यासारखें आहे असें आम्हांस वाटतें. त्यांत एकच मुख्य अडचण आहे आणि ती म्हणजे निद्रिस्त सरकारास जागें कोणी करावयाचें, ही होय. मुंबई सरकार इतक्या उशिरा कां होईना, एकदाचे जागे होवो व सहकारी सोसायट्यांचा कायदा पूर्णपणें दुरुस्त करण्याची सद्बुद्धि त्यास होवो, अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे.

—" वृत्तशर्मा "


# दि गोदावरी शुगर मिल्स लि०

हेड ऑफिस : फाझलभाई बिल्डिंग, महात्मा गांधी रोड, मुंबई १

नगर जिल्ह्यांत, गोदावरी नदीच्या कांठीं उभारलेल्या आमच्या

**लक्ष्मीवाडी** आणि **साकरवाडी**

( रे. स्टेशन : कोपरगांव ) ( रे. स्टेशन : कान्हेगांव )

ह्या कारखान्यांत, अद्यावत् यंत्रसामुग्रीच्या साहाय्यानें

**शुभ्र, पवित्र व दाणेदार साखर**

आमच्या मालकीच्याच मळ्यांतील उसापासून तयार केली जाते.

**व्यवहाराकरितां वरील पत्त्यावर चौकशी करावी**

ही दिवाळी व नवें वर्ष आमच्या हितचिंतकांस सुखाचें जावो.

# एस्टेट ड्यूटी आणि आयुर्विमा

## विमा व्यवसायास उत्कृष्ट संधी

बहुतेक सुधारलेल्या देशांत एखाद्या माणसाच्या निधनानंतर त्याची मालमत्ता दुसऱ्या व्यक्तीस मिळण्यापूर्वी तीवर कर बसविण्यांत येतो. ह्या कराला एस्टेट ड्यूटी, वारसा कर, अगर मृत्यू-कर अशीं नांवें देण्यांत येतात. समाजवादाला अनुकूल असें मत जसजसें प्रभावी होत आहे, तसतशी अशा प्रकारच्या करांना अधिकाधिक लोकप्रियता लाभणें साहजिक आहे. संपत्ति अधिक न्याय्य प्रमाणांत वाटली जावी हा हेतु अशा करांच्या मुळाशीं असतो, आणि करापासून होणारें उत्पन्न सामान्य लोकांचें जीवित अधिक सुखाचें करण्याकडे सामान्यतः खर्च करण्यांत येतें. तथापि, एस्टेट ड्यूटी बसवितांना भारतीय सरकारच्या अर्थमंत्र्यांनीं कोणत्याहि प्रकारचें निश्चित आश्वासन दिलेलें नाहीं. संपत्तीच्या प्रचलित वाटणींतील विषमता कमी करण्यासाठी ह्या कराचा उपयोग होईल आणि राज्य सरकारांच्या विकास योजनांना आर्थिक मदत देण्यास पैसा मिळेल, अशीं दोन कारणें त्यांनीं एस्टेट ड्यूटी बिल सिलेक्ट कमिटीकडे पाठवितांना नमूद केलेलीं आहेत.

### कराची पार्श्वभूमि

पाश्चिमात्य देशांत कोणत्या तरी रूपानें एस्टेट ड्यूटी घेण्याची पद्धत १८ व्या शतकापासून चालू आहे. भारतांत अशा प्रकारचा थोडाबहुत कर आडवळणानें घेण्यांत येत असे. मृत्यूनंतर मयताच्या वारसांना घ्यावें लागणारें प्रोबेट, सक्सेशन सर्टिफिकेट, वगैरेसाठी स्टँप भरावा लागे. स्टँपसाठी घेण्यांत येणारा पैसा एका अर्थानें करच होता. एस्टेट ड्यूटी बसविण्याचा विचार भारत सरकारच्या मनांत जवळ जवळ १० वर्षें घोळत होता. पहिलें एस्टेट ड्यूटी बिल १९४६ सालीं भारतीय कायदेमंडळांत प्रविष्ट करण्यांत आलें. पण राज्यघटनेंत बदल झाल्यामुळें त्याचा पाठपुरावा करण्यांत आला नाहीं. १९४८ सालीं प्रविष्ट करण्यांत आलेलें बिल सिलेक्ट कमिटी-पर्यंतच्या अवस्थेपर्यंतच पोंचलें. १९५२ च्या ऑगस्टमध्यें लोकसभेंत आणखी एक नवें एस्टेट ड्यूटी बिल प्रविष्ट करण्यांत आलें. त्या बिलाला आतां दोन्ही सभागृहांनीं मान्यता दिलेली आहे.

### देणग्यांचा विचार

ह्या कायद्यांतील निरनिराळ्या कलमांचा आयुर्विम्याच्या धंद्यावर काय परिणाम झाला आहे तें आपणांस पहावयाचें आहे. नं. ८, ९ व १० ह्या कलमांत देणग्यांचा विचार करण्यांत आलेला आहे. ज्या देणग्या मृत्यूपूर्वी दोन वर्षें देण्यांत आलेल्या आहेत, त्यांच्यावर एस्टेट ड्यूटी बसविण्यांत येणार नाहीं अशी तरतूद करण्यांत आली आहे. तेव्हां, एखाद्या माणसानें आपल्या विमा पॉलिसीप्रमाणें मिळणारे पैसे मरणापूर्वी दोन वर्षें दान केले तर त्या रकमेवर कर घेण्यांत येणार नाहीं असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. पण असें नाहीं. कारण, १० व्या व १४ व्या कलमांत विमा पॉलिसीच्या दानपत्रांवर अधिक निर्बंध घालण्यांत आले आहेत. १० व्या कलमांत असें म्हटलें आहे कीं, दान घेणाऱ्यानें दान ताबडतोब आपल्या ताब्यांत घेतलें आणि त्याचा उपभोग घेण्यास सुरुवात केली, तरच विमा पॉलिसीच्या रकमेवर एस्टेट ड्यूटी घेण्यांत येणार नाहीं. ह्याचा अर्थ असा होतो कीं, विमा पॉलिसी ही दान घेणाराच्या नांवानें कायमची व सर्वांशानें बेचन केली गेलेली असली पाहिजे आणि ती त्याच्या ताब्यांतहि दिली गेली पाहिजे. म्हणजे, विमा कायद्यांतील नॉमिनी नेमण्याची व बेचन करण्याची व्यवस्था ह्या दानपत्राच्या बाबतींत निरुपयोगी ठरणार आहे. एस्टेट ड्यूटी कायद्याच्या १४ व्या कलमांत दानावर आणखी निर्बंध घालण्यांत आले आहेत. समजा, एखाद्या इसमानें पॉलिसीचें दानपत्र रीतसर दोन वर्षांपूर्वी केलें आणि नंतर पॉलिसीवरील हप्त्यांची कांहीं रक्कम स्वतःच भरली. अशा परिस्थितींत त्यानें ज्या प्रमाणांत रक्कम भरली असेल त्या प्रमाणांत विमा पॉलिसीची रक्कम निधनानंतर दान घेणाराला मिळाली, असें धरलें जाईल आणि त्या रकमेवर एस्टेट ड्यूटी घेण्यांत येईल. एका उदाहरणानें गुंतागुंतीचें वाटणारें हें कलम स्पष्ट करतां येईल. अ नें ब ला ५,००० रुपये रकमेची पॉलिसी दान म्हणून दिली. ह्या पॉलिसीवरील वार्षिक हप्ता रु. २५० आहे आणि त्यानें (अ नें) ५ वर्षांचे हप्ते भरलेले आहेत. त्यानंतरच्या तीन वर्षांत अ नें दर वर्षी वार्षिक हप्त्यापैकी २०० रुपये दिले आणि ब नें (दान घेणारानें) ५० रुपये दिले. दान दिल्यानंतर तिसऱ्या वर्षाच्या अखेर अ निधन पावला. आतां एस्टेट ड्यूटी कराची आकारणी करतांना दान दिल्यानंतर दान देणारा व दान घेणारा हे ज्या प्रमाणांत हप्ते भरीत होते तें प्रमाण लक्षांत घेतलें जाईल. अ नें वार्षिक हप्त्याच्या ⅘ रक्कम भरलेली असल्यामुळें मूळ पॉलिसीच्या ५,००० रुपये रकमेपैकी ४,००० हजार रुपये अ च्या निधनानंतर बला मिळाले असें धरण्यांत येईल आणि त्यावर कर आकारण्यांत येईल. ह्यावरून असें दिसून येईल, कीं विमा करारांचीं दानपत्रें करांतून वगळण्याची तरतूद विशेष उपयोगाची ठरणार नाहीं. कारण, अशा दानपत्रांतर्गत विमा पॉलिसीचें बेचनपत्र दान घेणारांच्या नांवानें अगदीं कायमचें झालें असलेलें पाहिजे आणि त्यानंतरचे सर्व हप्ते त्यानेंच भरले पाहिजेत. व्यवहारांत ह्या अटी पाळणें फारच कठीण जाईल. कारण, विमापत्रकें अज्ञान मुलें अगर पत्नी ह्यांच्या फायद्यासाठी घेतलीं जातात. अशा अज्ञान मुलांना अगर पत्नीला पॉलिसी बेचन केल्यानंतर हप्ते भरण्यासाठी पैसे उभे करणें जवळ जवळ अशक्यच असतें.

### करांतून वगळण्यांत आलेले कांहीं विमा करार

तथापि, ह्यावरून असा निष्कर्ष काढण्याचें कारण नाहीं कीं एस्टेट ड्यूटी कायद्यानें आयुर्विम्यावर विपरीत परिणाम होणार आहे. कलमें ३२ व ३३ ह्यांत कांहीं विमा करार करापासून मुक्त करण्याची तरतूद केलेली आहे. ३२ व्या कलमांतील तरतूद अशी आहे:—(१) मयतानें आपल्या जीवितावर एक अगर अधिक विमे उतरले असतील आणि त्या सर्वांची रक्कम ५,००० रु. पेक्षा जास्त नसेल तर अशी रक्कम करास प्राप्त होणार नाहीं. (२) अवलंबून असणाऱ्या स्त्री-नातेवाइकाच्या लग्नासाठी म्हणून जर एखादी पॉलिसी घेण्यांत आली असेल आणि पॉलिसीची रक्कम जर ५,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर ही रक्कम करासाठी पात्र धरण्यांत येणार नाहीं. प्रत्येक स्त्री-नातेवाइकासाठी अशा प्रकारची जास्तींत जास्त ५,००० रुपये रकमेची पॉलिसी घेतां

येईल. ( ३ ) मयतानें एस्टेट ड्यूटी देण्यासाठींच जर एक अगर अधिक खास पॉलिसी घेतल्या असतील, अथवा ड्यूटी देण्यासाठीं जर पॉलिसी बेचन केलेली असेल तर त्याच्या वारसाला इतर मालमत्तेवर जितकी ड्यूटी द्यावी लागेल तितक्या रकमेपर्यंत अशा पॉलिसीवरील रकमा करास योग्य समजल्या जाणार नाहींत. मात्र, करमाफ रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा अधिक असतां कामा नये. एस्टेट ड्यूटीचा दर ठरवितांना, वगळण्यांत आलेल्या वरील तिन्ही बाबी वारसाच्या मालमत्तेंत धरण्यांत याव्या व सरासरी दर अजमावण्यांत येऊन त्या दरानें निधनानंतर प्राप्त होणाऱ्या मालमत्तेवरील कर आकारण्यांत यावा, असें ३२ व्या कलमांत नमूद करण्यांत आलें आहे.

### स्वतंत्र इस्टेटी व कमी कर आकार

एखाद्या मालमत्तेवर मयताचा कांहींहि हक्कसंबंध नसेल तर निधनानंतर प्राप्त होणाऱ्या मालमत्तेंत, अशी मालमत्ता एस्टेट ड्यूटीसाठीं एकत्र करण्यांत येणार नाहीं. अशी स्वतंत्र मालमत्ता वेगळी समजण्यांत येईल आणि तीवर आकारण्यांत येणारा कर त्या मालमत्तेला लागू असणाऱ्या दरानें ठरविण्यांत येईल. एखादी विमा–पॉलिसी प्रथमपासूनच अशा रीतीनें स्वतंत्र मालमत्ता ठेवण्याच्या इराद्यानें घेण्यांत आलेली असेल आणि तीमुळें मिळणारी रक्कम एखाद्या माणसाला देण्याची कायदेशीर व्यवस्था केलेली असेल, तर अशा पॉलिसीच्या रकमेवर बसणारा कर बऱ्याच कमी दरानें बसेल हें ह्यावरून उघड होतें. ही तरतूद ३३ व्या कलमांत करण्यांत आलेली आहे. ह्या कलमाचा फायदा मिळविण्यासाठीं मॅरीड वुइमेन्स प्रॉपर्टी ॲक्टप्रमाणें पॉलिसी घ्याव्या लागतील. समजा, एखाद्या माणसानें वरील ॲक्टप्रमाणें २ लाख रुपयांची पॉलिसी आपल्या बायकोसाठीं घेतली. बेनिफिशरी बदलण्याचा अगर पॉलिसीची मुदत भरल्यावर रक्कम स्वतःस मिळण्याचा हक्क त्यानें सोडून दिलेला आहे. कांहीं वर्षांनीं हा इसम ३ लाखांची इतर मालमत्ता व वरील २ लाखांची पॉलिसी मागें ठेवून वारला. त्याच्या एकूण मालमत्तेची किंमत ५ लाख रुपये होईल. ३३ व्या कलमाप्रमाणें त्याच्या मालमत्तेचे ३ लाख व २ लाख असे दोन स्वतंत्र भाग करण्यांत येतील आणि त्यावर योग्य त्या दरानें कराची आकारणी करण्यांत येईल. सर्व मालमत्ता जर एकत्र करण्यांत आली असती तर जितका कर भरावा लागला असता त्यापेक्षा मालमत्तेची दोन भागांत विभागणी केल्यानें कमी कर भरावा लागेल हें उघडच आहे.

### विमा एजंटांना सुवर्ण संधी

प्रस्तुत कर रोख भरावा लागत असल्यामुळें कराची रक्कम उभी करण्यासाठीं एखादी मोठी मालमत्ता विकावी लागण्याचा प्रसंग उद्भवतो, हा कराच्या कायद्यांतील एक प्रमुख दोष आहे. कांहीं धंदेवाल्यांनीं आपल्या चालू धंद्यांत पुष्कळ मोठी रक्कम गुंतविलेली असते; पण त्यांच्या जवळ रोख रक्कम फारशी नसते. अशा धंदेवाल्याला आपल्या मरणानंतर धंद्याची वाताहत होईल अशी भीति वाटणें साहजिक आहे. एखाद्या मोठ्या चालू धंद्याचें विसर्जन करण्याची पाळी आली, अगर एस्टेट ड्यूटी देण्यासाठीं त्याची विक्री करावी लागली, तर बाजारावर त्याचा विपरीत परिणाम होतो. अशा अडचणींत सापडलेल्या इसमाला धंद्याची योग्य किंमत न मिळतां फारच कमी किंमत घेऊन स्वस्थ बसावें लागतें. पुष्कळदां असेंहि होण्याचा संभव असतो कीं, अशा धंदेवाल्याच्या वारसाला मालमत्तेवर जो कर द्यावा लागेल तो धंद्याच्या मूळच्या बाजवी किंमतीवर आकारला जाईल. पण धंदा विकून टाकतांना त्याला फारच कमी किंमत मिळेल. म्हणजे, त्याला कमी मालमत्ता मिळून कर मात्र जास्त दरानें द्यावा लागेल. एस्टेट ड्यूटी देण्यासाठीं विमा उतरण्यांत आला तर नेहमीं थोडथोडी बचत करून हप्ते देतां येतील आणि निधनानंतर कर भरण्यासाठीं रोख रक्कम मिळूं शकेल. इतकेंच नव्हे, तर विमा पॉलिसी उतरून, द्याव्या लागणाऱ्या करांत बरीच मोठी बचतहि करतां येईल. एस्टेट ड्यूटी ॲक्टमुळें विम्याचें काम मिळविणाऱ्या चलाख एजंटांना सोन्याची संधि मिळाली आहे. ह्या संधीचा फायदा घेतांना त्यांना सामाजिक कार्य केल्याचेंहि समाधान लाभेल.




# कूळकायदा दुरुस्त्यांचें समालोचन

## समाजवाद नाहीं व लोककल्याणहि नाहींच !

मुंबई सरकार कूळकायद्यामध्यें १९५५ सालच्या दुरुस्ती बिलावरून ज्या सुधारणा व तरतुदी करूं इच्छित आहे त्यांचें स्वरूप पाहतां, स्वतः जमीन जातीनें न कसणाऱ्या लोकांच्या जमिनींतील हितसंबंधाबाबत अत्यंत महत्त्वाच्या अशा कांहीं मुद्यांची सरकारला विसरण पडली असावी असें उघड दिसून येतें.

### सुरक्षित गुंतवणूक

वास्तविक, कसेल त्याची जमीन या घोषणेंत नाविन्य वा तथ्यांश असा कांहींच नाहीं. कसणारा नसेल तर जमिनीला महत्त्व व उपयुक्तता दोन्हींहि शून्यच. कसणाऱ्याच्या हातून जमीन कधींच काढली गेलेली नाहीं, काढतां येणारहि नाहीं; कसणारावरील बोजा कमी-जास्त झाला असेल एवढेंच! कसणाऱ्या-व्यतिरिक्त इतरांचे जे हितसंबंध जमिनींत उत्पन्न झाले त्यांच्या बुडाशीं, जमीन ही पैसा गुंतवण्याचे निसर्गसिद्ध असें शहाजोग तारण म्हणून वापरण्यास फारच सुंदर रीतीनें उपयोगी पडली हें कारण आहे. देशांत सुस्थिर राज्यसत्ता असो वा नसो, जमिनींत गुंतवलेला पैसा केव्हांहि सुरक्षित रहात होता. ह्या गुंतवलेल्या पैशापासून बिगर-शेतकरी वर्गास जे हक्क वा हितसंबंध प्राप्त होत त्यांचें तात्त्विक स्वरूप कांहींहि असलें तरी, त्यांचा व्यावहारिक अर्थ एवढाच होऊं शकत होता कीं जमिनींत येणाऱ्या पिकाचा कमीजास्त वांटा अशा पैसे गुंतवणाऱ्यांच्या पदरांत पडत होता.

कसणाऱ्या शेतकऱ्याच्या बाजूनेंहि बिगर-शेतकरी वर्गाकडून असें भांडवली साहाय्य घेण्याकडे निःशंक राजीखुषीची प्रवृत्ति होती. ह्या सहकार्यांत शेतकऱ्यांचा तोटा मुळींच नव्हता; उभयतांचीहि सोय होती. हिंदुस्थान हा कृषिप्रधान देश आहे म्हणजेच हिंदुस्थानांतील उत्पादनाचीं महत्त्वाचीं नैसर्गिक साधनें जमीन व कृषि हीं असून तीं ज्याच्या ताब्यांत तो शेतकरी हिंदुस्थानांत साहजिकच राजा समजला जात होता.

पशावारी पेरून मणावारी उत्पन्न शेतकऱ्याच्या हातीं हंगामाला एसद्म येतें. त्याला कारण त्याची मेहेनत एकपट तर निसर्ग दशपट. फांसे टाकून दान मागणारा कसणारा शेतकरी एकटा, तर दान देणारी भूमि पीक देते दहा जणांच्या—शंभर जणांच्या पोषणास पुरेल इतकें! चातक आराधना करतो चोंचभर पाण्यासाठी, तर मेघ वर्षाव करतो, दुनियेची तहान भागेल एवढा; गाईला पान्हा फुटतो, वांसराच्या भुकेसाठी, तर दूध मिळतें कुटुंबाची गरज भागेल एवढें !

असे पैशाला पासरी या मापानें पदरांत पडणारें सारें पीक शेतकऱ्याला एकट्याला संपवतां येत नाहीं व केवळ पीक खावून शेतकऱ्याच्या साऱ्या गरजाहि भागत नाहींत. हंगामांत आलेलें सारें पीक त्याला एकदम खावून पचवतां येत नाहीं व एकदां हंगामांत पोट भरून घेतल्यावर पुढच्या हंगामापर्यंत त्याला उपाशींहि राहतां येत नाहीं. शेतकरी सुद्धां मनुष्यच असतो; त्यालाहि विविध प्रकारच्या गरजा असतात व त्या कायमच्या, दैनंदिन असतात. त्या गरजा भागवण्याची सोय शेतकऱ्याला असावी लागते. त्यासाठी हातीं आलेलें पीक शेतकरी साऱ्या समाजांत मुरवीत असतो. त्यामुळेंच आजपर्यंत शेतकरीहि जगत होता व समाजांतील इतर वर्गहि जगत होते. हिंदुस्थानांतील उत्पादनाचें नैसर्गिक मोठ साधन जी शेतजमीन, ती कसणाऱ्या शेतकऱ्याच्या स्वाधीन अपरिहार्यपणें होती. बाकीच्या जनतेचा कष्टानें कमावून वाचवलेला व सांठवलेला पैसा त्या शेतकऱ्याच्या स्वाधीन त्याच्या जमिनीच्या तारणावर ठेवला जात होता. समाजांत कोणतीहि धामधूम झाली तरी जागेवरच्या जमिनी कांहीं कोणाला उचलून नेतां येत नव्हत्या व अल्प श्रमानें पावसाच्या पाण्यावर त्यांतून पीक निघण्यास अडचण येत नव्हती. शेतजमिनींत कोणाचा कोठलाहि हितसंबंध असला तरी आलेल्या पिकांत कमजास्त वांटा मिळाला कीं त्याची पूर्तता होत होती. म्हणून शेतकऱ्यावर व शेतजमिनीच्या आधारावर हिंदुस्थानांतील फार मोठा समाज आजपावेतों सुस्थिर उभा होता ! राज्यसत्ता कोणाची आहे वा कोठें आहे याबाबतच्या फारशा फिकिरींत न पडतां, हिंदुस्थानांतील ग्रामीण जीवनाचें हें अर्थचक्र युगानुयुगें स्वयंप्रेरणेनें सुरळीत चाललेलें होतें.



एकाद्या व्यापारी जॉइन्ट स्टॉक कंपनींत ज्याप्रमाणें भागदारांचे वा ठेवीदारांचे पैसे गुंतविलेले असतात तशाच प्रकारें शेतकऱ्याच्या जमिनींत बिगर-शेतकऱ्याचा पैसा शेतकऱ्याच्या आवाहनानेंच गुंतविलेला असतो. घरेंदारें व शेतजमिनी यांत असलेल्या हितसंबंधाचा फार मोठा आधार साहजिकच हिंदुस्थानांतील बुद्धिजीवी वर्गानाहि प्राचीन काळापासून मिळत आला होता. त्याच्या जोरावरच हिंदुस्थानांतील सर्व विद्या, कला, शास्त्रें व संस्कृति हीं निर्माण झालेलीं असून त्याच्याच जोरावर आपलें हजारों वर्षांच्या परंपरेचें राष्ट्र अनेक विपत्तींतून पार पडून पुनः नव्या कर्तबगारीसाठी स्वतंत्र होऊं शकलें आहे. पशुसंपदा अथवा गोधन हे जसे एकेकाळीं संपत्तीच्या देवघेवीसाठी वापरले गेल्याचा दाखला आपल्या इतिहासांत आपणास मिळतो, तशाच प्रकारें जमिनींतील हक्कसंबंध हेहि संपदेच्या धारणेचे एक परिणाम म्हणून आजपावेतों शहाजोगपणें वापरले गेलेले आहे ही गोष्ट जर आपण खुल्या मनानें लक्षांत घेतली तर शेतजमिनींतील बिगर-शेतकरीवर्गाचे हितसंबंध संपुष्टांत आणतांना आपण आपलीं पावलें अधिक विवेकानें व न्यायीबुद्धीनें टाकूं अशी निःसंशय खात्री वाटते.

### स्थावरांतील हितसंबंध व राष्ट्रीयत्व

बिगर-शेतकरी वर्गाच्या शेतजमिनीमधील हितसंबंधाला आणखी एक स्वरूप व आशय आहे. आज आपण दक्षिणी, गुजराथी, महाराष्ट्रीय वा हिंदी अशा कोणत्यातरी विशिष्ट परंपरेचे लोक आहोंत. या भावनेचा चिकित्सक बुद्धीनें छडा लावण्याचा प्रयत्न आपण केला तर असें दिसून येईल कीं वरीलपैकीं त्या त्या भूविभागांतील स्थावर मिळकतींत, घरांत वा जमिनींत आपले हितसंबंध गुंतलेले आहेत, अथवा आपल्या बापजाद्यांचे होते अगर संधि मिळाली तर आपण नवे हितसंबंध उत्पन्न करावयास खुषीनें तयार होऊं. महाराष्ट्रांतील मनुष्य मुंबईच्या ऑफिसांत अधिकारावर असो वा गिरणींत मजुरी करीत असो, महाराष्ट्रांतील कोठल्या तरी गांवच्या लहानमोठ्या बऱ्यावाईट घरांत वा जमिनीच्या तुकड्यांत त्याचा जीव अडकलेला असतो. तेथें त्याचा बाप, भाऊ, काका, कोणीतरी त्याच्याहि वतीनें त्या

स्थावर मिळकतीवर हक्क सांगत असतो. हीच गोष्ट मारवड्याची वा गुजराथ्याची. त्याची सावसावकारी वा दुकानधंदा पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि असो, मारवाडांतील वा गुजराथेंतील आपल्या गांवीं घरदार राखण्याची ओढ त्याला नित्य असते. अशाप्रकारें केवळ मातृभाषेमुळें नव्हे तर त्या त्या विभागांतील स्थावर मिळकतींत हितबद्ध असल्यामुळें आपण महाराष्ट्रीय, गुजराथी वा हिंदी ठरलें जातों व आजकाल त्या त्या परंपरेचा अभिमान बाळगावासा वाटतो. हिंदुस्थानांत प्राचीन कालापासून अनेक लोकसंघांचे लोंढे आले. त्यांतील ज्यांना हिंदुस्थानांतील स्थावर मिळकतींत हितबद्ध होतां आले ते हिंदी ठरून गेले व हिंदुस्थानशीं त्यांची आत्मीयता व भवितव्य निगडित झाली. ज्यांना हिंदुस्थानांतील स्थावर मिळकतींत हितबद्ध होता आलें नाहीं ते उपरे ठरले व प्रसंगवशात् हिंदुस्थानांतून उठून गेले. इंग्रज मनुष्यास हिंदुस्थानांत स्थावर मिळकत धारण करण्यास बंदी होती. त्यामुळें इंग्रज मनुष्य सत्ता संपतांच हिंदुस्थान सोडून निघून गेला. मुसलमान किंवा पारशी इंग्रजाप्रमाणें हिंदुस्थान सोडून जाऊं शकत नाहींत; कारण हिंदुस्थानांत त्यांचा पायगोवा झालेला आहे. उद्यां जर प्रत्यक्ष जातीनें जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणास जमिनींत व त्याचे मागोमाग घरादारांत हितसंबंध गुंतविण्यास बंदी होऊन बसली तर सारा बिगर-शेतकरी समाज हिंदुस्थानांत उपरा ठरेल व क्रमशः तो भटक्या वृत्तीस प्रवृत्त होईल. खिशांतल्या पैशाव्यतिरिक्त वा अंगावर बाळगण्यासारख्या धनाव्यतिरिक्त हिंदुस्थानच्या भूमीशीं संलग्न असण्याजोगा कोणताच मार्ग कायद्यानें बिगर-शेतकरी हिंदी माणसास मोकळा ठेवला गेला नाहीं तर त्याला वाटेल कीं आपण हिंदुस्थानचे नागरिकत्वालाच चिकटून बसण्यासारखें काय कारण आहे. भले आपण हिंदुस्थानचे नागरीक राहिलों काय किंवा तसेंच रखडत पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि गेलों काय सारखेंच! हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्ता नाहींशी होऊन हिंदुस्थान स्वतंत्र होतांच, सर व्हिक्टर ससून यांनीं हिंदुस्थानामधील सर्व पसारा आवरून पैसा उभा केला व आतां ते जावा, सुमात्रांत अगर जगाच्या पाठीवर कोठेंहि निरहंकार वृत्तीनें कोठल्याहि प्रदेशाबाबत ममत्व न ठेवतां रहात आहेत असें म्हणतात. तशीच जर आपणां सर्वांची वृत्ति बनली तर ती कांहीं आपल्या देशाच्या उन्नतीस पोषक ठरणार नाहीं. जमिनीच्या तुकड्यासाठीं जीव घेण्याचीं व जीव देण्याचीं उदाहरणें आजपावेतों नेहमीं ऐकूं येत होतीं व गोव्याच्या टीचभर भूप्रदेशासाठीं पांच-पाऊणशें लोकांनीं खुशाल गोळ्या झेलून बलिदान केलें, त्याच्या बुडाशीं भूमिवरील आत्मीयताच नाहीं कां?

असो, येथवर जमिनीमधील बिगर-शेतकरी वर्गाच्या हित-संबंधाचे स्वरूपाबाबत दुर्लक्ष झालेले दोन महत्त्वाचे मुद्दे पुढें मांडले. आतां दुसऱ्या महत्त्वाच्या विषयाकडे वळूं.

### कृषिसुधारणेचीं मूलतत्त्वें

जमिनीबाबतचे नवेनवे कायदे करण्याचें कारण सध्यांची हिंदुस्थानची कृषिविषयक परिस्थिति समाधानकारक नाहीं हें आहे व त्याबद्दल कोणाचें दुमत नाहीं. परंतु या असमाधानकारक परिस्थितीचें निश्चित स्वरूप काय आहे याबद्दलच्या सत्ताधारी वर्गाच्या कल्पना मात्र स्पष्ट नाहींत असेंच मोठ्या खेदानें म्हणणें प्राप्त आहे. हिंदुस्थानांतील महत्त्वाचा धंदा शेती असला तरी त्यावरील लोकसंख्येचा भार बेसुमार वाढत आहे. शेती करण्याच्या पद्धती जुन्या, अप्रगत असून त्यांचेपासून जमिनींचे

यंदाची दिवाळी सर्वांस सुखाची जावो!

दि कोल्हापूर मराठा को-ऑप. बँक लि.

कोल्हापूर.

( स्थापना १९३३ )

| | | |
|---|---|---|
| १) शेअर भांडवल उभारलेलें | रु. | २,००,००० |
| २) शेअर भांडवल वसूल | रु. | १,०३,५७० |
| ३) रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ९२,९७८ |
| ४) खेळतें भांडवल | रु. | ३,८१,००० |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

डी. ए. शिंदे, ऑ. सेक्रेटरी — डी. एस. माने, प्रेसिडेंट

धी बँक ऑफ सिटिझन्स लिमिटेड

मुख्य कचेरी—१५१४ मारुती गल्ली, बेळगांव

( स्थापना १९३७ )

*सुरक्षितपणा, सचोटी व सेवा या त्रयींवर अधिष्ठित असलेली*

बेळगांव, धारवाड, कारवार आणि विजापूर या जिल्ह्यांतील प्रमुख शहरीं बँकेच्या शाखा असून सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करणारी

मुंबई-कर्नाटकांतील एक प्रमुख बँक

मुंबई व इतर ठिकाणांहून रेल्वे रिसिटस् वसुली-साठी पाठविणेची सोय आहे.

जी. डी. सराफ

चेअरमन

आमचे हितचिंतकांना ही दिवाळी भाग्याची जावो!

उत्पादन फारच अल्प होतें, हें सूत्ररूपानें हिंदुस्थानांतील शेती-धंद्याच्या असमाधानकारक परिस्थितीचें खरें निश्चित लक्षण आहे. कसणारांना जमिनीवर मालकीहक्क नाहीं; भूमिहीन शेतमजूर फार आहेत; हीं जीं कृषिधंद्याच्या असमाधनकारक परिस्थितीचीं लक्षणें सांगितलीं जातात तीं भ्रामक वा सोयीसाठी स्वीकारलेलीं लक्षणें आहेत; वास्तविक नाहींत. जगांत शेतीचा जो नवा जमाना सुरू झाला आहे त्यांत आधुनिक यांत्रिक अवजारें वापरून मोठ्या प्रमाणावर सलग भूखंडावर विस्तृत शेती करण्यांत येत आहे; व त्या मार्गाकडे पाठ फिरवून शेती सुधारण्याचा प्रयोग करणें हास्यास्पद आहे.

शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणेचा दुसरा उघड उपाय म्हणजे औद्योगीकरण. औद्योगीकरणानें समाजांतील अधिकाधिक लोकांना रोजगार पुरविण्याची खटपट करणें हें हिंदुस्थानांतील लोककल्याणकारी राजसत्तेचें प्रथम कर्तव्य आहे. जादा रोजगार न पुरवितां केवळ कांहीं लोकांचे हक्क वा हितसंबंध संपुष्टांत आणण्यानें लोककल्याण साधण्याची आकांक्षा मुळींच फलद्रूप होणार नाहीं.

## हा कुठला समाजवाद ?

कुळकायद्यांतील 'नवीन दुरुस्त्या समाजवादी समाजरचनेचें उद्दिष्ट साधण्यासाठी करण्यांत येत आहेत अशी घोषणा करण्यांत आली आहे; तीहि अगदीं पोकळ व फसवी आहे. एकाची खाजगी मालकी नष्ट करून दुसऱ्याला तिचें दान देणें, दुसऱ्याची मालकी उत्पन्न करणें, यांत समाजवादाचा अंगिकार नाहीं; थट्टा आहे; खून आहे. समाजवादाचा गाभा खासगी मालकी नष्ट करून उत्पादक साधनसंपत्ति समाजाच्या समाईक मालकीची करणें हा असून त्यालाच या दुरुस्तीच्या कायद्यानें हरताळ फासला गेला आहे.

केवळ तत्त्वाच्या दृष्टीनेंच नव्हे, तर व्यवहाराच्या दृष्टीनेंहि नव्या दुरुस्त्या असमर्थनीय व अहितकारक आहेत. हिंदुस्थानांतील शेतीच्या धंद्याला जें नवें वळण लावणें आवश्यक आहे तें या दुरुस्त्यांनीं मुळींच साधतां येणार नाहीं. त्यांचा अडथळाच प्रगतीच्या मार्गांत नव्यानें उभा करण्यांत येत आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणें आपली शेती सुधारण्यासाठी आपणांस यंत्रसाधनांनीं मोठ्या प्रमाणावरील शेतीचा कार्यक्रम स्वीकारणें भाग आहे. सबंध गांवची जमीन सहकारी पद्धतीनें संयुक्तपणें करणें हाच आपल्यापुढें एकमेव मार्ग आहे. वालचंदनगरला किंवा कोणत्याहि साखर कारखान्यावर यशस्वी झालेली मोठ्या प्रमाणावरील शेती आपण पाहातों. तशाच धर्तीवर गांवोगांव सामुदायिक शेतीचा प्रसार आपणांस करावयाचा आहे. साऱ्या गांवचे कसणारे एकत्र आणून त्यांच्या संयुक्त श्रमांनीं आपल्याला किफायतशीर अमाप पीक काढावयाचें आहे. आपल्या गांवच्या बिगर–शेतकऱ्यांसुद्धां सर्वच गांवकऱ्यांना संभाळून घेऊन, सर्वांच्या हितसंबंधास सहकारी संघटनेंत योग्य प्रमाणांत वाव देऊन आपल्याला सर्वच नागरिकांचें कल्याण साधण्याचें कार्य करतां येण्यासारखें आहे. अ ला टांग मारून ब च्या डोक्याला तुरा आपल्याला बांधावयाचा नाहीं. त्यासाठी सामुदायिक श्रम, सहकारी संघटना, हाच एक निश्चित मार्ग आहे. पण त्याकडे पाठ फिरवून बिगर–शेतकरी वर्गास नाहक लुबाडून खाजगी मालकीच्या चतकोर-नितकोर तुकड्यांचीं वाणें वांटावयास निघणें आपल्या खऱ्या प्रगतीच्या आडच येणार आहे.

## विसंगत घोषणा

आजकाल आपल्या प्रत्येक धोरणांत विसंगत घोषणांचा असाच गोंधळ सर्वत्र दिसून येत आहे. एकीकडे सुशिक्षित पुढारलेल्या वर्गास 'खेड्याकडे चला' असा आदेश देत असतांना खेड्यापासून तो सर्वस्वी विटून दूर सरेल असे कायदे होत आहेत. साळसूद गुन्हेगारीवर खुशालचेंडूपणानें परस्वापहार करणाऱ्या गुन्हेगारांच्या कळवळ्यानें कायदे व तुरुंग सोयीचे नि सुखाचे करण्यांत येत आहेत, तर स्वातंत्र्याच्या चळवळींत आघाडीवर असलेल्या मध्यमवर्गास जणूं काय या दुरुस्तीच्या कायद्यांत गुन्हेगार लेखून त्यावर निष्कारण अन्यायानें शस्त्र धरलें गेलें आहे. एकीकडे सहकारी साखर कारखान्यांची मुहूर्तमेढ रोविली जात असतां सहकाराच्या कार्यक्रमास विरोध करण्यास नवा मालकवर्ग निर्माण करण्यांत येत आहे. अशा अनेक विसंगति दाखवितां येतील, परंतु येथें त्या अप्रस्तुत असल्यामुळें त्यांचा विस्तार करण्याचें कारण नाहीं.

## मोबदल्याची सहजशक्य योजना

वरील सर्व विचार बाजूस सारून कूळकायद्यांत योजलेल्या प्रस्तुत दुरुस्त्या करावयाच्याच म्हटलें तरी बिगर–शेतकरी वर्गास वाजवी, भरपूर मोबदला वा भरपाई देणें सहज शक्य असूनहि तें लक्षांत घेतलें जात नाहीं, ही खेदाची गोष्ट आहे. सर्व जमीन प्रथमतः सरकारनें स्वतःकडे घ्यावी, कायद्याच्या दृष्टीनेंहि ही मधली पायरी आवश्यक आहे. जमीनमालकांना सरकारी मुदतबंद कर्जरोखे द्यावे, व मग सदरील सर्व जमिनी सरकारनें कसणारांना शक्य तेथें ताबडतोब किंमत घेऊन वा हप्तेबंदीनें विकत द्याव्यात. दरम्यानच्या काळांत सरकारनें विकल्या न गेलेल्या जमिनीवरील खंड वसूल करावा. अशा रीतीनें किंमतीचे येणारे पैसे व खंडाचे येणारे उत्पन्न यांतून सरकारनें वरील शेतीच्या कर्जरोख्यावरील व्याजमुद्दलाची फेड करण्याची व्यवस्था करावी. सरकार निरनिराळ्या योजनांसाठी कर्ज उभारीत आहे व रकमा खर्ची घालीत आहे. तर मग या कार्यक्रमासाठीं तरी सरकारनें जबाबदारी अंगाबाहेर टाकण्याचें काय कारण आहे ? आज कुळांच्या उत्पादनांतून खंड व सारा या रूपानें शेतीबाह्य अर्थरचनेस कसणाऱ्यांचा हातभार लागत आहे. खंडाची जबाबदारी संपली कीं सरकारी सारा वाढत जाणार हें निश्चित; तसा तो वाढवला नाहीं तर कसणारांना जमिनीची मशागत कसून करण्याचें कारण उरणार नाहीं व त्यांच्या आळसालाच उत्तेजन दिल्यासारखें ठरेल. कसणारे तेवढे आपल्या राज्याचे मानकरी व बिगर–शेतकरी समाज हा गुन्हेगार असा जो दृष्टिकोण या दुरुस्त्यांच्या कायद्यांत अनुस्यूत झालेला दिसतो तो तर लोककल्याणकारी म्हणवणाऱ्या राजसत्तेस शोभणारा नाहीं. आपण सर्वच या देशाचे नागरिक आहोंत. सरकारला मध्यमवर्गाचे शेतींतील हितसंबंध हरायचे वाटत असतील व ते नष्ट करणेंच आवश्यक वाटत असेल तर त्यालाहि हरकत नाहीं, पण ज्यांचे हक्क बुडाले त्यांना उपाशी ठेवून लोककल्याणकारी कारभाराचा टेंभा मिरवतां येणार नाहीं. या नव्या निर्वासित वर्गास रोजगार वा भरपूर नुकसानभरपाई देणेंच योग्य वा न्याय्य असून तें सर्वस्वी शक्य आहे.

## कटुता व विद्वेष नको !

यंत्रयुगांत समाजवादाशिवाय अन्य अर्थरचना सोयीची नाहीं, हें तत्त्व जरी सर्वमान्य असलें तरी आमची जगांतील सर्व समाजवादी विचारवंतांची अशी धडपड आहे कीं, कोणत्याहि वर्गास धारेवर न धरतां व कोणत्याहि प्रकारची कटुता निर्माण न होऊं देतां समाजवाद आणावयाचा ! त्यासाठी नवे उत्पादक रोजगार समाजवादी धोरणानें सरकारी मालकीनें सुरू करून त्यांत

वाढत्या लोकसंख्येस रोजगार पुरवीत जावयाचें व असा आधार लोकांना मिळत गेला कीं त्यांच्या खासगत मत्तेदारीस संकोचित करीत जावयाचें. याच धोरणानें आपणांस जाणें उचित व शक्य आहे. रशियांत व चीनमध्यें जे रक्तपात झाले ते टाळतां येण्यासारखे आहेत. युगोस्लाव्हियानें ते टाळले हेंच त्याचें वैशिष्ट्य आहे. हा सरळ सीधा स्पष्ट मार्ग डोळ्यासमोर असतांना आपण आडरानांत शिरून निष्कारण विद्वेष पसरविण्यास उद्युक्त व्हावें ही मोठीच खेदाची गोष्ट आहे.

राष्ट्रीयीकरणाचा प्रत्यक्ष अनुभव सुद्धां आपल्याला आहे. आपल्या प्रांतांत स्टेट ट्रॅन्स्पोर्टची स्थापना केली तेव्हां मोटार धंद्यांतील बहुसंख्य लोकांना स्टेट ट्रॅन्स्पोर्टमध्यें समाविष्ट करून घेण्यांत आलें. इंपीरियल बँकेचें राष्ट्रीयीकरण नुकतेंच झालें. तिच्या भागदारांना भरपूर भरपाई देण्यांत आली. मग हें एकप्रकारचें शेतजमिनीचें राष्ट्रीयीकरण करण्यांत येत असतांना जमीनमालकांना तेवढें भयंकर दुष्टाव्यानें व तिरस्कारानें वागविलें जावें असें कोणतें पातक त्यांनीं केलें आहे ? संयुक्त प्रांत वगैरे इतर राज्यांतहि सरकारनें जमिनी करणाऱ्यांना दिल्या आहेत, परंतु त्यासाठी सरकारनें बॉण्डस काढून ते संबंधित माणसांना दिले आहेत. मग मुंबई राज्यांत मात्र शेतजमिनींना भरपूर वाजवी नुकसानभरपाई मिळूं नये वा शेतजमिनींवरच ज्यांचें जीवन अवलंबून होतें त्यांना नव्या जमान्यांत नवा आधार देणेची कांहीं सोय असूं नये, असें कां ?

शेतजमिनींचा जो काय अल्पस्वल्प मोबदला बिगर–शेतकरी मालकांना मिळणार तो दहा–बारा वार्षिक हप्त्यांनीं मिळणार. म्हणजे, या काळांत तीन निवडणुका होणार; व तीन वेळां सत्तांतर शक्य होणार. सरकारनें केलेली सध्यांची ही मोबदल्याची योजना व प्रमाण पुढील सत्ताधीश पाळतील अशी कांहींच खात्री वा हमी नाहीं. मोबदल्याची सर्व रक्कम पुरी होण्याच्या आधींच मालकी मात्र नष्ट होणार. यांत मिळकतीच्या धारणेबाबतच्या व स्वामित्वाच्या सर्व मूलभूत कोणत्याहि मत्तेबाबत शाश्वति वाटेनाशी होणार आहे. ही परिस्थिति स्थिर राजसत्तेला व प्रगतीला परिपोषक नाहीं.

—स. वा. दातार

---

### जामनगरची वीज-कंपनी

जामनगरला विजेचा पुरवठा करणारी नवानगर वीज कंपनी सौराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्डानें आपल्या ताब्यांत घेतली आहे. नव्या व्यवस्थेमुळें कंपनीच्या ज्या नोकरांत आर्थिक नुकसान सोसावें लागेल, त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी १,००,००० रुपयांची रक्कम बाजूला काढण्यांत आली आहे.

### वाजपेय यज्ञाचा चित्रपट

हॉलंडमधील एका सांस्कृतिक संघटनेनें पुण्यांत करण्यांत आलेल्या ‘ वाजपेय ’ यज्ञाचा चित्रपट घेतला आहे. यज्ञांत म्हटल्या जाणाऱ्या वेदमंत्रांचें ध्वनिमुद्रणहि करण्यांत आलें आहे. हा यज्ञ संस्कृत भाषेच्या अभिमान्यांनीं जागतिक शांततेसाठी केला होता.

### कोळशाच्या खाणींतील सुरक्षितता

कोळशाच्या खाणींत एक प्रकारचा वायु निर्माण होऊन स्फोट होतात. स्फोटाची शक्यता आगाऊ कळविणारें एक यंत्र रशिअन शास्त्रज्ञांनीं शोधून काढलें आहे. घातक वायु निर्माण झाल्याबरोबर हें यंत्र कोळशाच्या खाणींतील यंत्रें आपोआप थांबवितें.


## सन्मित्र को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लिमिटेड, मुंबई.

११ सुगमाट स्ट्रीट, मुंबई ४.
[ स्थापना सन १९२४ ]

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १,५०,००० |
| वसूल भांडवल | रु. १,१२,००० |
| एकूण ठेवी | रु. ४,२०,०००चे वर |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ५,८५,०००चे वर |

मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचे दर :

मुदत : ३–६ म., १ व,, २ व., ३–६ व. ७ किंवा अ. वर्षे
दर : १ %, २¼%, २½%, ३%, ३½%

सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर १½%

कोणालाहि करंट अगर सेव्हिंग्ज ठेवखातें उघडतां यत.

कर्ज : सोनें, चांदी, विमापॉलिसी, व्यापारी माल, घर व जमीन इत्यादींचे तारणावर माफक व्याजाचे दरानें कर्जें दिलीं जातात.

कोणत्याहि व्यक्तीला फक्त एक रुपया प्रवेश फी भरून ‘ब’ वर्गाचा सभासद होता येतें. सध्यां अशा सभासदाला सोनें व चांदी यांचे तारणावर कर्ज दिलें जातें.

बँकेनें नुकतीच गिरगांवांतील भटवाडींत एक इमारत खरेदी केली असून शक्य तितक्या लवकर तेथें बँकेच्या कचेरीच्या उपयोगासाठी सेफ डिपॉझिट व्हॉल्टसह नवीन इमारत बांधण्याचा विचार आहे. गेलीं सतत सात वर्षे बँक ‘ अ ’ वर्गांत आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

शंकर नारायण कानडे, एम्. ए, (चेअरमन)

## दि महाड को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., महाड

जि. कुलाबा.
— स्थापना १९३१ —

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ८६,६२५ |
| रिझर्व फंड | रु. ५०,००० |
| इतर फंडस् | रु. ७०,००० |
| ठेवी | रु. ७,७५,००० |
| खेळतें भांडवल | रु.१०,००,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सभासदांस व्यक्तिशः रु. १०,००० पर्यंत कर्ज देणारी कुलाबा जिल्ह्यांतील ही एकच बँक आहे.
ठेवींवरील व्याजाचे दर आकर्षक आहेत.
मोठमोठ्या व्यापारी पेठा असलेल्या गांवीं ड्राफ्ट देण्याची योजना आहे.

*ही दिवाळी आमचे खातेदारांस व हितचिंतकांस सुखाची जावो.*

| | | |
|---|---|---|
| द. न. वैद्य, | पी. गो. मेथा | मा. गो. धारप, |
| B.A.LL.B. | B.A.LL.B. | B. Sc. (Hon)H.D.C. |
| चेअरमन | मॅ. डायरेक्टर | मॅनेजर |

# स्टेट बँक ऑफ इंडियाच्या नव्या शाखा

## स्थानिक बँकांची वाजवी अपेक्षा

शेती हाच भारताचा मुख्य धंदा असून शेंकडा ८३ टक्के लोकसंख्या खेड्यामध्येंच आपला जीवनक्रम घोलवीत आहे. शेतीच्या धंद्यांतसुद्धां मोठ्या प्रमाणावर शेतीची लागवड करून बाजारी पिकें पिकविणारे गबर शेतकरी, मध्यम शेतकरी व जेमतेम जमिनीच्या तुकड्यांतील उत्पन्नावर जीवन कंठणारीं बहुसंख्य शेतकरी कुटुंबें, अशी वर्गवारी करावी लागेल. याच धर्तीवर देशाचे आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें तीन विभाग मानतां येतील. पहिला विभाग, उद्योगधंदे व व्यापार यांच्या उलाढाली व्यापक प्रमाणांत होत असल्यानें चलन भरपूर प्रमाणांत खेळून तें जरूरीच्या ठिकाणीं नेण्या-आणण्याच्या सोयींच्या संस्थांचें जाळें असलेला. दुसरा विभाग यापेक्षा दुय्यम दर्जाचा पण चलनाचा पुरवठा, इत्यादि सोयींनीं युक्त असाच व तिसरा मात्र निकृष्ट स्वरूपाचा. यांतील अर्थोत्पादनाचीं साधनें संकुचित स्वरूपाचीं. पोटापुरतें पिकवून कशीबशी गुजराण करणारा, गांठीं शिल्लक नसल्यानें कर्जाची मदत मिळवून हंगामाचे दिवसांत त्याची फेड करीत लक्ष्मीशीं कायम फारकत झालेला, 'दरिद्रिनारायण,' -हिंद देशीचा सामान्य शेतकरी,- याचें वास्तव्यस्थान. अशा प्राप्त परिस्थितीचा पुनः परिणाम म्हणून केवळ नफ्याकडे दृष्टि ठेवणाऱ्या व्यापारी बँकांनीं आपलें कार्यक्षेत्र पहिल्या दोन विभागांपुरतेंच मर्यादित केलें. त्यामुळें याच विभागांतील शहरांत त्यांची गर्दी होऊन निकृष्ट विभागाकडे दुर्लक्ष होऊं लागलें. या प्रवृत्तीमुळें सर्व पैसा याच विभागांत सांठला जाऊन बँकांना त्यांच्या खर्चांतहि काटकसर करतां येऊं लागली. या उलट, निकृष्ट विभागांतील पैसा आटत जाऊन त्याच्या प्रगतीला खीळ पडली. तेथील आर्थिक उलाढालींचें लहान क्षेत्र बँकांना खर्चाचे दृष्टीनें न परवडणारें असे. सहकारी बँका या शेतीच्या उत्पादनाच्या कार्मी आर्थिक सोय करण्याच्या दृष्टीनेंच चालविलेल्या असूनसुद्धां, त्यांच्याहि बाबतींत असेच परिणाम दिसून येतात. त्यामुळें या विभागांत अशा संस्थांची संख्याहि मोजकीच दिसून येते.

### व्यावहारिक उपाययोजना

अशा प्रकारें आर्थिक व इतर दृष्ट्याहि शुष्क झालेल्या ग्रामीण विभागांत नवचैतन्य आणल्याशिवाय राष्ट्र-पुरुषाचा पाया मजबूत राहाणार नाहीं व वाढत्या विषमतेस आळा पडणार नाहीं. राहाणीचें मान उंचावून देशाची सर्वांगीण प्रगति करण्यासाठी, आर्थिक नियोजनानुसार पाउलें टाकणाऱ्या लोकशाही सरकारला या विभागांत नुसत्या कर्जाचीच सोय करून न थांबतां पुनर्रचनेच्या कल्याणकारी धोरणानुसार विशेष आर्थिक मदतहि पोंचविणें जरूरीचें झालें आहे. ग्रामीण विभागांतील कर्जाच्या अवस्थेची पाहाणी करून सूचना करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनें नेमलेल्या कमिटीनें ही परिस्थिति लक्षांत घेऊन पैसा व सत्ता यांचा भरपूर पाठिंबा असलेली अशी स्टेट बँक ऑफ इंडिया नांवाची एकत्रित वरिष्ठ बँक स्थापन करण्यासाठीं इंपीरियल बँक ऑफ इंडिया व इतर दहा संस्थांनी बँका यांचें राष्ट्रीयीकरण करण्याची शिफारस केली व याची अंमलबजावणीहि लगेच होऊन गेल्या जुलै महिन्यापासून ही स्टेट बँक अस्तित्वांत आल्याची घटना सर्वांस विदितच आहे. तूर्त इंपीरियल बँकेचेंच राष्ट्रीयीकरण झालेलें असून इतर दहा संस्थांनीं बँकांचें यथाक्रम होण्याचें आहे. या व्यावहारिक योजनेमुळें या बँकांच्या सांप्रतच्या सर्व म्हणजे ७७३ (पे ऑफिसेससह) शाखांचें जाळें या स्टेट बँकेस लाभणार असल्यानें, नवीन बँकेच्या स्थापनेच्या सुरुवातीचा सर्व खटाटोप, खर्च आणि वेळ यांची बचत झाली.

व्यापारी व सहकारी बँकांचा क्षेत्रविस्तार देशांतील सर्व भागांत होण्यास असणारी मुख्य अडचण म्हणजे पैशाची ने-आण करण्याच्या सोयींचा अभाव. देशाची मध्यवर्ती बँक या नात्यानें रिझर्व्ह बँकेकडून या सोयी झाल्या पाहिजेत. त्यादृष्टीनें पूर्वीपासून सरकारी छत्राखालीं वाढलेल्या इंपीरिअल बँकेमार्फत सरकारी तिजोऱ्यांचें काम चालविण्याची योजना आंखून ही सोय वाढत्या प्रमाणांत होत आली. रूरल बँकिंग इन्क्वायरी, कमिटीनें १९५० सालींच इंपीरिअल बँकेच्या शाखा सर्व जिल्ह्याच्या ठिकाणीं व इतर व्यापारी बँकांच्या सर्व तालुक्याच्या ठिकाणीं व्हाव्यात, अशी शिफारस केली होती. परंतु अंमलबजावणीच्या दृष्टीनें अपेक्षेइतकी शाखांची वाढ झाल्याचें दिसून येत नाहीं.

### शाखांची वांटणी

इंपीरियल बँकेच्या किंवा स्टेट बँकांच्या जिल्हानिहाय शाखांची वाटणीची आंकडेवारी पुढीलप्रमाणें आहे:—


सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
स्थापना- १९१८.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई-४.
राष्ट्राकरितां बचत करा.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल रु. ......... | १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल रु. ......... | ७,४७,००० |
| रिझर्व..........रु. ......... | ६,७२,००० |
| ठेवी..........रु. ......... | १,३८,००,००० |

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.
शाखा: फोर्ट, दादर, माहिम, बेळगांव, पुणें.

कण आणि क्षण
(सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)
लेखक: श्री. वा. काळे

| मराठी | गुजराती |
|---|---|
| दुसरी आवृत्ति | दुसरी आवृत्ति |
| पृ. सं. १६८ | तयार होत |
| किं. १॥ रु. | आहे. |

## दि पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.

स्थापना वर्ष ] [ १९३५

पेण, जि. कुलाबा

( सहकारी कायद्यान्वयें स्थापन झालेली )

| | | |
|---|---|---|
| भागांची संकलित मर्यादा | रु. | ५०,००० |
| खपलेल्या भागांची रक्कम | रु. | ३८,९०० |
| रिझर्व फंड | रु. | २९,५०० |
| खेळतें भांडवल | रु. | ३,०६,२०० |

********************

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

********************

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

( १ ) श्री. ना. ब. नेने ( अध्यक्ष )
( २ ) श्री. व. वि. कोठारी ( मॅ. डायरेक्टर )
( ३ ) श्री. रा. गो. भावे ( डायरेक्टर )
( ४ ) श्री. त्रिं. ल. आगाशे „
( ५ ) श्री. दि. दि. मनोहर „
( ६ ) श्री. ज. म. काळण „
( ७ ) श्री. कृ. रा. दाते „
( ८ ) श्री. मो. रा. कणेकर „
( ९ ) श्री. अ. ह. टिळक „

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
अ. मॅनेजर.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

**************

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यथावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा,
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

| राज्यविभाग | शाखा असलेलीं जिल्ह्याचीं ठिकाणें | शाखा नसलेलीं जिल्ह्याचीं ठिकाणें |
|---|---|---|
| अ | १९५ | ७४ |
| ब | ८४ | १५ |
| क | २२ | १६ |
| | ३०१ | १०५ |

यावरून, १०५ जिल्ह्यांच्या ठिकाणीं स्टेट बँकेच्या नव्या शाखा स्थापन करणें आवश्यक आहे. त्यांतहि विशेष लक्षांत घेण्याजोगी बाब म्हणजे, अ व क विभागांतील राज्यांत ९० ठिकाणीं शाखा नसून ब विभागांतील राज्यांत ( पूर्वीचा संस्थानी मुलुख ) १५ च ठिकाणीं शाखा उघडणेच्या आहेत. म्हणजेच या बँकांच्या शाखांचा विस्तार जास्त व्यापक आहे असें म्हणावें लागतें.

वरील १०५ जिल्ह्यांच्या ठिकाणींच स्टेट बँकेच्या शाखा उघडण्यापुरतांच आतां बँक विस्ताराचा कार्यक्रम मर्यादित राहिला नाहीं. ग्रामीण विभागाची उर्जितावस्था जलद होण्यासाठी खेडोपाडीं सहकारी पतपेढ्यांचा व बँकांचा प्रसार होणें अत्यावश्यक असलेनें पुढील काळांत शेतीच्या धंद्याच्या प्रत्येक अवस्थेंत, लागवडीपासून माल बाजारांत येण्यासाठी आवश्यक त्या सर्व क्रिया पार पाडण्याकरितां, लागणारी आर्थिक मदत करून त्याचबरोबर माल सांठविण्यासाठी किंवा तारण लावण्यासाठी गुदामांचीसुद्धां सोय करण्याची योजना असल्यानें हा सर्व पैसा पुरविण्यासाठी स्टेट बँकेच्या शाखा आतां प्रत्येक जिल्ह्यांतील विभागांच्या ठिकाणींहि उघडणें जरूरीचें आहे. सध्यां तालुक्याच्या ठिकाणीं सरकारी ट्रेझरीची सोय असते. परंतु कांहीं ठिकाणीं इंपीरिअल बँक किंवा इतर संस्थांनी बँकांनींहि या सब् ट्रेझरींची व्यवस्था चालविली आहे. मात्र ज्या ठिकाणीं त्यांचेकडे ही व्यवस्था नाहीं अशीं ठिकाणें खालीलप्रमाणें:—

| राज्यविभाग | इंपीरियल किंवा संस्थानी बँकांची शाखा नसलेलीं सब ट्रेझरींचीं ठिकाणें |
|---|---|
| अ | ९४० |
| ब | ५१६ |
| क | ७४ |
| | १,५३० |

इतक्या सर्व ठिकाणीं शाखा उघडणें तूर्त अशक्यच असल्यानें साधारणपणें चार किंवा पांच तालुक्यांसाठी मध्यवर्ती अशा गांवीं एकेक शाखा स्थापन केल्यास तिच्याकडून त्या विभागांतील बँका व सोसायट्यापुरती जरूर ती सोय होऊं शकेल. या पद्धतीनेंसुद्धां ३०० पेक्षा जास्त शाखा उघडणें जरूरीचें ठरतें. म्हणजेच, जिल्ह्याच्या ठिकाणच्या १०५ व या ३०० अशा एकूण सुमारें ४०० तरी शाखा स्टेट बँकेकडून नजिकच्या काळांत उघडण्यांत आल्याशिवाय ग्रामीण विभागांतून बँका व पतपेढ्या व इतर अनेक योजना कार्यक्षम होऊं शकणार नाहींत.

### स्थानिक बँकांची अपेक्षा

अशी ही शाखा-विस्ताराची योजना अमलांत आणतांना स्टेट बँकेकडून इतर व्यापारी बँकांनीं, विशेषतः तेथें अगोदरच स्थिर झालेल्या संस्थांनीं, कोणत्या स्वरूपाची अपेक्षा करणें योग्य होईल ? नवीन बँक इंपीरियल बँकेंतूनच निर्माण करण्यांत आल्यामुळें तिचें व्यापारी स्वरूपाचें बँकिंगचें अंग कायम ठेवून रिझर्व्ह बँकेची प्रतिनिधि म्हणून ग्रामीण विभागांत पैसा पुरविण्यासाठी व विशेषतः शेतीचीं पिकें किफायती विकण्यासाठी व त्यापूर्वीची क्रिया होण्यासाठी लागणारी आर्थिक मदत करणें हाच तिच्या नवीन शाखा—विस्ताराचा उद्देश आहे. स्टेट बँकेचें व्यापारी व नफ्याचे दृष्टीचें कार्यक्षेत्र मोठ्या शहरांतूनच राहाणेचें असून बँकिंगचा प्रसार होणेचे व ग्रामीण विभागास संजीवन प्राप्त करून देणेचे व्यापक व उदात्त सरकारी धोरणानुसार सहकारी पेढ्यांना, इतर बँकांना व व्यक्तींना सोयी उपलब्ध करून देण्याचें कार्य या नव्या शाखांचे क्षेत्रांत असलें पाहिजे. या शाखांमुळें तेथें कार्य करीत असलेल्या बँकांवर अतिक्रमण होण्यापेक्षा स्वतः झीज सोसूनसुद्धां त्यांना मदत करण्याचेंच तिचें स्वरूप राहिलें पाहिजे, अशी अपेक्षा आहे. या दृष्टीनें स्टेट बँकेकडून आपल्या शाखांची सुरुवात देशांतील ज्या विभागांत बँकिंगचा प्रसार कमी प्रमाणांत झालेला आहे अशा बिहार, ओरिसा, आसाम, इत्यादि राज्यांपासून होणें जरूरीचें वाटणें साहजिक आहे. परंतु, या बँकेनें आपल्या पहिल्या शाखा कल्याण व भिवंडी अशा बँकिंगची सोय पुरेशी उपलब्ध असलेल्या ठिकाणीं उघडल्यामुळें बँकिंगच्या क्षेत्रांत थोडी अस्वस्थता वाटणें स्वाभाविक आहे. तरी कमिटीच्या शिफारसीनुसारच या शाखा काढून आक्रमक धोरणाचा अवलंब न होतां इतर बँकांना मदत होण्याचेंच व उत्तेजन मिळण्याचेंच कार्य व्हावें अशी बळकट आशा धरल्यास अस्थानीं होणार नाहीं. या संदर्भांत वरील कमिटीच्या रिपोर्टांतून तिचे महत्त्वाचे विचार उद्धृत करूनच या लेखाचा समारोप करणें योग्य होईल.

### कमिटीचें मार्गदर्शन

" जिल्ह्याच्या व तालुक्याच्या मुख्य ठिकाणापर्यंत आणि त्यांचे पलीकडेहि स्टेट बँकेनें शाखाविस्तार केला पाहिजे; आणि तोहि त्वरेनें. ह्यामुळें ठरलेल्या मर्यादेपेक्षा अधिक तोटा झाला, तर तो रिझर्व्ह बँकेला व सरकारला यावयाचे डिव्हिडंडमधून भागवावा; इंटिग्रेशन अँड डेव्हलपमेंट फंड त्यासाठीच योजलेला आहे. स्टेट बँकेनें सहकारी संस्थांच्या, विशेषतः मार्केटिंग व प्रोसेसिंग संस्थांच्या, गरजांकडे आस्थेनें लक्ष देण्याची शिकस्त करावी. तालुकानिहाय सहकारी सोईशीं शाखाविस्ताराचा कार्यक्रम जुळता करून घ्यावा. खासगी सावकार, व्यापारी, श्रॉफ, व्यापारी बँका, हे ग्रामीण बँकिंगच्या योजनाबद्ध कार्यक्रमास हातभार लावत राहतीलच. गोडाउन्स व वेअरहाउसेसच्या व्यापक जाळ्यांच्या द्वारां शेतमालाच्या व्यापारास पूर्वीपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणांत व्यापारी बँका मदत करूं शकतील.

"तालुक्यांच्या ठिकाणचें सरकारी कॅशचें काम स्टेट बँकेकडे जाईल, व रिझर्व्ह बँकेची ' करन्सी चेस्ट ' तिच्या व्यवस्थेखाली राहील. पैशाच्या वर्गावर्गीची व अदलाबदलीची सोय स्थानिक बँका व जनता ह्यांना पुरेशा प्रमाणांत उपलब्ध करून देण्यास स्टेट बँक सुसज्ज होईल. तिनें स्थानिक बँकांसाठी सेफ कस्टडीची सोयहि करावी व त्या दृष्टीनें ' स्ट्रॉंग रूम ' ची रचना करावी. केंद्रीय ठिकाणीं स्टेट बँक नेहमींचा व्यापारी बँकिंगचा व्यवहार करीत राहील, पण त्या ठिकाणीं अगोदरच स्थापन झालेल्या बँकांशीं तिची स्पर्धा होत आहे अशा कोणत्याहि वाजवी तक्रारीस तिनें वाव देतां कामा नये. बँकिंग, रेमिटन्स व इतर सोईची ह्या ठिकाणीं मोठी वाण भासते, ती दूर करणें हें तिचें मुख्य ध्येय असलें पाहिजे. "

—गो. वि. सराफ




**पुण्याचें स्वागत लॉज**

पुण्याच्या " स्वागत लॉज "चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !

स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०

वेळगांवचें सँडो-ब्रँड

**शुद्ध व साजूक तूप**

व्यापाऱ्यांस सवलतीचे दर

म. गो. कुलकर्णी, फडतरे चौक, पुणें २.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

**दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.**

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यासः ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

**दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.**

**( शिडयूल्ड बँक )**

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २. ( टे. नं. २७६३ )

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,२४,९१० |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर. टे. नं. २६०७

**पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.** १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो.

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५ तार—SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी, मॅनेजर

# ग्रामीण व लहान उद्योगधंद्यांचा विकास

## कर्वे कमिटीच्या शिफारसी

'कर्वे समिति' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या समितीच्या अध्यक्षपदीं प्रा. द. गो. कर्वे व सदस्य म्हणून प्रा. ध. रा. गाडगीळ, श्री. वैकुंठराय मेहता आणि श्री. पी. गोविंदन् नायर व वैकल्पिक सदस्य म्हणून श्री. व्ही. नंजप्पा, आणि नियोजन मंडळाचे डेप्युटी सेक्रेटरी डॉ. डी. के. मलहोत्रा समितीचे चिटणीस म्हणून होते. समितीनें पुढील मुख्य उद्दिष्टें समोर ठेवावयाचीं होतीं:—(१) पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत सर्वास मागणी असलेल्या ग्राहकोपयोगी वस्तूंचें उत्पादन खेड्यापाड्यांतून आणि छोट्या उद्योगधंद्यांतून होईल अशी तरतूद करणें, (२) ह्या उद्योगधंद्यांतून मिळणाऱ्या रोजगाराचें प्रमाण हळुहळु वाढेल असें पाहणें, आणि (३) ह्या उद्योगधंद्यांतील उत्पादन आणि विक्री मुख्यतः सहकारी तत्त्वावर संघटित करणें.

### विविध उद्योगांचा विकास

मुख्यतः विकेंद्रीकरण, तंत्रें, योजनाबद्ध पुरवठा, भांडवल पैदा करण्याचे मार्ग व साधनें, ग्रामीण विभागाचें विद्युतीकरण, आणि ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे यांच्या विकास-कार्यक्रमावर प्रतिकूल परिणाम करण्याचा संभव असलेल्या मोठ्या उद्योगधंद्यांना परवाना देण्याची पद्धति, या गोष्टींचा विचार समितीनें केला आहे. हातमाग, खादी, हातसडीचे तांदूळ, वनस्पति तेल, कातडी पादत्राणें आणि कातडी कमावणें, गूळ आणि खांडसारी, कुटीरोद्योग म्हणून काढल्याच्या पेत्यांचा धंदा आणि इतर ग्रामोद्योग, हस्तव्यवसाय, रेशमाचे किडे पाळण्याचा धंदा आणि काथ्याचा धंदा यांसारख्या विविध उद्योगधंद्यांच्या संकल्पित विकासाची रूपरेषा सविस्तर देण्यांत आली आहे.

अहवालाच्या शेवटच्या प्रकरणांत समितीच्या मतें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामोद्योग आणि लहान उद्योगधंदे यांच्या विकासासाठी अवश्य असलेल्या कारभारात्मक पद्धतीविषयीं विचार व्यक्त करण्यांत आले आहेत.

### २६० कोटी रु. चा खर्च

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत ह्या उद्योगधंद्यांच्या विकास कार्यक्रमासाठी २५ कोटी, २५ लक्ष रुपये केंद्रानें आणि २३४ कोटी, ३६ लक्ष रुपये निरनिराळ्या राज्यांनीं खर्चावयाचे आहेत. हातमागावरील कापूस-विणकामासाठी ८० कोटी रुपये, विकेंद्रित कापूस-कताई व खादी-धंद्याकरितां २३ कोटी रुपये, रेशीम आणि लोकर विणकाम (हातमाग आणि खादी) यांसाठी प्रत्यकी ५ कोटी रुपये, हातसडीच्या कामाकरितां ८ कोटी, २६ लक्ष रुपये, व खेड्यांतील तेलघाणीच्या धंद्यासाठी १३ कोटी रुपये मिळून ग्रामोद्योगाकरितां एकूण ४७ कोटी रुपये, लहान उद्योगधंद्याकरितां ६५ कोटी रुपये, हस्तव्यवसायाकरितां ११ कोटी रुपये, रेशमाचे किडे पाळण्याच्या धंद्याकरितां ६ कोटी रुपये, काथ्याच्या धंद्याकरितां २ कोटी रुपये आणि कारभार, शिक्षण व संशोधन इत्यादि सर्वसामान्य योजनांकरितां १५ कोटी रुपये, याप्रमाणें तरतूद करण्याची सूचना समितीनें केली आहे.

### नोकऱ्या मिळण्याची शक्यता

या विकास कार्यक्रमानुसार सुमारें ४० लक्षांहून अधिक




मोटारविमा क्षेत्रांत अग्रेसर

**दि मोटार ओनर्स म्यूच्युअल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड.**

मुख्य कचेरी : फोर्ट रोड, बेळगांव.

शाखा : मुंबई, मद्रास, पुणें, नासिक व कोल्हापूर

ऑर्गनायझर्स व एजन्सीज — कलकत्ता, दिल्ली, कुर्नूल, नागपूर व इतर अनेक ठिकाणीं.

वैशिष्ट्यें : ★ मोटारचा सर्व प्रकारचा विमा ★ माफक दर ★ हप्त्यांची सवलत ★ तत्पर व योग्य नुकसान भरपाई ★ आर्थिक स्थैर्य ★ विमेदारांचा विश्वास ★ विमेदारांचीच मालकी ★

★ही दिवाळी आमचे विमेदार-सभासद, प्रतिनिधी व हितचिंतक यांना आनंदाची व सुखाची जावो ! ★

**दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लिमिटेड सांगली.**

शाखा :-(१) जत (२) मिरज (३) तासगांव (४) शिराळे (५) विटे (६) आटपाडी (७) इस्लामपूर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ३,२३,७३० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. १,८९,८२९ |
| ठेवी | रु. २९,५४,००० |
| सहकारी संस्थांना कर्जे | रु. २६,७८,००० |
| खेळतें भांडवल | रु. ४१,२६,००० |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
★ ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर दिले जातात.

वाय. एस. बोरगांवकर, B. A., B. Com., मॅनेजर

आर. बी. आरवाडे, B. A., LL. B. चेअरमन.

## म. गो. कुलकर्णी

**निवडक किराणा मालाचे व्यापारी**

फडतरे चौक, सदाशिव पेठ, पुणें २.

---

**ही दिवाळी व नवें वर्ष बँकेच्या सर्व खातेदारांस, भागीदारांस व इतर संबंधीयांस सुखाचें व भरभराटीचें जावो.**

# दी बँक ऑफ औंध लि.

**( स्थापना : १९३८ )**

हेड ऑफिसः—१११-११२, सदाशिव पेठ, सातारा.

शाखाः—औंध, भवानीनगर व ओगलेवाडी.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... ... | रु. ३,३९,८८० |
| वसूल भांडवल ... ... | रु. १,६९,९४० |
| रिझर्व्हस् ... ... | रु. ८९,००० चे वर |

—: संचालक मंडळ :—

श्री. नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.

श्री. वाळकृष्ण गणेश चांदोरकर, बी. ए., एलएल. बी., वकील, सातारा.

डॉ. माधव दत्तात्रय वोकील, एल. सी. पी. अँड एस्. डी. ओ. एम्. एस्. (मुंबई),

श्री. रघुनाथ दिनकर माजगांवकर, व्यापारी, सातारा.

श्री. वाळकृष्ण रामचंद्र वर्तक, व्यापारी व कमिशन एजंट, पुणें.

—★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★—

—:मुदतठेवी आकर्षक दरानें स्वीकारल्या जातातः—

१ वर्ष–३ टक्के, ३ वर्षे–३॥ टक्के, ५ वर्षे–४ टक्के, ७ वर्षे–४॥ टक्के व १० वर्षे–५ टक्के.

मध्यमवर्गीयांकरितां बँकेनें **अल्पसंचय योजना** नवीन सुरू केली आहे व त्याकरतां **संचय पेट्या** दिल्या जातात.

विशेष माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

वा. वा. घमंडे, C. A. I. I. B. मॅनेजर.

न. गं. जोशी, B. A., LL. B. चेअरमन.

---

# दी पैसाफंड शेतकी सहकारी बँक लिमिटेड

हुपरी ( जिल्हा कोल्हापूर )

| | |
|---|---|
| शेअर्स | रु. ५३,०१० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ११,८१५ |
| खेळतें भांडवल | रु. २,४२,००० |

"सभासदांच्या शक्य तों सर्व प्रकारच्या अडचणी सहकार्यानें दूर करण्याचा प्रयत्न, हें ह्या बँकेचें एक वैशिष्ट्य आहे."

आ. बा. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर

एल. वाय. पाटील, चेअरमन

---

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. व. गिरमे ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B. }
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.

---




## खास दिवाळीकरितां

# अन्नाचें रहस्य

**बेडेकर मसाले, लोणचीं, पापड**

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

**व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.**

दुकानें—मुगभाट, ठाकूरद्वार, दादर, कोट, परळ

—द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें.—

लोकांना रोजगार, सुमारें १० लाख लोकांना हंगामी काम आणि सुमारें ५ लाख लोकांना पूर्ण वेळेची नोकरी मिळूं शकेल असा अंदाज समितीनें व्यक्त केला आहे. म्हणजे, या नाहीं त्या स्वरूपांत, ४५ लक्ष लोकांना कामधंदा मिळेल असें समितीला वाटतें.

### कारभार यंत्रणा

समितीचें असें मत आहे कीं, ग्रामीण व लहान धंदे आणि सहकारी चळवळ या दोन्ही गोष्टी एकाच प्रादेशिक मंत्र्याच्या व एकाच खातेचिटणीसाच्या हाताखालीं असाव्यात आणि त्यासाठी एक स्वयंपूर्ण खातें असावें. प्रत्येक जिल्ह्यासाठी शिक्षित नोकरवर्ग, तसेंच एक पूर्ण वेळ काम करणारा अधिकारी असावा.

कमी उत्पादन करणाऱ्या व जुनाट पद्धतीनें चालणाऱ्या उद्योगधंद्यांत अधिक चांगल्या पद्धती सुरू करण्यास अनुकूल परिस्थिति निर्माण झाल्यावर अशा उद्योगधंद्यांना अधिक चांगली यंत्रसामग्री व अवजारें वापरण्यास प्रथम संधि देण्यांत यावी असें समितीनें सुचविलें आहे.

### शहर-वाढीस मर्यादा

विकेंद्रीकरणासंबंधीच्या धोरणांतील महत्त्वाच्या अंगाचा निर्देश करून समितीनें असें म्हटलें आहे कीं, कोणत्याहि एखाद्या शहराची ठराविक मर्यादेपलीकडे वाढ होऊं न देण्यासंबंधीं सरकारचें निश्चित असें धोरण असावें. कांहीं खेड्यांचा एक गट व त्या गटास एक नैसर्गिक शहरी केंद्र असें औद्योगिक संघटनेचें स्वरूप असावें. या छोट्या शहरी केंद्रांचा अशाच प्रकारें अधिक मोठ्या केंद्रांशीं संबंध जोडण्यांत यावा.

### स्टेट बँकांचें काम

स्टेट बँक ऑफ इंडियानें ग्रामोद्योग आणि छोटे उद्योगधंदे यांना भांडवलाचा पुरवठा करण्याबाबत अधिक आस्था दाखवावी. शेतकीच्या क्षेत्रांत कर्जपुरवठा करण्याबाबत रिझर्व्ह बँकेस जशी कामगिरी सध्यां पार पाडावी लागते, तशाच प्रकारें ग्रामीण आणि सहकारी उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत भांडवल पुरविण्याची सर्वसामान्य जबाबदारी ह्या बँकेकडे असावी, असें समितीचें मत आहे.

तांत्रिक सामग्री, सहकारी व्यवस्थेची वाढ, आतां चालू नसलेले माग पूर्णपणें उपयोगांत आणणें, यांसारख्या योजनांचा हातमागविकासाचा कार्यक्रम संपूर्णपणें अंमलांत आणावा असें मत बहुसंख्य सभासदांचें आहे.

### हातमागांचें यंत्रमागांत रूपांतर

मध्यवर्ती उद्योग-खात्याचे संयुक्त चिटणीस श्री. गोविंदन् नायर आणि टेक्सटाइल कमिशनर श्री. व्ही. नंजप्पा यांनीं गिरण्यांच्या संख्येंतहि वेतशीरपणें वाढ व्हावी आणि हातमागांचें यंत्रमागांत रूपांतर करण्याच्या योजनेस तावडतोब प्रारंभ करून ग्राहकांना पुरेसें कापड मिळण्याची व्यवस्था करण्यांत यावी, असें भिन्न मत नोंदविलें आहे.

मोठ्या उद्योगधंद्यांच्या एकूण कार्यशक्तींत किंवा ठराविक पातळीच्यावर उत्पादनांत वाढ करण्याबाबतीं कांहीं काळ तरी नियंत्रण ठेवण्यांत यावें; मालाला असलेली अंदाजी मागणी आणि ग्रामीण व लहान धंद्यांची कार्यशक्ति विचारांत घेऊन ही गोष्ट करण्यांत यावी; या उद्योगधंद्यांची स्थापना, त्यांची सहकारी संघटना, तंत्रांत सुधारणा, यांसारख्या गोष्टींस सरकारनें मदत करावी आणि या धंद्यांतील मालाला प्राधान्य देणें, विक्रीची



सर्दीचा ताप, खोकला, पडसें इत्यादींवर गुणकारी
निलगिरी अर्क
याचा प्रत्येक थेंब गुणाचा प्रभाव दाखवितो !
उच्च प्रतीचें सुगंधी साहित्य आणि पेटंट औषधें बनविणार
स्टार कंपनी, बेळगांव

दि न्यू हिंदुस्थान मेटल वर्क्स
शहापूर-बेळगांव
अखंड सांगली, सातारी, राजापुरी लोटे, पूजेची भांडीं,
इ. सर्व पितळेचा माल सुबक तयार होतो.

रेखा फर्निशर्स
२२४, सदाशिव, पुणें.
सर्व प्रकारच्या सुबक फर्निचरचे कारखानदार

निश्चिति प्राप्त करून देणें, रिबेट व आर्थिक मदत यांसारखे उपाय योजणें, अशा गोष्टीहि समितीनें सुचविल्या आहेत.

### अबकारी करआकारणी

विक्रीवरील सूट (रिबेट) व उत्पादनार्थ द्रव्यसाह्य देण्याचे नवे उपाय योजण्यास समितीचा सर्वसाधारणतः विरोध आहे. तसेंच ग्रामीण व लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांसाठी उत्पादनाचीं क्षेत्रें राखून ठेवण्याच्या उपाययोजनांत वाढ करण्यासहि समितीचा विरोध आहे. स्वतंत्र क्षेत्रांची सुस्पष्ट व्याख्या करणें नेहमींच शक्य होणार नाहीं आणि एका विशिष्ट परिस्थितींत राखीव म्हणून ठरलेलीं क्षेत्रें बदलत्या परिस्थितींत अयोग्य ठरतील. राखीव क्षेत्रापासून होणारा फायदा उत्पादनावर वा विकासावर मर्यादा घालून आणि नवे परवाने देण्यावर नियंत्रण ठेवूनहि साध्य करतां येईल. कारागिरांस राहण्यासाठी चांगलीं घरें बांधणें व त्यांच्या राहण्याच्या व कामाच्या परिस्थितींत सुधारणा करणें, याचाहि समितीनें पुरस्कार केला आहे.

### हातसडीचा तांदूळ

हातसडीच्या तांदळाच्या धंद्याचा विचार करतां समितीनें नवे शेलर, कंबाइंड शेलर, हलर मिल्स, किंवा सिंगल हलर सुरू करण्यास विरोध दर्शविला असून खास प्रकरणीं परवानगी देण्यांत आलेले कारखाने सरकारी वा सहकारी असावेत असें म्हटलें आहे. तांदळाचें संपूर्ण वाढतें उत्पादन हातसडीच्या धंद्याकडे देण्यांत यावें. या धंद्याच्या विकासार्थ समितीनें यांत्रिक सडीवर अबकारी कर बसविण्याची शिफारस केली आहे.

### खेड्यांतील तेलाचा धंदा

खेड्यांतील तेलघाण्यांच्या धंद्याच्या विकासांतील मुख्य प्रश्न त्या घाण्यांच्या उत्पादनशक्तीचा पुरेसा वापर कसा करून घ्यावा, हा आहे. तेलगिरण्यांत सरकी गाळण्याच्या शक्यतेसंबंधीं सरकारनें चौकशी करावी म्हणजे खाद्योपयोगी तेलबियांचा मोठा सांठा ह्या घाण्यांतून गाळण्यासाठी उपलब्ध होईल. तीळ, करडी यांसारख्या तेलबिया गिरण्यांतून गाळण्यावर प्रदेशानिहाय नियमन ठेवण्यांत यावें, अशी शिफारस करण्यांत आली आहे. ह्या धंद्यासाठी सहकारी संस्था स्थापन करण्यांत याव्यात आणि सुधारलेली सामग्री वापरावी. तेलधंदा आणि कातडीकाम यांच्या सहकारी संस्थांचे भाग त्यांतील कारागिरांना खरेदी करतां यावेत म्हणून त्यांना कर्जे देण्यांत यावीत.

### साखर

साखरेची वाढलेली मागणी पुरी करण्यासाठी साखरेचें यापुढील उत्पादन खांडसारीसाठी रोखून ठेवण्यांत येऊन साखरकारखान्यांच्या उत्पादनावर कमाल मर्यादा घालण्याच्या सूचनेस, खांडसारीच्या उत्पादनांत नासधूस होते या मुद्यावर समितीनें विरोध दर्शविला आहे.

### आगपेट्या

काड्याच्या पेट्यांचें सर्व नवीन उत्पादन छोटे कारखाने आणि कुटीरोद्योग याकरतां राखून ठेवावें ह्यास समितीनें अनुकूलता दर्शविली आहे.

छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठी उभारावयाच्या संकल्पित वसाहती (इस्टेट्स्) मोठ्या शहरांत अगर त्यांच्या जवळपासच्या विभागांत उभारूं नयेत म्हणजे लोकसंख्येची दाटी त्या शहरी विभागांतून होण्याचें टळेल असें समितीनें म्हटलें आहे.


स्थापना १९३६

युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद

ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

☆ सरदारगृह ☆

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र भुवन, बेळगांव

—मुजावर गल्ली—

महाराष्ट्राचें व कर्नाटकचें अत्यंत आवडतें व सुखसोईंनें युक्त

बेळगांव मुजावरगल्ली.
मालक महाराष्ट्र भुवन

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

# दि कल्याण पीपल्स
## को-ऑपरेटिव्ह बँक लि. कल्याण

पो. बॉ. नं. ११ ] स्थापना : ४ जून, १९२३ [ टे. नं. ५५

| | |
|---|---|
| अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| भरलेलें भांडवल | रु. ३,१४,१०० |
| खेळतें भांडवल | रु. १३,१७,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ३,६८,३०० |
| सरकारी व इतर रोख्यांत गुंतविलेलें | रु. ५,८०,१०० |

मुख्य ऑफिस :
सबनीस वकील यांची इमारत, टिळक चौक, कल्याण.
शाखा : ★ डोंबिवली ★ शहापूर व ★ अंबरनाथ

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

: डायरेक्टर बोर्ड :
चेअरमन
श्री. दौलतराव जयरामराव झुंजारराव
मॅनेजिंग डायरेक्टर्स
श्री. गंगाधर वासुदेव भिडे व
श्री. पांडुरंग शिवराम देशमुख
डायरेक्टर्स
श्री. देवानंद जेठा राजा
श्री. महंमद इब्राहीम अजमुद्दीन भावे
श्री. कृष्णाजी लक्ष्मण भिडे
श्री. विठ्ठलदास मोरारजी
मॅनेजर
बाळकृष्ण बाबुराव रुद्रभटे

# दि बँक ऑफ कराड लि., कराड.

स्थापना-१२-३-१९४६

हेड ऑफिस, कराड. शाखा-भवानी पेठ, सातारा.

| | |
|---|---|
| शेअर वसूल भांडवल | रु. २,१८,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. ६२,००० |
| खेळतें भांडवल | रु. २०,९०,००० |

— बोर्ड ऑफ डायरेक्टर्स —
चेअरमन : श्री. लक्ष्मण महादेव देशपांडे.
व्हाइस-चेअरमन : श्री. ना. बा. बुधकर.
श्री. वि. रा. वेलणकर, श्री. शं. प्र. ओगले, मेजर सरदार बी. एन्. पाटणकर, श्री. वि. द. शिराळकर, डॉ. व्ही. जी. देशपांडे, श्री. रा. अ. आराणके, श्री. म. रा. देशपांडे.

**मुदत-ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.**

| | | |
|---|---|---|
| मुदत वर्ष एक | ... | ३¼% |
| मुदत वर्षें दोन | ... | ३½% |
| मुदत वर्षें तीन | ... | ३¾% |
| मुदत वर्षें चार | ... | ४% |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

कराड, ता. ११-१०-५५
म. वि. खंडकर
मॅनेजर.



डोकेंदुखी व मेंदूच्या सर्व विकारांवर खात्रीचा इलाज
# रामतीर्थ ब्राम्ही तेल
[ स्पेशल नं. १ ]
( मेडिकेटेड )

पांढरे केस काळे होतात, स्मरणशक्ति वाढते, टक्कलावर केस उगवतात, शांत झोंप येते, केस वाढतात, दृष्टीही सुधारते.

मोठी बाटली रु. ३-८-०
लहान बाटली रु. १-८-०

टपालानें मागविणारांनीं अनुक्रमें ५ रु. ५ आ. व ३ रु. ७ आ. ची मनिऑर्डर करावी. व्ही. पी. केली जाणार नाहीं.

## श्री रामतीर्थ योगाश्रम
" उमेशधाम, " १७, व्हिन्सेंट स्क्वेअर स्ट्रीट, नं. १.
दादर ( जी. आय. पी. ) रेल्वे स्टेशननजीक, मुंबई १४.

## ही दिवाळी व नवें वर्ष आपणांस सुखाचें जावो !

# साण्डू
ओरिजिनल
# ब्राह्मी तेल






दत्तात्रेय कृष्ण साण्डू ब्रदर्स चेम्बूर लि.
फॅक्टरी और हेड ऑफिस :— चेम्बूर-बम्बई-३८

( १ ) पुणें एजंटस् : प्रभाकर एजन्सी, १००, रविवार पेठ, पुणें २.
( २ ) लोकल स्टॉकिस्ट : एस. आर. माने अँड सन्स ५०१, रास्ते वाडा, पुणें २.

आमचे भागीदार, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

## पुणें शहर.

( स्थापना-१९१७ )

द्वितीय पंचवार्षिक योजनेंत सहकारी चळवळीला महत्त्वाचें स्थान दिलें असून त्यानुसार आपलें सरकार योजना आंखत आहे. उत्पादन वाढविणें व बेकारी नाहींशी करणें हें आपलें ध्येय आहे. उत्पादन वाढविण्याकरितां गुंतवणूक वाढविणें जरूरीचें आहे. बचतीशिवाय गुंतवणूक होऊं शकत नाहीं. अधिक बचत करणें हें प्रत्येक भारतीय नागरिकाचें कर्तव्य आहे. या बँकेमध्यें ठेवलेला पैसा सहकारी चळवळींत उत्पादनवाढीकरतां वापरला जातो. पुणें जिल्हा मध्यवर्ती बँकेंत पैसा ठेवणें म्हणजे अप्रत्यक्षरीत्या द्वितीय पंचवार्षिक योजनेस हातभार लावणें आहे.

पुणें जिल्ह्यांत सर्वत्र प्रमुख ठिकाणीं शाखा असून बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय असून भाडें अत्यंत माफक आहे.

| | | |
|---|---|---|
| खेळतें भांडवल | ... | रु. १,९१ लाखांचे वर |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ८½ लाखांचे वर |
| एकूण ठेवी | ... | रु. १,६७ लाखांचे वर |

भाग विक्री चालूं याहे

आपली पंचवार्षिक योजना यशस्वी करण्याकरितां आमच्या बँकेंत बचत करा.

वा. ग. आळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.

# सांगली बँक लि., सांगली

स्थापना १९१६ : शेड्युल्ड बँक

## मुंबई शाखा—फोर्ट

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | : | ४½ लक्ष रु. |
| रिझर्वस् व इतर फंडस् | : | ५¾ लक्ष रु. |
| खेळतें भांडवल | : | सव्वा कोटीवर |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. आर. व्ही. देशमुख, B. A., B. LITT. ( Oxon)
कलेक्टर, सातारा. साऊथ, सांगली (चेअरमन)
श्री. आर. डी. रेठरेकर, B. A., LL. B.
श्री. फुलचंद रुपचंद शाहा
श्री. तात्यासाहेब श्री. आरवाडे
श्री. बाबुराव चिंतामणी बिराज,
श्री. चारुदत्त बाबाजी शिरगुप्पे
श्री. बी. ए. आरवाडे

मॅनेजर
श्री. एम्. के. गुते, M. A., C. A. I. I. B.

| व्याजाचे दर | | | द. सा. द. शें. |
|---|---|---|---|
| करंट | .... | रु. | ०-८-० |
| सेव्हिंग | .... | रु. | १-८-० |
| स्पे. सेव्हिंग | .... | रु. | २-०-० |
| १ वर्ष मुदत | .... | रु. | ३-०-० |
| २ वर्ष मुदत | .... | रु. | ३-४-० |
| ३ वर्ष मुदत | .... | रु. | ३-८-० |
| ४ वर्ष मुदत | .... | रु. | ३-१२-० |
| ५ वर्ष मुदत | .... | रु. | ४-०-० |

कॉल डिपॉझिट स्वीकारतो.

★ बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात ★

हें पत्र पुणें, पेठ शिवाजानगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण मुद्रणालयांत श्री. केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्री. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.